नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

दिवाळी अंक-१९६२

अनुक्रमणिका

युगवाणी

दीपावलि विशेषांक

ऑक्टोबर–नोव्हेंबर १९६२

या अंकात

संपादक

प्रा. श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र--

:: संपादक मंडळ ::

भा. श्री. परांजपे
व. कृ. वऱ्हाडपांडे
मा. गो. वैद्य

युगवाणी

संपादकः--श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १७] आक्टोबर १९६२ [अंक ६

संपादकीय

अश्लीलतेचा नरकासुर

दिवाळी जवळ येत आहे. त्यावरोवर 'चटकदार', 'वहारदार' 'वफाम', 'मस्त' अशा विशेषणांनी मुखपृष्ठांच्या व आतील साहित्याच्या (?) जाहिराती कित्येक नियतकालिकांच्या संपादकां-प्रकाशकांकडून फडकत आहेत. रात्र-रात्र जागून ढंगदार कपडयांच्या 'ऑर्डर्स' पूर्ण करण्यात शिवणकलाकार जसे गुंतले आहेत तसेच रंगतदार 'साहित्य' पुरविण्याच्या उद्योगात साहित्याचे 'कारागीर' व त्यांच्या मालाचे दलाल मग्न आहेत. मालाला गिऱ्हाईक चांगलं मिळावं म्हणून त्याच्यावर आकर्षक आवरणं चढविण्याची घाई व चढोओढ सुरु आहे. आणि आवरणावर अर्ध-अनावृत रंगचित्र व आवरणाखाली पूर्ण-अनावृत्त शव्द चित्रं असा हा तयार माल दिवाळीतील आनंदात (!) भर घालण्यासाठी लगोलग कारखान्यातून वाहेर पडून वाजारपेठात व तिथून घराघरात पोचणार आहे आणि या महागाओीच्या अन्नटंचाईच्या काळात ही वोळाची पक्वान्नं चाखून वाल-वालिका, तरूण-तरूणी व वृद्ध तृप्त होणार आहेत !

आज प्रकाशित होणारी सर्वच नियतकालिके व त्यातील साहित्य या प्रकारचं आहे असं आम्हांला मुळीच म्हणायचं नाही. परंतु हिणकस, हीन अभिरूचीचे असे लिखाण वाढत्या प्रमाणावर निर्माण होत आहे, वाचले जात आहे व त्याची आवड उत्पन्न होत आहे ही गोष्ट नजरेआड करता येत नाही. उत्तान, अश्लील, बीभत्स अशा प्रकारच्या या हीन व हानिकारक लिखाणाच्या निर्मितीला व प्रसाराला आळा घालता येईल की नाही, तो कसा घालता येईल हा अेक मोठाच प्रश्न आहे. अश्लीलतेच्या या नरकासुराचा वध कोण करणार ?

अनुक्रमणिका

अश्लील म्हणजे काय ?

अश्लील कशाला म्हणावे, कोणते लिखाण अश्लील आहे ? कायद्याच्या दृष्टीने दंडार्ह 'अश्लील' कोणते हे ठरविणे कठिण आहे हे आम्ही जाणतो. पण या बाबतीत कायद्यावर भर द्यावा व ऊठ–सूट न्यायालयाकडे धाव घ्यावी हा उपाय आम्हांला हितकारक वाटत नाही. श्लील–अश्लील ठरविण्याचा अधिकार सदभिरूचिसंपन्न सहृदय रसिकाचा आहे. अेखाद्या खाद्य पदार्थाची चव जशी आरोग्य संपन्न व रूचिसंपन्न भोक्त्याला कळते तसेच अशा रसिकालाहि साहित्याची 'चव' कळते. आणि या बाबतीत त्याने दिलेला निर्णय हा बहुधा अचूक व सर्वमान्य होण्यासारखा असतो. पण कित्येक वेळेला विशिष्ट लिखा-णाच्या श्लील–अश्लीलते बाबत जाणकार टीकाकारात मतभेद दिसून येतो से का ? असा प्रश्न येथे उद्भवतो. नुकत्याच एका कादंबरीच्या बाबतीत असे वेगळे सूर निघालेले बहुश्रुतांच्या कानावर आलेच असतील. याबाबत आम्हांला असे वाटते की हे मतभेद पुष्कळदा रसिकाच्या भूमिकेवरून झालेले नसतात. शुद्ध रसिकाच्या भूमिकेवरून असे मतभेद एक तर संभवत नाहीत व संभवलेच तर ते अपवादात्मक असतात अशी आमची धारणा आहे. वर सूचित केलेल्या कादंबरीतील अश्लीलते बाबत सामान्यतः अेकमतच दिसून येते व मतभिन्नता अपवादात्मकच आहे हेहि या संदर्भात ध्यानात घेण्यासारखे आहे. शिवाय सर्वच रशिकांना निर्विवादपणे व निरपवादपणे अश्लील म्हणून खटकणारे लिखाणहि कांही कमी नसते. तेव्हां याबाबत काथ्याकूट करण्याची आवश्यकता नाही. थोडक्यात असे म्हणता येईल की शब्दोच्चारांच्या शुद्धतेच्या बाबतीत शिष्टांचे सभास्थानीचे उच्चार जसे प्रमाण मानावयाचे तसेच श्लील–अश्लीलतेच्या बाबतीत सहृदय रसिकाचे अंतः स्फूर्त निर्णय प्रमाण मानावयाचे.

अश्लीलता निवारण

मुख्य प्रश्न आहे तो आज वाढत्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या व प्रसार पावणाऱ्या हीन अशा या लिखाणाला आळा कसा घालता येईल हा. साहित्य–संमेलनातून ठराव करणे हा अेक उपाय आजवर अवलंबिलेला दिसतो. तसेच अश्लील वाङ्मया (?) ची 'होळी' करण्याचा उपायहि क्वचित् योजिलेला आढळतो. आणि अश्लीलते विरूद्ध असलेल्या कायद्याचा बडगा उगारण्याचा मार्गहि कांही वेळेला पत्करला जातो. पण अश्लील लिखाणाचे वाढते प्रमाण व त्याचा वाढता प्रसार या उपायांची हतबलता व अपुरेपणा दाखवितात. पहिला उपाय हा 'लोकमत' जागृत करण्याच्या दृष्टीने कांही अेका मर्यादेपर्यंत उपयुक्त आहे. दुसऱ्या उपायाने अपायच अधिक होतो. तिसरा क्वचितच लागू पडतो

आणि 'संशया'चा फायदा मिळून सुटलेले लिखाण त्याचेच भांडवल करून अधिक लाभ मिळवते. या उपायांची स्थिति पाहिली म्हणजे श्रीज्ञानेश्वरांनी काम–क्रोधांना जिंकावण्यासाठी अवलंबिलेल्या उपायांच्या बावतीत जे म्हटले आहे त्याची आठवण होते. ते म्हणतात—

एयांतें साधावेया लागि । जें वल वाणिजे आंगीं ।
तें इंधन जैसें आगी । सावाओ होये ॥ २६० ॥
तैसे उपाये कीजति जे जे । ते येयांसी चि होति विरजे ।
म्हणौनि हटियांतें जीणिजे । ईहीं चि जगीं ॥ २६१ ॥ ––अ. ३

(यांना (कामक्रोधांना) नष्ट करण्यासाठी जे सामर्थ्य अंगीं वाणवावे ते सामर्थ्यच अग्नीला इंधनाप्रमाणे त्यांना साहाय्यक होते. त्याचप्रमाणे जे जे उपाय केले जातात ते सर्व यांनाच सहाय्यक होतात व तेच (त्यांना जिंकू इच्छिणाऱ्या) हटयोग्यांना जिंकतात.)

अशा परिस्थितीत परिणामकारक उपाय कोणता योजावा ? या संबंधात ज्ञानेश्वरांनीच वरील विवेचनाच्या शेवटी जो उपाय सुचविला आहे त्यापासून आपणांला सूचना मिळू शकते. ते म्हणतात—

तरि एयांचा पहिला कुरूठा इंद्रियें । जेथौनि प्रवृत्ति कर्मातें विये ।
आदीं निर्दलूनि घालीं तियें । सर्वथैव ॥ २६३ ॥
मग मनाची धाव पारूखैल । आणिक बुद्धी सोडवण होईल
एतुलेनि तागा एयां मोडैल । पापियांचा ॥ २६४ ॥

याचप्रमाणे या अश्लील वाङ्मयाचा पहिला कुरुठा (आश्रय–स्थान) जे संपादक व प्रकाशक त्यांच्यावर पहिला हल्ला झाला पाहिजे. अर्थात् हा कायद्याचा बाह्य हल्ला असून चालणार नाही. तर संपादक व प्रकाशक यांच्या पैकीच जे सदभिरुचिसंपन्न व सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले असतील (आणि असे पुष्कळ लोक आहेत अशी आमची खात्री आहे) त्यांनीच या कामी पुढाकार घेतला पाहिजे व आपापल्या संघटनेच्या मार्फत अश्लील वाङ्मयाच्या प्रसाराला हातभार लावणाऱ्या संपादकां–प्रकाशकांवर दडपण आणले पाहिजे. वेळ प्रसंगी बहिष्काराच्या व असहकाराच्या स्वरूपाचे देखील हे दडपण असले पाहिजे. संपादक–प्रकाशक आपले लिखाण छापीत नाहीत हे कळले म्हणजे लेखकांची 'धाव पारूखैल' व वाचकांची 'सोडवणूक' होईल.

आज या लिखाणाचा जास्तीत जास्त प्रसार नियतकालिकांच्या द्वारा होतो हे लक्षात घेतले तर निव्वळ पुस्तक प्रकाशकांच्यापेक्षा नियतकालिकांच्या संपादकांची या बावतीतील जबाबदारी अधिक आहे हे मान्य करावे लागेल.

अनुक्रमणिका

तसेच नुसत्या प्रकाशकांच्यापेक्षा साहित्याच्या क्षेत्रात संपादकावर अधिक जाण-कारीचा आळ अद्यापहि घेतला जाऊ शकतो. शिवाय फिरत्या व घरपोच (मासिकांच्या) वाचनालयांच्या द्वारा कमीत कमी पैशात हे लिखाण वाचण्याची सोय मासिकांच्या मार्फतच होते. हे सर्व ध्यानात घेतले म्हणजे संपादकांची जबाबदारी या बाबतीत किती मोठी आहे याची कल्पना येईल. प्रत्येक भाषेतील नियतकालिकांची संख्या कितीहि वाढली असली तरी अद्याप ती शेकडयातच मोजता येते. म्हणून प्रत्येक भाषेतील संपादकांच्या संघटनेमार्फत हे काम त्यातल्या त्यात सुलभतेने व जास्तीत जास्त परिणामकारकपणे होऊ शकेल असे आम्हांला वाटते.

साहित्य–संस्थांनी व संमेलनांनी आपल्या ठरावांच्या द्वारा संपादक–प्रकाशकांना या प्रश्नाच्या बाबतीतील त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली पाहिजे.

या संबंधी अधिक व्यापक व दूरगामी उपाय योजावयाचा म्हणजे वाच-कांनाच खऱ्या साहित्याची गोडी लावण्याचा व त्यांची अभिरूचि निकोप करण्याचा. यासाठी साहित्य संस्थांनी पुढे आले पाहिजे व 'कवि–गोष्ठी', 'कविसमाज' 'साहित्य–चर्चा मंडळे' अशा प्रकारच्या लहान लहान मंडळांची स्थापना व वाढ करवून त्यांच्या मार्फत वाचकांना रसिक व रसिकाला सहृदय करण्याचा उपक्रम केला पाहिजे. आज या दिशेने फारसा प्रयत्न होतच नाही.

सर्वच समाजाचा नैतिक ऱ्हास हेहि एक फार मोठे कारण या वाङ्म-याच्या आवडीला आहे. साहित्याशिवाय इतर अनेक साधनांच्या द्वारां लोकांच्या हीन वासनांना उत्तेजित करण्याचा प्रयत्न चालू आहे हेहि विसरता येत नाही. याचाहि परिणाम साहित्यक्षेत्रावर होतो. पण त्या संबंधी उपाय सुचविण्याचे हे स्थळ नव्हे.

श्री. काकासाहेब गाडगीळ यांचे अभिनंदन

सातारा येथे दि. २, ३ व ४ नोव्हें. १९६२ या तारखांना भरावयाच्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून माननीय श्री. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांची निवड झाली ही आनंदाची गोष्ट आहे. श्री. काका-साहेब हे साहित्यिक तर आहेतच पण ते नुसतेच साहित्यिक नाहीत. राजकीय क्षेत्रातील त्यांचे कर्तृत्वहि मोठे आहे. साहित्य कारण व भाषाकारण हे राजकारणापासून (सत्ताकारण नव्हे) दूर व अलिप्त राहू शकत नाही. भाषेचे अनेक प्रश्न राज्यशासनाच्या आधारा–सहाय्यानेहि सोडवावयाचे असतात.

(पृष्ठ ८६ वर)

वाङ्मयातील वास्तववाद

—श्री. के. क्षीरसागर, पुणें

(वि. सा. संघात जानेवारी १९६२ मधे दिलेल्या व्याख्यान मालेतील दुसरे व्याख्यान.)

जिवन्त समाजात ठरीव साचाचे वाङ्मय फार दिवस टिकाव धरू शकत नाही. विशिष्ट प्रेरणेच्या वाङ्मयाचा जास्तीत जास्त विकास होऊन ते हळूहळू निष्प्राण होऊ लागले की, त्याच्याविरुद्ध प्रतिक्रिया होऊन, नवी प्रेरणा वळ धरू लागते. अशा प्रकारे पाश्चात्य वाङ्मयाच्या इतिहासात परस्परविरोधी पण परस्परपूरक प्रेरणांची नागमोडी गति दिसून येते. वाङ्मयातील वास्तववादी प्रेरणा ही अशीच विरोधी प्रेरणा म्हणून उदयाला आलेली दिसून येईल. ती केवळ विरोधी लाट आहे, की तिला ललित वाङ्मयाच्या आविष्कारात स्वतःचे स्थान व कार्य आहे हा प्रश्न वास्तववादाच्या मीमांसेत महत्त्वाचा ठरतो.

'सौंदर्यवाद' अथवा 'रोमँटिसिझम्' या वाङ्मयीन प्रवृत्तीचा अभ्यास करताना, आपणास असे आढळून आले की, त्या प्रवृत्तीचे मूळ लेखकाच्या व्यक्तिमत्त्वात आहे. ती प्रवृत्ति म्हणजे जीविताचा अनुभव घेण्याची एक रीत आहे. त्या अनुभवपद्धतीतूनच एक साहित्यसरणीहि निष्पन्न होते. या साहित्य सरणीत उत्साह, अतिरेक, उत्कटता, आत्मकेन्द्रितता यांचे राज्य दिसून येते. पण अनुभव ग्रहणाची आणि जीवितचित्रणाची याच्या अगदी उलटहि तऱ्हा संभवते. उत्साह, आत्मीयता, अतिरेक आणि आत्मनिष्ठा यांच्यासंबंधी साशंकता वाळगणे; आत्मकेन्द्रित वृत्तीत वस्तूचे वा जीविताचे सत्य दर्शन होणे शक्य नाही असे मानणे, हेहि तितकेच स्वाभाविक आहे. निदान आत्मकेन्द्रित भावनापूजनाची लाट येऊन गेल्यावर तर तिच्या संबंधी अधिकच साशंकता उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. वास्तववादी प्रवृत्तीचे मूळ कांहीसे व्यक्तीच्या पिंडात आहे, तर कांही अंशी भोवतालच्या भ्रमनिरासाच्या वातावरणात आहे. सौंदर्यपूजनाची व ध्येयपूजनाची प्रतिक्रिया म्हणून जसा वास्तववाद उत्पन्न होतो, तसाच नीति आणि औचित्य यांच्या अवडंबराची प्रतिक्रिया म्हणूनहि तो उत्पन्न होतो.

अनुक्रमणिका

कथा-कादंबऱ्यातील पुष्कळसा वास्तववाद......हा असा प्रतिक्रियात्मक असला, तरी वास्तववाद म्हटला की, तो प्रतिक्रियारूपच असेल, असे समजणे चूक होईल. केवळ प्रतिक्रियेतून किंवा चिडीतून श्रेष्ठ वाङमयीन प्रवृत्ति निर्माण होणे शक्य नाहीं. वाङमयातील वास्तववाद ही केवळ अतिरेक-विरोधी प्रवृत्ति आहे, की मूलतः कलाप्रेरक प्रवृत्ति आहे, हे पाहणे आवश्यक आहे. दुसऱ्या भाषेत सांगायचे झाल्यास वास्तवादालाहि 'ऋण' (negative) आणि धन (positive) अशा दोन बाजू असल्यास, वाङमयातील वास्तवादाची 'धन' बाजू कोणती ते पाहिले पाहिजे.

स्वतःच्या रागलोभातून सृष्टीकडे आणि मानवाकडे न पाहाता, केवळ त्रयस्थाच्या दृष्टीने पाहणे, कलावन्ताला शक्य आहे की नाही ? या त्रयस्थाच्या भूमिकेवरून तो कलात्मक चित्र काढू शकेल, की शास्त्रीय वर्णनाच्या प्रान्तात जाऊन दाखल होईल, हा प्रश्न मनोरंजक आहे. अन्तःसृष्टि हा काव्याचा खरा विषय आहे, की बाह्यसृष्टि हा खरा विषय आहे, असाहि प्रश्न विचारता येईल. 'बेनेदेतो क्रोचे' सारखे कलामीमांसक अन्तःसृष्टि हाच काव्याचा खरा विषय मानतातसे दिसते. कारण उत्कट भावनावर्णन हेच खरे काव्य असे क्रोचे मानतो. उलट कवि जसजसा अन्तःसृष्टीकडून बाह्य सृष्टीकडे वळेल, तसतसा तो परिपक्व झाला, असे समजावे, असा गटेचा अभिप्राय आहे. आत्मनिष्ठ साहित्यापेक्षा वस्तुनिष्ठ साहित्यात लेखकाचा विकास अधिक दिसून येतो असा गटेच्या या अभिप्रायाचा अर्थ आहे.*

साहित्यातील वास्तवादाविषयीच्या अपेक्षेचा आढावा येथे घेण्याची आवश्यकता नाही. तथापि 'वास्तववाद' ही संज्ञा, शेकडा नव्वद उदाहरणात, केवळ तात्पुरत्या आणि जुजबी अर्थानेच वापरलेली असल्याने, तिच्या मर्यादित आणि व्यापक दोन्ही अर्थांचा थोडा विचार केला पाहिजे. एक चित्रणशैली या अर्थाने 'वास्तववाद' या संज्ञेचा उपयोग अधिक प्रचलित आहे. सूक्ष्म तपशील देऊन वाङमयातील एखादा प्रसंग किंवा एखादे पात्र सजविणे हा या 'वास्तवादा'चा अर्थ होय. मराठी वाङमयात या अर्थाने 'वास्तववाद' हा शब्द हरिभाऊंच्या कादंबऱ्यातील वर्णनापेक्षाहि य. गो. जोशी आणि माटे यांच्या कथातील वर्णनांनाच अधिक समर्पकपणे लावता येईल. समकालीन समाजाचे चित्र हेहि वास्तववादी वाङमयाचे एक लक्षण मानतात. त्या अर्थाने हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्या वास्तववादी आहेत. तथापि त्या कादंबऱ्यातील बराच भाग प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे समाजटीकेतच जमा होईल. आणि काटेकोरपणे पाहिल्यास समाजमीमांसेला वास्तववादी वाङमयात जागा मिळणार नाही.

*गटे: कॉन्व्हर्सेशन्स् वुइथ् एकरमान्

कधी कधी वास्तववादी चित्रण याचा अर्थ 'जे सार्वकालीन चित्रण नव्हे ते' असाहि केलेला आढळतो. कारण वास्तववादी चित्रणशैलीत जर हुवेहूब पणाला महत्त्व असेल, तर तो गुण परिचित आणि विशिष्टकालीन व्यक्तींच्या (आणि प्रसंगांच्या) चित्रातच आढळणार. एका अधिकारी लेखकाने * तर वास्तववादाच्या एका प्रकाराचा संबंध हास्यप्रधान हलक्या पात्रांच्या चित्रणाशी व प्रादेशिक चित्रांशीच आहे असे म्हटले आहे या लेखकाचे हे विधान एका सुपरिचित उदाहरणाने अधिक स्पष्ट होईल. कालिदासाच्या शाकुन्तल नाटकातील शकुन्तला, दुष्यन्त आणि कण्व यांची चित्रे 'अवास्तव' आहेत असे अर्थात् कुणीच म्हणणार नाही. पण त्याच नाटकातील पांचव्या अंकात चोरीच्या आरोपाखाली पकडलेला कोळी आणि त्याला पकडणारा 'सरकारी' अधिकारी यांचे जे चित्र आहे, ते एका विशिष्ट अर्थाने वास्तववादी आहे. 'वास्तववादी' या संज्ञेचा हा विशिष्ट अर्थच सर्वसामान्य लेखकवाचकाच्या मनात प्रथम उभा राहतो, हा वरील लेखकाच्या मताचा खरा अर्थ होय. शकुन्तलेचे हृदय चोरणाऱ्या दुश्यन्ताच्या चित्रापेक्षा शकुन्तलेची अंगठी चोरणाऱ्या धीवराचे चित्र कोणत्या अर्थाने अधिक वास्तव आहे, याचा विचार केल्यास वास्तववाद या 'संज्ञे'च्या प्रचलित आशयावर अधिक प्रकाश पडू शकेल. वर उल्लेखिलेला पाश्चात्य लेखक म्हणतो त्याप्रमाणे, वास्तववादाचा संबंध खालच्या दर्जाच्या पात्रांशीच अधिक असतो की काय ? तसे असेल, तर वास्तववादाच्या मिषाने जीवनाच्या गलिच्छ बाजूकडेच अधिक वळणाऱ्या संप्रदायाला आपण दोष देऊ शकणार नाही. शाकुन्तलातील उदाहरणाचाच आपण अधिक विचार केला, तर वास्तववादासंबंधीच्या आपल्या अपेक्षा अधिक स्पष्ट होतील. शकुन्तला आणि दुष्यन्त यांच्या चित्रात आपल्याला प्रत्यक्ष पाहिलेल्या मानवी नमुन्यांच्या दर्शनापेक्षा कवीच्या मनातील आदर्शाचेच दर्शन अधिक घडते. उलट कालिदास-कालीन कोळी आणि पोलिस अधिकारी यांच्या चित्रात कवीच्या आदर्शाला जागाच नसल्याने, अधिक 'खरी' तत्कालीन चित्रे पाहिल्याचा आपणांला आनंद होतो. या अर्थाने वास्तव याचा प्रतिद्वंद्वी शब्द 'रोमँटिक्' हा नसून 'आदर्श' हा आहे. वाङमयात वास्तववादी प्रवृत्तीचा उदय 'रोमँटिसिझम्'ला विरोध म्हणूनहि होऊ शकेल, आणि आदर्शवादाला अथवा 'क्लॅसिसिझम्'ला विरोध म्हणूनहि होऊ शकेल. आदर्श चित्र हे 'रोमँटिक्' चित्रा इतके अवास्तव किंवा अतिरेकी नसते. ते स्वाभाविक व सुसंगत या अर्थाने सत्य असते; पण ते प्रत्यक्ष सदृश किंवा 'हुवेहूव' या अर्थाने वास्तव नसते. या दृष्टीने पाहाता, आदर्श चित्रे आणि वास्तव चित्रे ही दोन्हीहि सत्य असून या दोहोंनाहि

* Shipley: Dictionary of literary Terms.

वाङमयात स्थान आहे. असेच म्हणावे लागेल. पण अखेर वास्तव चित्रणाला आणि दृष्टिकोणाला आपण गौण स्थान दिल्यासारखेच होईल. कारण वास्तव चित्रणप्रकाराचा उपयोग केव्हा ?—तर जेव्हां गौण, क्षुद्र आणि हास्यकारक चित्र काढायचे असेल तेव्हा !

वाङमयाच्या चातुर्वर्ण्यात महाकाव्याचा दर्जा जसा स्फुट सुभाषिताला मिळणार नाही; किंवा पाश्चात्य प्रकारांचे उदाहरण घेऊन बोलायचे झाले तर 'ट्रॅजिडी'चा दर्जा जसा 'कॉमिडी'ला मिळणार नाही, त्याप्रमाणे आदर्श–चित्रण पद्धतीचा दर्जा वास्तववादी पद्धतीला मिळणार नाही, असाच जर या विवेचनाचा अर्थ होणार असेल, तर वास्तववादाला कायमचे गौण स्थान दिल्यासारखे होईल. उलट वास्तववादाच्या पुरस्कर्त्यांच्या मते, वास्तववाद हा सौंदर्यवादा-पेक्षा तर श्रेष्ठ आहेच; पण कांही दृष्टींनी आदर्शवादापेक्षाहि श्रेष्ठ आहे. वास्तववादाच्या पुरस्कर्त्यांच्या या अभिमानात किंवा दाव्यात सत्याचा अंश किती ते पाहिले पाहिजे. वास्तववाद्यांच्या या भूमिकेला तत्त्वज्ञानातील एका भूमिकेचा थोडा फार आधार घेतला जातो. अखेर लेखक चितारीत असतो तरी काय ? एखाद्या वस्तूसंबंधीच्या स्वतःच्या भावना ?—की स्वतःच्या मनातील आदर्श ? वास्तववाद्यांच्या मते भावनावादी आणि आदर्शवादी दोन्हीहि चित्रे खोटी किंवा अवास्तव आहेत. जीवित आणि जगत् माझ्या भावनांनीहि व्यक्त होणार नाही की माझ्या आदर्शावरहुकूम असेलच असेहि नाही. बाह्य जगताला जर माझ्या (लेखकाच्या) भावनेहून आणि आदर्शाहून स्वतंत्र अस्तित्व असेल, तर त्याचे ते स्वतंत्र, वस्तुनिष्ठ स्वरूप चितारणे हे साहित्याचे श्रेष्ठ-तर ध्येय होय. त्याला असे स्वतंत्र अस्तित्व आहे, असे तत्त्वज्ञानातील एक संप्रदाय मानतो, हें विसरता येत नाही.

वास्तववादासंबंधीची चर्चा या टप्प्यावर आल्यावर तत्त्वज्ञानाच्या प्रांतात प्रवेश करते. ज्याला साहित्यात आणि इतर कलात 'वास्तव' म्हणून म्हणतात, त्याचे खरे स्वरूप कोणते आणि ते लेखकाला कितपत ज्ञात होण्याचा संभव आहे ? शास्त्रज्ञाच्या दृष्टीला दिसणारी वास्तवता आणि लेखकाच्या दृष्टीला दिसणारी वास्तवता एक असावी, असा तर वास्तवतेच्या आग्रहाचा अखेरचा अर्थ होणार नाही ? ज्याला कला म्हणजे काय, याची थोडी फार कल्पना आहे, असा कोणीहि मनुष्य कलेतील वास्तव आणि शास्त्रातील वास्तव यांचा गोंधळ करणार नाही. बाह्य दृश्य म्हणजे केवळ द्रष्टयाच्या भावना किंवा त्याचे आदर्श नव्हेत, असा आग्रह धरणारा कलावन्तांचा एक वर्ग असणे स्वाभाविक आहे. माझ्या रागलोभांचे, सुखदुःखांचे, मला प्रिय आणि अप्रिय कल्पनांचे चित्र, हाहि साहित्याचा विषय होऊ शकेल; पण मी माझे राग-

लोभ बाजूला ठेवून तटस्थपणे पाहिलेले जग हाहि तितकाच महत्त्वाचा साहित्य-विषय होऊ शकेल. आपण एका अर्थी असेहि म्हणू शकू की आत्मनिष्ठ वाङमयाचा विषय प्राधान्येकरून 'अहम्' हा असतो; तर वस्तुनिष्ठ वाङमयाचा विषय 'इदम्' हा असतो. या दोहोंपैकी कोणताच विषय कलादृष्ट्या त्याज्य ठरवता येणार नाही. या दोहोत कलादृष्ट्या श्रेष्ठकनिष्ठ ठरविणेहि प्रायः अशक्य आहे. दोन्हीहि विषय साहित्यप्रान्ताचे सारखेच हक्कदार आहेत, असे आपणास कबूल करावे लागेल. पण या 'इदम्'च्या चित्रणावर 'अहम्'ची छाया पडू न देणे, हे वास्तववादाच्या तात्त्विक बैठकीचे स्वरूप म्हणून सांगता येईल. ही बैठक कलेला पोषक नसून शास्त्राला पोषक आहे, असा आक्षेप घेता येईल, असे मला वाटत नाही. कलेच्या प्रान्तातहि अलिप्ततेचे महत्त्व आहेच. किंबहुना 'अलिप्तता' या गुणाला प्राधान्य देणारी कला म्हणजे वास्तववादी कला होय, हे वास्तववादी कलेचे तात्त्विक स्वरूप म्हणून सांगता येईल.

पण हे विधानहि थोडे मर्यादित केले पाहिजे कारण 'अलिप्तता' या गुणाची अपेक्षा आत्मनिष्ठ चित्रणातहि असू शकेल. मनुष्य स्वतःच्या लुब्धतेकडे, क्षुब्धतेकडे विव्हळतेकडे आणि तन्मयतेकडेहि अलिप्ततेने पाहू शकेल. विशेषतः आर्ततेचा आणि विवशतेचा क्षण येऊन गेल्यानंतर तर तो निश्चितच अलिप्ततेने पाहू शकेल. या दृष्टीने पाहता दृष्टिकोण आणि विषय या दोहोतहि 'अहम्' पेक्षा 'इदम्' कडे कल अधिक असणे हे वास्तववादाचे लक्षण होय असे म्हणता येईल. आदर्शवादी (classical) लेखक आणि सौंदर्यवादी (Romantic) लेखक यांच्या पद्धतीतील भेद स्पष्ट करताना सुप्रसिद्ध ब्रिटिश तत्त्वज्ञानपंडित प्रो. एस्. अॅलेक्झँडर यांना अखेर आत्मनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ, आत्मपर आणि आत्मनिरपेक्ष या वाङमयीन द्वंद्वाचाच आश्रय करावा लागला आहे ते म्हणतात:—

Perhaps an artist friend of my own is right when he says that in the classical, the artist goes to meet nature, i. e. the Subjetcmatter, in the romantic he anticipates nature and imposes himself upon the subject. The Difference then according to this would be of the proportion of the given and added elements; the given elements being weightier in the classical and the added elements in the romantic. Thus the romantic is the more personal, the classical the more impersonal. This would be equivalent roughly to the objective and subjective character commonly assigned to the two kinds respectively." *

* प्रो. अॅलेक्झँडर : ब्यूटि अॅण्ड अदर फॉर्म्स ऑफ व्हॅल्यू पृ. १७९

प्रो. अॅलेक्झँडर यांच्या या उताऱ्याचा भावार्थ पुढीलप्रमाणे सांगता येईल. आदर्शवादी किंवा अभिजात कलेत कलावन्त वर्ण्य विषयाकडे (उ. निसर्गाकडे) स्वतः जातो; तर उलट सौंदर्यवादी कलेत वर्ण्यविषयाकडे जाण्यापूर्वीच कलावन्त त्याचे चित्र डोळ्यापुढे आणून त्यावर स्वतःच्या कल्पना लादतो. या विश्लेषणाप्रमाणे पाहता, या दोन कलापद्धतीतील फरक म्हणजे 'मूळ वस्तु आणि तीत लेखकाची भर या दोहोतील प्रमाणाचा फरक' होय, असे म्हणता येईल. आदर्शवादी अथवा अभिजात कलेत वर्ण्य वस्तूचा अंश अधिक असेल; तर सौंदर्यवादी कलेत लेखकाच्या कल्पनेचा भाग अधिक असेल. एवंच, जे अधिक व्यक्तिसापेक्ष ते रोमॅंटिक् होय; आणि जे अधिक व्यक्तिनिरपेक्ष ते क्लॅसिकल् होय. या दोन कलाप्रकारांची स्थूल मानाने आत्मनिष्ठ (subjective) आणि वस्तुनिष्ठ (objective) अशी (अनुक्रमे) जी लक्षणे केली जातात, ती वरील भेदाशी प्रायः जुळती आहेत.

साम्प्रत आपणाला क्लॅसिकल् (आदर्शवादी) आणि रोमॅंटिक् (सौंदर्यवादी) या वाङ्मयीन द्वंद्वाशी कर्तव्य नसले, तरी त्या द्वंद्वाच्या संदर्भात प्रो. अॅलेक्झँडर यांनी व्यक्तिसापेक्ष चित्रण आणि व्यक्तिनिरपेक्ष चित्रण यांमध्ये जो भेद केला आहे, तो आपल्या विवेचनाला उपयुक्त आहे. प्रो. अॅलेक्झँडर यांच्या उताऱ्यातील 'roughly' अथवा 'स्थूलमानाने' हा शब्द दुर्लक्षिण्यासारखा नाही. आदर्शवादी (क्लॅसिकल्) कला म्हणजे अधिक व्यक्तिनिरपेक्ष (Impersonal) कला होय; आणि व्यक्तिनिरपेक्ष कला म्हणजे स्थूल मानाने वस्तुनिष्ठ कला होय, असे हे स्थूल समीकरण आहे !

पण या सर्वातून एक महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न होतो. साहित्यातील वस्तुनिष्ठ (objective) चित्रणपद्धति आणि वास्तववाद ही दोन्ही एकच काय ? महाभारतासारख्या काव्यातील चित्रण बव्हंशी वस्तुनिष्ठ दृष्टीने केलेले आढळेल. पण त्या चित्रणाला 'वास्तववादी' चित्रण म्हणता येईल काय ? किंवा जेव्हा गटेसारखे श्रेष्ठ कलावन्त आणि तत्त्वचिन्तक 'ऑब्जेक्टिव्हिटि' हे श्रेष्ठ साहित्याचे गमक मानतात, तेव्हा ते 'रिअॅलिझम्'ची अपेक्षा करतात काय ? सारांश, वस्तुनिष्ठ वृत्ति आणि वास्तववाद ही दोन्ही एकच होत की काय ? या दोहोंचा एकमेकांशी बराच संबंध आहे, एवढेच म्हणता येईल; पण ती दोन्ही एक मानता येणार नाहीत. दोहोतील फरकांचे, प्रत्यक्ष कलाकृतींच्या अवलोकनावरून काही ठोकळ आडाखेहि सांगता येतील. आदर्शवादी महाकाव्यात वस्तुनिष्ठ दृष्टीची (ऑब्जेक्टिव्हिटीची) अपेक्षा असली, तरी वास्तववादाची अपेक्षा मात्र नसते, असे एक ढोवळ गमक सांगता येईल तसेच, जर्मन् वाङमयावरील एका ग्रंथात वास्तववादी तपशील आणि सौंदर्यवादी वृत्ति या दोन विरोधी स्वभावधर्मांचे

कधी कधी साहचर्यहि दाखवून दिले असले, * तरी सौंदर्यवादी वाङमय सम्पूर्णतया वस्तुनिष्ठ वृत्तीने लिहिल्याचे उदाहरण मात्र दाखविता येणार नाही. या दृष्टीने पाहाता 'वास्तववाद' या संज्ञेचे पाश्चात्य वाङ्मयांवरून दिसून येणारे तीन अर्थ लक्षात घेण्यासारखे आहेत. (१) सूक्ष्म चित्रण-पद्धतीचा अलंकारवजा उपयोग ** (२) वास्तववाद हेच कलेचे ध्येय मानून संपूर्ण कलाकृतीची रचना करणे. (३) पाश्चात्य वाङमयाच्या इतिहासात विशिष्टकालखंडातून उदय पावलेली एक चळवळ.

हे तिन्ही अर्थ एकमेकांना विरोध करणारे नसून नियमित करणारे आहेत, असे आढळून येईल. प्रासंगिक अलंकरण म्हणून वाङमयात येणारा वास्तववाद हा प्रायः सार्वकालीन आहे. प्राचीन संस्कृतातील स्वभावोक्ति–अलंकार वास्तववादी चित्रणाबद्दलची सार्वकालीन आवडच सिद्ध करतो. **"ग्रीवा भंगाभिरामं मुहुरनुपनतः स्यन्दने दत्त दृष्टिः"** *** या श्लोकातील चित्राइतके वास्तववादी चित्र पाश्चात्य वाङमयातहि क्वचितच मिळेल. पण विशिष्ट वस्तूकडे वा दृश्याकडे छायाचित्रकाराच्या दृष्टीने पाहाणारा कालिदास, संपूर्ण जीवनाकडे वा मानवाकडे वास्तववादी दृष्टीने पाहावयास तयार नव्हता. शाकुन्तल आणि रघुवंश यात तो आदर्शवादी दृष्टीने जीवनाकडे पाहातो; तर मेघदूतात तो सृष्टीकडे आणि मानवाकडे आर्त, व्यक्तिनिष्ठ सौंदर्यवाद्याच्या नजरेतून पाहतो. ज्याला आपण आज 'वास्तववाद' म्हणतो त्या दृष्टिकोणातूनच लिहिलेली संपूर्ण साहित्यकृति जुन्या काळात आढळणार नाही, असे म्हणता येईल. पण लेखकाच्या वैयक्तिक सुखदुःखांपासून अलिप्त असे वाङमय जुन्या काळातहि होते. मराठी टीकेतील एक सवंग पारिभाषिक द्वंद्व वापरून बोलायचे झाल्यास, जुन्या संस्कृत वाङमयात 'प्रथम पुरुषी' वाङमयाप्रमाणेच 'तृतीय पुरुषी' वाङमयहि होते. हे तृतीय पुरुषी वाङमय वैयक्तिक सुखदुःखचित्रणापासून अलिप्त असले, तरी ते वाङमयीन व सांस्कृतिक आदर्शापासून अलिप्त नव्हते. जीवित किंवा संसार, 'आहे तसा' रंगवणे हे त्या काळी काव्यात अन्तर्भूत होत नव्हते. भोवतालच्या संस्कृतीच्या व धर्माच्या दृष्टीने जे जीवन आदर्श ठरेल, तेच काव्यात रंगवण्याची परंपरा होती. तसेच, जे चित्रण पूर्वीच्या महाकवींनी व साहित्यशास्त्रकारांनी आदर्श ठरविले असेल, त्याच्याच बरहुकूम वाङमयीन चित्रे रंगविण्याची अहमहमिका लागलेली असे. रूढिमुक्त डोळयांनी पाहा-

---

* German Romantic Literature-Ralph Tymms

** For purposes of incidental embellishment" Shipley Dictionary of Literary Terms

*** शाकुन्तल अं. १

णाऱ्या कवीला या वाङमयात सत्य दर्शनापेक्षा वाङमयीन रूढीचे आणि सामाजिक आदर्शाचेच दर्शन अधिक घडत असे.

वास्तववादाचे नवे निशाण फडकविणाऱ्या लेखकांना, अशा प्रकारे, दोन गोष्टींचा बांध फोडायचा होता,– शिरस्ता मोडायचा होता. एक म्हणजे भावनांनी भारावलेल्या डोळ्यांनी पाहून खऱ्या सृष्टीऐवजी स्वतःची 'खाजगी' सृष्टि रंगवणाऱ्या आत्मनिष्ठ भावनापूजक संप्रदायाचा; आणि दुसरा म्हणजे भोवतालच्या खऱ्याखुऱ्या, कडवट आणि भेसुर दुनियेकडे, दुर्बल आणि दुष्ट मानवाकडे पाठ फिरवून पुराणातील आणि कल्पनेतील आदर्श दुनिया रंगविणाऱ्या संप्रदायाचा. पाश्चात्य वर्गीकरणाच्या भाषेत सांगायचे झाले, तर 'रिॲलिझम्' ही रोमँटिसिझम् विरुद्ध जेवढी प्रतिक्रिया आहे, तेवढीच क्लॅसिसिझम् (आदर्शवाद) विरुद्धहि आहे. कारण, या दोन्हींहि कलाप्रवृत्तीत तत्त्वज्ञानदृष्ट्या खोटेपणा आणि कलादृष्ट्या निर्जीवपणा शिरला आहे, अशी वास्तववाद्यांची तक्रार होती. रोमँटिक् लेखक आत्मकेन्द्रिततेमुळे आणि स्वप्नपूजेमुळे सत्य पाहू शकत नाही; तर 'क्लासिकल्' संप्रदायी लेखक जाणून बुजूनच जे जे असुंदर आणि अपूर्ण ते ते कलाविघातक, असे ठरवून आपल्या मनातील अभिजात जीवन रंगवीत बसतो. अपूर्ण आणि सदोष मानवांनाहि काव्यात स्थान असले पाहिजे. आणि :दुखान्त घटनांनाहि काव्यात स्थान असले पाहिजे, हा आग्रह धरणाऱ्या लेखकांचा संप्रदाय म्हणजे वास्तववादी संप्रदाय होय, असेहि एका अर्थाने म्हणता येईल. आणि या दृष्टीने या संप्रदायाचा व त्याच्या आग्रहाचा थोडा अधिक विचार केल्यास, हे बंड वाङमयीन असत्या विरुद्ध नसून वाङमयीन निर्जीवपणाविरुद्ध होते, असे दिसून येईल.

'वास्तववादाच्या तात्त्विक बैठकीत आणखीहि एक सर्वमान्य होण्यासारखा घटक दिसून येईल. जग माझ्या मनासारखे नाही म्हणून कवीने केलेला आक्रोश, किंवा जी वस्तु कवीला मनासारखी वाटली तिजसंबंधी त्याने गायलेले स्तोत्र या दोहोंनाहि वाङमयात स्थान नाही असे नाही. तथापि सदोष, क्लेशमय, विषम अशा जीविताचे 'आहे तसे' चित्र आम्हांला हवे आहे, त्याच्यावर कवीची सफेतीहि नको, की त्याचे रुदनहि नको, असा आग्रह धरणारा वाङ्मयीन संप्रदाय अधून मधून निर्माण होणे अशक्य नाही. किंबहुना असा आग्रह धरणाऱ्या व्यक्ति वाङ्मयलेखनाच्या प्रारंभापासून जगात आहेतच. इंग्लंडच्या इतिहासात प्रसिद्ध असलेला ऑलिव्हर क्रॉम्वेल् आपली तसबीर काढणाऱ्या चित्रकाराला 'Paint me as I am, or I will not pay you a farthing असे म्हणाल्याचे प्रसिद्ध आहे. वास्तववादी संप्रदायाचा आग्रह कांहीसा त्या थाटाचाच आहे असे म्हणता येईल. "आम्हांला जग आहे तसे

रंगविलेंले पाहावयाचे आहे. तुमचे सौंदर्यपूजनहि नको, की आदर्शपूजनहि नको" ही त्या संप्रदायाची मागणी आहे. आपली या प्रकरणातील मुख्य पृच्छा अशी आहे की, 'आहे तसे रंगवा' या मागणीत आणि त्या बरहुकूम केलेल्या कलानिर्मितीत, एखादे कलातत्त्व अनुस्यूत आहे, की ती मागणी म्हणजे कलेच्या नाजुक पूजनाला विटून गेलेल्या गद्य आणि रुक्ष जीवांची कलाशून्य हाकाटी आहे ? हाच प्रश्न टीकाशास्त्राच्या भाषेत मांडायचा झाला, तर असा मांडता येईल की, 'वास्तववाद' हे एकमेव वाङमयीन मूल्य नसले, तरी "वास्तववादाच्या आग्रहात व पालनात एखादे वाङमयीन मूल्य अन्तर्भूत आहे की नाही? "

अलिप्तता आणि विरक्ति हे कलेत आणि साहित्यात गुण मानले जाती-लसे वाटत नाही; निदान आपल्या साहित्य शास्त्रात मानले गेल्याचे दिसत नाही. तथापि पाश्चात्य वाङमयात 'ऑस्टेरिटि' अथवा कडकपणा हा कधी कधी शैलीचा तरी निदान गुण मानल्याचे दिसून येते. निरलंकृत, अल्पाक्षर' शैलीच्या सामर्थ्यासंबंधी लिहिताना एक पाश्चात्य * मीमांसक लिहितो "The plain style may, as with Swift, be leanness and not poverty of style; strong, sinewy, sparing of words, every one of which tells; and this is perhaps the highest achievement of prose." या वचनात एक स्वतंत्र कलातत्त्व सूचित झाले आहे असे म्हणता येईल. वक्रोक्तीत जसे सामर्थ्य आहे, तसेच प्रसंगी सरल (direct) उक्तीतहि आढळून येईल. शब्दवैपुल्याने जे कार्य होणार नाही, ते कधी कधी मिताक्षर वैखरीने होईल. वाणीची कृशता किंवा तनुता म्हणजे लघुता नव्हे,—दारिद्र्य तर नव्हेच नव्हे. शरीराने कृश आणि लहानखोण्या स्त्रिया भव्य स्त्रियांहून दुसऱ्याच्या मनावर अधिक प्रभाव पाडतात असा जो एक मानसशास्त्रीय ठोकताळा सांगण्यात येतो, तसाच कांहीसा हा शैलीसंबंधीचा ठोकताळा आहे. पण वरील अवतरणातील शेवटचे विधान साहित्यातील आणखी एक वर्गीकरण सूचित करीत आहे. शैलीचा हा कृशपणा आणि कडकपणा विशेषेकरून गद्याचा गुण आहे असेहि हा कला-मीमांसक सूचित करतो.

वास्तववाद म्हणजे कलेतील गद्य पद्धति होय, असाहि या विधानाचा अर्थ करता येईल. प्रो. अलेक्झँडर यांनीच 'कलाक्षेत्रीय काव्य आणि गद्य' (Poetry and Prose in the Arts) असा भेद करण्याचा यत्न केला आहे. पण हा नवा भेद करूनहि मूळ प्रश्न सोपा होत नाही. वास्तववादात कोणते वेगळे कलामूल्य आहे, हा प्रश्न सोडविण्याऐवजी 'गद्यकला' आणि 'काव्यमय

* Prof. S. Alexander

कला' यात फरक कोणता, हा प्रश्न आपण सोडवीत बसणार, एवढाच काय तो फरक. त्यापेक्षा आपल्या मूळ प्रश्नाचाच विचार करणे अधिक सुसंगत आणि फलप्रद होईल. तो प्रश्न म्हणजे "वास्तववादाच्या आग्रहात व पालनात एखादे वाङ्मयीन मूल्य अन्तर्भूत आहे की नाही ? की हा आग्रह एखाद्या वाङ्मयबाह्य उद्दिष्टातून उदय पावला आहे ?"

शैलीतील विरक्तीचा आणि अनलंकृततेचाच आपण थोडा अधिक विचार करू. ही अनलंकृतता म्हणजे वैभवाचा आणि साजशृंगाराचा अभाव नसून साजशृंगारासंबंधीची तुच्छता असते, असे आपणाला दिसूनआले. म्हणजे ही शैली केवळ 'शैली' नसून तिचा उगम एका वृत्तीत आणि दृष्टिकोणात आहे. कलेत कोणतीहि वृत्ति, कोणताहि दृष्टिकोण वर्ज्य नाही. मात्र त्या दृष्टिकोणाचा उद्देश 'चित्र' उभे करण्याचा हवा; वर्ण्य वस्तूचे तुकडे पाडून माहितीची गोळाबेरीज देण्याचा असता उपयोगी नाही. 'विरक्त' शैलीचा उगम विरक्त दृष्टिकोणात आहे असे दिसून येईल. ज्या दृष्टीत आवड, अनुरक्ति, आत्मीयता किंवा 'आदर्शीकरण (Idealization) नाही. अशाहि दृष्टीने जगाकडे पाहाण्याची कलावन्ताला ऊर्मि येणे अशक्य नाही. या दृष्टीतून तो जगाचे जे चित्र काढील, तेहि कलाकृतीत अन्तर्भूत होण्यास हरकत नाही. कारण ते सत्यहि आहे आणि चित्र आहे. शोकान्त नाटय आणि गंभीर महाकाव्य लिहिणाऱ्या कवीला, कधी कधी हीच कडक आणि विरक्त वृत्ति धारण करावी लागते. ऑफिलियाच्या मृत्तिकासंस्काराचा हॅम्लेटमधील प्रवेश; महाभारतातील सौप्तिक पर्व आणि स्वर्गारोहण पर्व, शरदबाबूंच्या पथेरदावीमधील सव्यसाचीच्या जीवनातील कांही प्रसंग यांचे स्मरण केल्यास वाचकांना या विरक्त वृत्तीची कल्पना येईल. अशा दृश्यात जीवनाबद्दलच्या विरक्तीचे दृश्य रंगविलेले असले, तरी आपल्या मनावर त्या दृश्यांचा परिणाम अखेर अनुरक्तीचा आणि आस्वाद्यतेचाच होतो. जणू कवीच्या त्या यथार्थ विरक्तीबद्दलच आपणाला अनुरक्ति वाटू लागते ! हॅम्लेट् आपल्या दिवंगत प्रेयसीला पुरण्याकरता खणलेल्या खड्डयात उडी टाकून, खड्डयात सापडलेली एक जुनी कवटी हातात घेऊन जे जहरी जीवनभाष्य करतो, तेच अखेर खरे आहे. असे वाटून आपले मन नायकासंबंधीच्या आणि स्वतःसंबंधीच्या अनुकम्पेने भरून येते. सारांश सत्याची, संसाराची, किंवा अनुभवाची हीहि एक बाजू आहे हे आपणास पटते; नव्हे, ही इतरांनी व आपणहि सामान्यतः टाळलेली बाजू कवीने धीटपणे आपणांपुढे धरल्याने, आपण कृतज्ञहि होतो आणि टणकहि बनतो. कलेतील विरक्तीने, 'ऑस्टेरिटी'ने किंवा वास्तव दर्शनाने आपणांला जो बलदायी अनुभव येतो, त्याचे वर्णन इंग्रजीत कधी कधी "bracing atmosphere" या शब्दांनी करतात. एखाद्या पर्वत शिखरावरील

गारठ्याचे आणि वादळाचे वातावरण आपणाला जसे बोचरेहि वाटते आणि उत्तेजकहि वाटते, तसे या विरक्त कलेच्या वातावरणात होऊन जाते.

पण वास्तववादी कलेचे एवढे समर्थन केल्यावरहि, केवळ वास्तवता हे कलामूल्य होऊ शकत नाही, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. वास्तवावादासंबंधी आजच्या काळात कित्येक अवास्तव कल्पना असल्याने तर या सत्याकडे विशेषच लक्ष दिले पाहिजे. वर निर्देशिलेल्या संपूर्णतया आत्मनिरपेक्ष, भावनाविरोधी चित्रणात देखील 'वास्तवता' हे कलामूल्य नाही. फार तर त्यात वैराग्य किंवा आत्मनिष्ठुरता हे कलामूल्य आहे, असे म्हणता येईल. या ठिकाणी कलामूल्य हा शब्द मी निर्मितीचे, गुंफणीचे, अथवा निवडीचे तत्त्व (Selective principle, Unifying principle) या अर्थाने वापरीत आहे. केवळ वास्तवता ही कला होऊ शकत नाही. आदर्शीकरण (Idealization) किंवा भावनात्मक पूजन या दोहोत काव्याचा, आवडीचा व निवडीचा भाग आहे; पण केवळ वास्तवतेत कसलीच निवड नाही; कसलेच कलातत्त्व नाही. आणि म्हणूनच निर्भेळ, न निवडलेली, न गुंफलेली, न रचलेली अशी वास्तवता ही कला होऊच शकत नाही. उलट वास्तवतेतून रचनात्मक निवड केली की, ती निर्भेळ वास्तवता राहत नाही. कारण त्या निवडीचे उद्दिष्ट वास्तवता हे न राहता, दुसरेच काही तरी बनले आहे, असे आढळून येईल.

पाश्चात्य वाङ्मयात व आपल्याकडेहि, वास्तववादाने अनेक रूपे घेतल्याचे आढळून येईल. वास्तववादी कलेत वस्तूचे 'केवळ' रूप चितारण्याचे उद्दिष्ट असेल, तर वास्तववादाची देशकालानुरूप अनेक रूपे झालेली वाङ्मयाच्या इतिहासात दिसून यावीत हे प्रथमदर्शनी एक नवलच वाटेल. पण कलेतील वास्तव हे केवळ वास्तव नसते, तर त्यात आणखी कशाचे 'हीण' किंवा विजातीय द्रव्य असते, हेच यावरून सिद्ध होते. फ्रान्समधील झोला, फ्लोवेअर, मोपसाँ आदि लोकांचा वास्तववाद रशियातील टॉल्स्टॉय् आणि डोस्टॉव्हस्कि इत्यादींच्या वास्तववादाहून भिन्न होता. महाराष्ट्रात हरिभाऊंनी वास्तववादाचे युग कादंबरीच्या क्षेत्रात सुरू करून मराठी कथावाङमयाला प्रौढता आणली,—मुक्तामालेच्या काळातील बालिश वळण संपुष्टात आणले, अशी मान्यता विसूभाऊ राजवाडयांच्या सारख्या दुर्वासितुल्य टीकाकारानेच दिली आहे. अद्भुतसृष्टीतील कथानकातून वाचकांना त्यांनी समकालीन महाराष्ट्रीय समाजाच्या चित्रांकडे नेले. पण समकालीन 'समाजचित्रण' हा वास्तववादाचा अर्थ पुढच्या पिढीतच पुष्कळ अंशी बदलून, य. गो. जोशी आणि माटे यांनी व्यक्तींचे आणि तऱ्हांचे विरोधात्मक, सूक्ष्म, पण हुबेहूब चित्र काढण्याचा नवा एक पायंडा पाडला. हा वास्तववाद अधिक सूक्ष्म होता; पण त्याच्या चित्रांचा फळक छोटा होता.

अनुक्रमणिका

तो आंगठीच्या खडयातला वास्तववाद होता. त्यानंतरच्या पिढीने सूक्ष्म विरोधाभासात्मक चित्रांची हीच परंपरा पुढे नेली. पण त्यांनी बाह्य वर्तनाच्या आणि प्रकट हेतूंच्या चित्रणाऐवजी अप्रकट मनाचे चित्रण करण्याचा पायंडा पाडला. अप्रकट मनाच्या चित्रणाबरोबर वास्तवतेच्या हेतूतहि थोडा बदल झाला. मुळातच वास्तववादाचा 'कॅमेरा' अप्रिय आणि अनास्वाद्य विषयांकडे अधिक वळतो, असा बोभाटा होता. झोला, फ्लोबेअर आणि मोपसाँ हे अशा अप्रियदर्शनाबद्दलच ख्यात आहेत, म्हटले तरी चालेल. आपल्याकडे हरिभाऊंच्या निधनानंतर विठ्ठल वामन हडप यांनी या प्रकारचा वास्तववाद मराठी वाङ्मयात आणण्याला प्रारंभ केला होता.* परन्तु सम्प्रदाय बनण्याइतके महत्त्व त्यांच्या शीघ्रगति वाङ्मयाला येऊ शकले नाही. डॉ. केतकर यांची खोडकर प्रतिभा कित्येकदा वाट वाकडी करूनहि लब्धप्रतिष्ठितांच्या गुप्त कर्माकडे वळे. पण या वाकड्या वाटा म्हणजे केतकरांच्या कथानकातील प्रमुख भाग नसून, प्रायः विषयान्तरे असत. फ्रॉइड-संप्रदायी मनोविश्लेषण हे वास्तववादाचे सूक्ष्मतर साधन म्हणून ज्या पिढीने हाती घेतले, तिला मात्र आवर्जून अनास्वाद्य विषयाकडे वळणे प्राप्तहि झाले आणि समर्थनीयहि वाटले. अशा रीतीने १९४५ नंतर मराठीत एक वेगळाच वास्तव-उदयाला आला.

मराठी लेखकाच्या वाचनात यूरोपीय कथा-लेखकांच्या खालोखाल येणारे लेखक म्हणजे बंगाली होत. या लेखकांपैकी शरश्चन्द्र चट्टोपाध्याय यांच्या वाङमयातील वास्तववाद हा वास्तववादाची एक विलक्षण जात या दृष्टीने अभ्यसनीय आहे. जर्मन रोमँटिक् वाङ्मयावरील आपल्या ग्रंथात राल्फ् टिम्स् यांनी 'आत्मनिष्ठ वास्तववाद' म्हणून एक विवाद्य प्रकार निर्देशिला आहे. त्या प्रकारात शरदबाबूंचा वास्तववाद पडेल असे मला वाटते. एका बंगाली टीकाकाराने आपल्या इंग्रजी लेखात शरदबाबूंच्या वास्तववादासंबंधी ही संज्ञा वापरलीहि आहे.

वास्तववादाच्या प्रवाहाचा आलेख काढणे; त्या प्रवाहातून निघालेल्या विविध धारांचे वर्गीकरण करणे इ. कामे सापेक्षतया सोपी आहेत. पण वास्तववादावरील पाश्चात्य टीकावाङमयात ह्याच प्रयत्न अधिक झालेला आढळेल. वास्तववादासंबंधी चिन्तन आणि वाचन करतांना मला जो प्रश्न सुचला व आडला त्याचे विवेचन मला अद्याप तरी कोठे आढळले नाही. आतापर्यंतच्या विवेचनात एके जागी सूचित केलेला तो प्रश्न असा: "वस्तुनिष्ठ कला आणि वास्तववाद ही दोन्ही एकच की भिन्न ? भिन्न असल्यास (मला स्वतःला ती भिन्न वाटतात) ती कशात भिन्न आहेत ? व त्यातील कोणती प्रवृत्ति कलेला अधिक परिपोषक आहे ? '

(पृष्ठ ४२ वर)

* (१) मास्तरीण काकू (२) बहकलेला ब्रह्मचारी इ०

२० टिळक

ले.—भवानीशंकर श्रीधर पंडित

(या लेखाचा पूर्वार्ध सप्टेंबरच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे.)

—४—

टिळकांची कविता त्यांच्या पूर्ववर्ती व अनुवर्ती कवींच्या कवितांपेक्षा अगदी वेगळी आहे. तिच्यात पांडित्याचा प्रकर्ष नाही, सुधारणेचा अभिनिवेश नाही किंवा सौंदर्यलोलुपतेचा नटवा वेप नाही. ती जशी प्रासादिक तशीच प्रेमळ, प्रसन्न व पावन आहे. मानसशास्त्राची कसोटी लावली तर तिचा उगम भावनात्मक वृत्तीपेक्षा ज्ञानात्मक व प्रेरणात्मक वृत्तीत अधिक आहे. टिळकांनी दोनतीन ठिकाणी कवितेविषयीच्या त्यांच्या कल्पना मांडल्या आहेत. आपल्या पत्नीला ते पत्र पाठवितात;—"काव्य म्हणजे व्याकरण नव्हे, शुद्धलेखन नव्हे, अलंकारशास्त्र नव्हे, काव्य म्हणजे काव्य ! वस्त्राभरणे म्हणजे सौंदर्य नव्हे, आधी सौंदर्य, मग ही उपकरणें." (स्मृतिचित्रें भा १ पृ. १८०) "वर्ण्य विषय स्वतःचा अनुभव वनून जाई तों त्याच्याशी तादात्म्य पावणें, व त्याने उत्पन्न केलेल्या मनोभावनेच्या प्रवाहात यथेच्छ पोहणे किंवा त्याच्या आधीन होणें हे कविपणाचे पहिले लक्षण आहे. व्युत्पत्ति म्हणजे काव्य नव्हे. प्रतिभा कारणं तस्य व्युत्पत्तिस्तु विभूषणम्" ('स्मरणी' प्रस्तावना नागपूर ९-१-१५) कवितेला व्युत्पन्नमतित्वाची आवश्यकता नाही हे टिळकांचे म्हणणे खरे असले, तरी ते कवितेला अप्रत्यक्ष रीतीने पोपक व साहाय्यक असते हे नाकारता येत नाही. स्वतः टिळक व्युत्पन्न पंडित होते. परंतु त्यांनी आपल्या प्रतिभेवर पांडित्याची कुरघोडी होऊ दिली नाही. कविता रसिकसापेक्ष आहे ही वस्तुस्थिति टिळक विसरले नव्हते. 'कवि आणि रसज्ञ' या कवितेवरील टिपेत ते म्हणतात, "एका कवीने 'येनामकेचिदिह्नः प्रथयन्त्यवज्ञां' हा भवभूतीचा श्लोक म्हणून मला व माझ्या काव्याला रसज्ञाची गरज नाही. माझा मी गात बसेन अशी शेखी मिरविल्यावरून सुचलेले विचार पुढील कवितेंत गोवले आहेत." (प्रभात सप्टें. १९१४). मिस् विसेल यांनी एकदा त्यांच्या एका कवितेत कांही फेरफार सुचविला असताना त्यांनी 'कविता ही ईश्वरदत्त आहे' या अर्थाचे उत्तर पुढील शब्दात दिले; त्याचे 'यस्य निःश्वसितं वेदः' या वेदवाणीशी साम्य आहे;—

ही निःश्वसिते, कोण सोडिते, मम हृदयी तें
विचारुनी, भिउनी त्याला

पुढे करा मग कर अपुला
रंग नभीचे कसे तरी
कसे तरी ही मजा खरी
किती आपुली, फुलें उमललीं, कुठे लटकलीं,
चिन्ता नच ही वेलीला,
सुंदरतेची ही लीला !

या अंतिम ओळीत त्यांनी कवितेची सुंदरता सहजतेत आहे हे तत्त्व सूचित केले आहे.

टिळकांच्या कवितेचा उद्रेक विशेषतः ज्ञानात्मक व प्रेरणात्मक वृत्तीतून असल्यामुळे तिचा प्रवाह शांत, शीतल व निर्मळ आहे. वस्तुतः ज्ञानात्मक प्रेरणात्मक आणि भावनात्मक हे वृत्तीचे तीन प्रकार परस्परांपासून वेगवेगळाले असतात असे मुळीच नाही. त्यांची एकमेकात सरमिसळ झालेली असते. टिळकांच्या कवितेत पहिले दोन प्रकार प्रबल आहेत. मात्र त्यांच्या कवितेची आविष्कृति भावनात्मक आहे. ज्ञानाचा आणि प्रेरणेचा संबंध बुद्धीशी आहे आणि भावनेचा संबंध हृदयाशी आहे. टिळकांची प्रवृत्ति बुद्धिगम्य तत्त्वान्वेषणाकडे असली, तरी ते शुष्क किंवा नीरस नाही. याचे कारण त्याची अभिव्यक्ति काव्यमय आहे. टिळक तत्त्वज्ञान सांगत असले, तरी त्यांची भूमिका कवीची आहे हे नीट लक्षात घेतले पाहिजे.

भावनेचा अतिरेक कित्येकदा गढूळ होण्याचा संभव असतो. त्यामुळे रतीची परिणति जुगुप्सेत आणि उत्साहाची परिणति क्रोधात होण्याची भीति असते. टिळकांच्या कवितेत स्थायी भावांची मातब्बरी फारशी आढळत नाही. कविता प्रसवताना ते मानवी मनातील मूलभूत प्रेरणांनी विशेष उत्तेजित होतात. एका संस्कृत सुभाषितात मुख्य मुख्य प्रेरणांचा अत्यंत कौशल्यपूर्ण रूपकात्मक निर्देश आहे;—

'सत्यं माता, पिता ज्ञानं, धर्मो भ्राता, दया सखी
शान्तिः पत्नी, क्षमा पुत्रः षडैते मम बांधवा :'

टिळकांना लहानपणा पासून काम, क्रोध, मद, लोभ, मोह, मत्सर व दंभ या विकारांचा तिटकारा होता. या क्षुद्र विकारांना आणि यांच्याशी संबंध अस-असलेल्या क्षुल्लक विषयांना त्यांच्या कवितेत स्थान मिळालेले नाही.

टिळकांच्या स्फुट कवितांचा प्रपंच करताना त्यांनी लिहिलेल्या नैमित्तिक कविता दृष्टिआड केल्या पाहिजेत. 'अभीष्ट चिन्तन', 'राजनिष्ठा', 'ब्रिटेनिए' आदि त्यांच्या कविता नैमित्तिक आहेत. आणि 'तो आम्हा म्याला', 'टिमकीवाला',

'जन्मा आला हेला' आदि त्यांच्या व्याजोक्तीच्या कविता प्रासंगिक आहेत. 'आमचे तिवूनाना' ही भाषांतरित कविता ते उपरोधपूर्ण करावयास गेले, परंतु तिचे मुख गंभीर झाले ! टिळकांची मनोवृत्ति विनोदाला अनुकूल नव्हती. ते व्याजोक्ति लिहीत. परंतु नंतर त्यांना पस्तावा होई असे त्यांच्या पत्नींनी नमूद केले आहे. त्यांच्या नैमित्तिक कवितावरून त्यांच्या देशनिष्ठेची शंका घेणे लज्जास्पद आहे. अशा नैमित्तिक कविता त्यांच्या समकालीन नामवंत कवींच्या कविता संग्रहातहि आढळतात.

टिळकांचे जीवन श्रद्धामय होते. ईश्वराच्या अस्तित्वावर त्यांचा अढळ विश्वास होता. त्यामुळे त्यांच्या एकूण एक कवितातून श्रद्धेचा सूर निनादला आहे. 'रानांत एकटें पडलेलें फूल' ही त्यांची कविता साधी सरळ व सोपी आहे. परंतु तिच्यात 'सुगंधाच्या आड चर्मचक्षूंना गोचर न होणाऱ्या परमेश्वराचे कणा-कणातील अस्तित्व सूचित केले आहे;—

परि फिरतां फिरतां दिसलें
फुल दगडा आड लपालें—लहानसें

हे चरण आळवताना टिळकांना मूर्तिपूजेमागील 'ईश्वरीय सत्ता' तर अभि प्रेत नसावीना असा प्रश्न मनात उभा राहतो. ऑगस्ट १९०२ च्या रोजनिशीत ते लिहितात, "माझे डोळे येऊन आपण आता खचित आंधळे होणार असे मला वाटत आहे. मला पुढे कांही दिसत नाही. अशा प्रसंगी मी जसें तोंडाने गाइले तसे हे अल्पकाव्य दुसऱ्याने लिहून घेतले आहे. अर्थात् यात कांही दोष सापडतील. तरी मी खरोखरच आंधळा झालो तर आपल्या हातून रसिकजनाची सेवा कितपत होईल हे मला माझ्यावरून समजून येत आहे." (करमणूक २७ डिसें. १९०२) आणि पुढे ते परमेश्वरापाशी पदर पसरतात;—

अनेकविध दर्शनीं मन चळे तुझ्यापासुनी,
म्हणून जग चिंतिते तुज विलोचनां झांकुनी;
बघेन तुजलाच मी सतत अंध झालों तरी,
नकोत नयने प्रभो ! वसति मन्मनी तूं करी !

'माझी फुलें काय झालीं ?' ही टिळकांची कविता सात्त्विक अनुतापाच्या प्रकटीकरणामुळे उत्कृष्ट उतरली आहे. तिच्यातील भाविकता हृदयंगम आहे. 'जीवित', 'संसार', 'विद्या', विक्रम', 'मान', व 'किर्ति' ही सर्व फुलें विशीर्ण होणारी, हरवणारी आणि चोरीस जाणारी आहेत. तेव्हां त्या परमेश्वराच्या पायांवर कोणते फूल अर्पण करावयाचे असा मनुष्यापुढे प्रश्न उभा राहतो; आणि मग तो पश्चात्तापदग्ध अंतःकरणाने उद्गारतो;—

झालों वृद्ध अतां, कसा फिरुं कुठे, आणूं फुलें कोठुनी–
अर्पाया तुज ईश्वरा ? विसरलों कैसा तुला यौवनीं !
घे घे एक मन:प्रसून उरलें या देहपात्रासह
वाटो हें तुज वत्सला प्रभुवरा ! अत्यंत सौख्यावह.

टिळकांच्या कवितेत कल्पनांचा फारसा आढळ होत नाही हे खरे. परंतु मनावरील फुलाची व देहावरील Flowerpot ची येथील कल्पना जशी नूतन तशीच पावन आहे.

'कुणास्तव कुणी तरी' या टिळकांच्या कवितेखाली तिला इंग्रजी कवितेचा आधार असल्याचा उल्लेख आहे; 'केवढें हें क्रौर्य !' ही त्यांची कविता ऑगस्ट १९०१ च्या 'काव्यरत्नावली'त 'How very Cruel' या इंग्रजी मथळ्याने आली होती. ३ जून १९११ च्या 'करमणुकी'त 'O Lovely Star' या इंग्रजी मथळ्याची त्यांची एक मराठी कविता आहे. टिळकांचा इंग्रजी कवितेचा अभ्यास होता. परंतु तो तत्कालीन अमेरिकन कवींच्या कवितांचा होता असा माझा तर्क आहे. त्यांनी मिसेस ब्राउनिंगच्या 'सॉनेटस् फ्रॉम पोर्च्युगीज'चें 'फिरंगी संगीत' नावाचे रूपान्तर करण्यास आरंभ केला होता हे खरे. परंतु वर्डस्वर्थ, बायरन्, शेले, कीटस् या रोमॅंटिक कवींपैकी कुण्याहि कवीच्या कवितेचा प्रभाव त्यांच्यावर दिसत नाही. त्यांची सृष्टिविषयक कविता श्रद्धायुक्त आहे. परंतु तिच्यात वर्डस्वर्थमधला उपदेशक व प्रचारक दिसत नाही. सृष्टिविषयक कवितात 'वनवासी फूल' हे त्यांचे खंडकाव्य सर्वोत्कृष्ट आहे. त्यात भक्ति आणि ज्ञान आहे. परंतु पुराण्या वैराग्याची जागा नव्या अनुरागाने घेतली आहे. प्रवृत्ति-परता हा टिळकांच्या कवितेचा एक खास विशेष आहे. टिळक एकलकोंडे, माणुसघाणे व समाजविमुख नव्हते. तशा स्वभावाच्या फुलाचा वरकरणी धिक्कार करून ते त्याला प्रेमाने समजावतात –

म्हणे कवी 'तूं' मी ही होइन विशीर्ण एके दिवशीं,
　निवास येथिल विवास केवळ सुमना तुजशी मजशी !
तथापि जगता परकें व्हावें, जाउन दूर रहावें,
　या शीलाला कसें कळेना सज्जनशील गणावें !
म्याडपणाचा, स्वार्थाचा वा परमावधि हा होय;
　अशा नराचा मृताहुनीही मृत झालेला काय !
कृतघ्न हें जग, जे तें स्वार्थी, यांत न शंका कांही
　परन्तु तेणें प्रीतिकरांची प्रीती सरली नाही

आणि त्याला *'जनसेवे'चा आदेश देऊन 'ईश्वरा'ची ओळख करून देताना म्हणतात;–

---

*'जनसेवा ही ईश्वरसेवा । त्याविण दुसरा धर्म न ठावा । देव आणखी धर्म दिसावा । एक सदा ज्यातें ।। ('लोकमित्र' ही कविता पहा)

काम निराळा, प्रेम निराळें, सदैव वाटे ज्यातें,
कधी कल्पिलें नसे जयानें विषामृताचें नाते;
असा जरी तुज रसिक जगीं या पहावयाचा झाला
तरी फुला ! तूं भेट येउनी असेन तेथें मजला
पुन्हा सांगतों, जीवन आणि प्रेम भिन्न नच, एक !
प्रेमहीनता मृति, केवळ तो स्वार्थाचा अतिरेक !
प्रेम मुक्तिसुख, परमेश्वर हा, स्वर्ग हाच, ये पाहूं,
प्रेमरूप ये होऊं आपण, देवासन्निध राहू !
प्रेमनाम जगदीश फुलारे ! काय आणखी सांगू ?

टिळकांच्या कवितेवर ख्रिस्ती तत्त्वांचा व मतांचा ठसा बराच आहे. वरील उताऱ्यात God is Love ही बायबलमधील शिकवणूक सहज ओघात बाहेर पडली आहे. परंतू या शिकवणुकीचे स्वरूप सार्वकालीन व सार्वजनीन असल्यामुळे ती अत्यंत परिणामकारक व उदबोधक झाली आहे.

—५—

टिळकांची प्रेमाची कल्पना अतिशय व्यापक होती. त्या उदात्त कल्पनेचे ते एके ठिकाणी स्पष्टीकरण करतात; – "प्रीतीची कल्पना अति उदार व उच्च आहे. प्रीतीकरिता सांसारिक स्वार्थाचा त्याग करावा लागतो. आमच्या लोकांची प्रीतीची कल्पना स्त्रीपुरुपांच्या पशुवृत्तीच्या पलिकडे फारच क्वचित् जाते" (सु. समा. जुलै ९८) अभिजात संस्कृत कवींच्या ललित कृतींचा रसास्वाद घेऊन देखील त्यांच्या स्त्रीविषयक कवितात कोठेंहि कायिक श्रृंगार नाही हे लक्षणीय आहे. 'माझी भार्या' हे आपल्या पत्नीला अनुलक्षून रचलेले काव्य त्यांनी प्रथम १८८७ मध्ये प्रसिद्ध केले. तेव्हां ते ऐन पंचविशीत होते. त्याच्या प्रस्तावनेत ते लिहितात; – "ज्यात सौंदर्यवर्णन, श्रृंगारिक भाषण, सुरतप्रसंग वगैरे कांहीच नाही असली ही सोवळी कविता वाचकांस कितपत रुचेल हे सांगवत नाही." टिळक प्रारंभापासून स्त्रीदक्षिण होते. पुरुष संसाराच्या रथात बसून पराक्रम करणारा महारथी आहे, तर तो रथ चालवणारी स्त्री कुशल सारथी आहे अशी त्यांची स्त्रीपुरुष सहवाससंबंधी कल्पना होती. स्त्री व पुरुष ही संसाररथाची दोन चक्रे आहेत ही परंपरागत चमत्कारिक कल्पना त्यांनी स्वीकारलेली नाही. पुरुष व स्त्री यांचा उत्कर्ष व अपकर्ष परस्परांवर अवलंबून आहे ही कल्पना टेनिसन्ने आपल्या 'प्रिन्सेस' मध्ये मांडली आहे; –

*God is love; and he that dwelleth in love dwelleth in God, and God in him—New Testament, Acts. X. 34

'The woman's cause is man's, they rise or sink
Together, dwarfed or God-like, bound or free
If she be small, slight-natured, miserable
How shall man grow ?'

टिळकांच्या 'स्त्रीपुरुषा'त याच विचाराचा सुंदर व सरस भावानुवाद आहे; —

सुख एकाला, दुःख दुजाला केवळ ही भ्रांति !
नरनारी जगिं बरोबरी ही चढती, कोसळती !

टिळकांचे लक्ष्मीबाईंवर हार्दिक प्रेम होते. त्या काळच्या वहिवाटीप्रमाणे दोघेहि लग्नात लहान होती. दोघांनी परस्परांच्या सहवासात सुखदुःखांचा अनुभव घेतला होता व एकमेकांसाठी खस्ता खाल्या होत्या. टिळक जात्याच प्रेमळ खरे. पण तरुणपणी चंचळ व तापट होते. त्यामुळे उभयतांचे प्रेमाचे वादविवाद होत. टिळक सांगतात; —

जवळी असता एक दिवस नच कलहावाचुन गेला
जातां दूरी सदा चिंतितो आतां मी भार्येला.

लक्ष्मीबाईंच्या साध्या, सरळ, निष्कपट व प्रेमळ स्वभावाचे वर्णन 'माझ्या भार्ये'त अतिशय हृदयंगम आहे. आपल्या पदरी पडलेल्या खरोखर शहाण्या असणाऱ्या 'वेड्यागोळ्या'चे टिळकांनी दोन ओळीत थोडक्यात मोठे परिणामकारक वर्णन केले आहे; —

स्वभावोक्ती साधी म्हणुनच अलंकारि सरसा
प्रिया माझी साधी म्हणुन गमतो स्वर्गच जसा !

टिळक ख्रिस्ती पंथात दीक्षित झाल्यावर परस्परांना पांच वर्षे विरहात काढावी लागली. पुढे उभयतांचे पुनर्मीलन झाले. 'विरह', 'शुद्ध प्रेम आणि वियोग', 'ओझरते दर्शन', 'कुणास्तव कुणीतरी' इत्यादि टिळकांच्या कवितांखाली स्थलकालनिर्देश नाही. या कविता त्यांनी कदाचित् विरहात लिहिल्या असतील किंवा मीलनानंतर रचल्या असतील. परंतु त्यांची स्फूर्ति विरहात आहे. 'ओझरते दर्शना'वर टीप आहे. "नायक आणि नायिका परस्परांपासून वियुक्त झाली असता एकदा त्यांना परस्परांचे ओझरते दर्शन होते. त्याचे वर्णन करून नायक ते नायिकेकडे पाठवितो व ती त्यांत योग्य फरक करून त्याच्याकडे परत पाठविते. (मनो. जुलै १९०९) असा प्रसंग त्या दोघांच्या आयुष्यात आल्याचा स्मृतिचित्रात उल्लेख आहे. टिळक पत्रे व तीहि कवितावद्ध पाठवीत असा दुसरा उल्लेख आहे. असे एक पत्र साधे परंतु भावमधुर आहे; —

तुजवाचुन मी, मजवाचुन तूं चिंतेंत पडलों जैशी
लक्ष्मीवाचुन वाचुन मेला जन ठाउक सर्वांशी

ग्रहण लागुनी चंद्र लपाला म्लान चंद्रिका झाली
एक सोडुनी म्हणुनि दुज्याला गेले कां कधिकाळी ?
विरह असो; परि काय कुठारे मरणाच्याही दयिते
प्रेमबंध हा तुटणें किंवा विगलित होणें नुसतें ?
वेडा मी ! तूं मला ठाउकें वेडी ! वेडी दोघे
म्हणुन आपुलें इतकें जमलें नको सांगणें ओघें
असलीं वेडी जनांत कुठली सुखें सखे ! नांदावी ?
कार्यव्यापृत जनाकडोनी सदा गांजली जावी !
प्रिये ! चल गडे, जाऊं राहूं दूर अरण्यीं दोघे
अविच्छिन्न अन्योन्यसंगमी सौख्यें लुटूं अमोघे
पर्णकुटी बांधीन तुला मी साधी पण मौजेची
मृदुल सुगंधित शय्या देइन रचून वन्य फुलांची
वाळ आपुला केवळ अपुल्या प्रेमाचें फळ नामी

तेथें मी तव राजा, तूं गे ! धनीण माझी राणी
अर्थ मी प्रिये ! तूं मग माझी गोड सुधामय वाणी (सु. स. ९८)

टिळकांसारख्या प्रतिभासंपन्न प्रेमळ पतीच्या सहवासात लक्ष्मीबाईच्या काव्यस्फूर्तीचे बीज रुजले, पालवले, फुलले आणि फळले. त्यांच्या 'स्मृतिचित्रा'चे चार भाग म्हणजे प्रांजल व प्रामाणिक अंतःकरणाचे जिवन्त व जातिवंत काव्यच आहे ! "प्रसाद आहे ! प्रतिभाहि आहे ! प्रेमौध गानांतुन नित्य वाहे !" या शब्दांत रे० टिळकांनी लक्ष्मीबाईच्या कवितेची जी प्रशंसा केली आहे, ती योग्य नाही असें कोण म्हणेल ?

'सुशीला' या टिळकांच्या खंडकाव्यात स्त्रीशिक्षण, गृहस्थाश्रम, प्रेमविवाह, एकपत्नित्व इत्यादि स्त्रीजीवनविषयक प्रश्न आले आहेत. टिळक ज्ञानाश्रयी कवि होते. ते भावजीवि कलाकार नव्हते. त्यामुळे काव्यात कथेचे कलात्मक स्वरूप आढळत नाही. परंतु टिळकांनी वरील प्रश्नांना काव्यमय करून कथा चित्ताकर्षक केली आहे. यात सुशीलेच्या मुखाने सम्यक् व सुखी विवाहाची कल्पना वदवली आहे;—

'पूर्ण विकसित जाहल्यावरी दोन । मनें प्रेमाच्या बंधनेंकरून—
एक करुनी अर्पणें ईश्वराला', । म्हणे युवती 'उद्वाह'नाम याला.

हे काव्य लिहिले त्यावेळी मुलींसाठी मिशनच्या शाळा असत. तेव्हां या काव्याची नायिका सुशीला ही ख्रिस्ती दाखवली आहे. तिला आपल्या रूपाचा

अभिमान वाटतो व ती चारुदत्ताची विवाहाची मागणी धुडकावून लावते. तिच्या या अहंकाराला शिक्षा म्हणून देव तिला देवीच्या रोगाने अत्यवस्थ करतो आणि तिचा चेहेरा विद्रूप होतो. देवाच्या अप्रसन्नतेची ही कल्पना देवासंबंधीच्या उच्च भावनेला साजेशी नाही. टिळकांनी या काव्याचा शेवट मंगलाष्टकाच्या पद्धतीने केला आहे. या काव्याचे रे. विन्स्लो यांनी इंग्रजीत भाषान्तर केले आहे. प्रेम अन्तरंगावर वसते, बहिरंगावर नसते हे तत्त्व या काव्यात अत्यंत चपखल दृष्टान्ताने मांडले आहे;–

'शुक्ति नलगे मज हवे खरे मोती । रूप नलगे तव, हवी तुझी प्रीती !
पात्र सोन्याचें असो मृत्तिकेचे । वेड मजला आंतल्या अमृताचें

टिळक ख्रिस्तमतानुयायी खरे. परंतु विवाहसंबंधात अनुरूपता, कुलीनता, शील इत्यादि बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत या मताचे होते. 'इकडची पत्रें, तिकडची पत्रें' या नांवाची त्यांची एक गोष्ट आहे. (मनो. डिसें. १९१७) तिच्यातला मार्तंड पुरुषोत्तम हा बाप प्रभाकर या आपल्या मुलाला पत्र पाठवितो, "तूं मला न कळवितां बायको पाहिली आहेस. ते एक लोढणें आपल्या गळचात बांधून घेत आहेस. जेणे करून आपल्या जातीला, आपल्या कुळांला वट्टा लागेल असलें भयंकर कृत्य करून बसूं नको ! आपण ख्रिस्ती खरे. तरीपण व्यवहारांत पुष्कळ गोष्टींचा विचार केला पाहिजे. तूं राजकन्या वरीत आहेस. पण आपल्यासारख्या गरीबाला ती राजकन्या सुखावह होणार नाही. आपल्या जातींतून ख्रिस्ती झालेले लोक तुला तुच्छ मानतील. तुझी मुलेंबाळें आजोळी जातील, आणि तेथील रहाणी, तेथील बोली घेऊन परत येतील. साहेब विलायतचे, तरी त्यांचे मत भिन्नज्ञातीयांच्या विवाहा विरुद्ध आहे. तरी विचार कर."

–६–

पतिपत्नीप्रेमात अपत्याला विशेष स्थान आहे. अपत्याच्या संभवाशिवाय पतिपत्नी प्रेमाची पूर्तता होत नाही. अपत्य हे पतिपत्नीला समान असल्यामुळे त्याच्यात त्या उभयतांच्या सुखदु:खांचे धागे गुंतलेले असतात. टिळक मिशन मार्फत प्रसिद्ध होणाऱ्या 'बालबोधमेवा' या मासिकाचे अनेक वर्षे संपादक होते. त्यात त्यांनी मुलावरती अनेक कविता रचल्या आहेत. त्या 'बालोद्यानां'त समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या बालकविता वत्सल रसाने ओतप्रोत आहेत. मुलांकरिता दोन प्रकारची कविता असते. जी कविता मुलांसाठी असते तिची वाचकमंडळी मुले असतात. परंतु जी कविता मुलांसंबंधी असते, तिचे वाचक प्रौढ असतात. टिळकांना 'फुलामुलां'चे कवि म्हणतात. कारण त्यांनी फुलांवर व मुलांवर अगणित कविता लिहिल्या आहेत. परंतु त्यांच्या बहुतेक कविता

मुलांविषयी आहेत. मुलांची कविता लिहिताना टिळक क्षणभर आपले प्रौढपण विसरत नाहीत. त्यामुळे कविता लिहितांना पुष्कळदा त्यांच्यातला शिक्षक जागृत होतो आणि पाठ देऊं लागतो;—

हा बाळ पाहुन अनेकविधां पदार्था । नाचे, हसे, पुसतसे वडिलास अर्था
जिज्ञासु हा सकल विश्व शिकावयाला । तो धन्य ! तो सुकृति ! जो शिकवी तयाला

'एक अमेरिकन मुलगी' व 'ताइ तूं फूल गडे ! माझ्या' या टिळकांच्या दोन वत्सलरसाच्या कविता अप्रतिम आहेत. यांपैकी 'अमेरिकन मुलगी' साधी व सुंदर असली, तरी निरनिराळ्या अलंकारांनी युक्त आहे.* टिळकांच्या आग्रहामुळे दत्तांनी व बालकवि ठोंबऱ्यांनी 'बालबोध मेव्या'त मुलांसाठी कविता लिहिल्या. हे दोघेहि मुलांच्या दृष्टीने जगाकडे पाहू शकत असल्यामुळे यांची बाळगाणी बाळागोपाळांना आवडतील अशी गोड उतरली आहेत. लक्ष्मीबाईंनी उतारवयात आपल्या नातवडांसाठी लहान लहान गाणी लिहिली आहेत. त्यावरून त्यांना लहान मुलांचे मानसशास्त्र टिळकांहून अधिक कळत होते असे दिसते.

—७—

कौटुंबिक जीवनातील पत्निप्रेम आणि वात्सल्य या पवित्र भावनांप्रमाणे टिळकांचे कविमन सामाजिक जागरणाच्या कार्यात आणि राष्ट्रीय चळवळीत रमत होते. सामाजिक जीवनात त्यांचे कविमन बंडखोर नव्हते असा त्यांच्यावर आक्षेप आहे. ज्याने मनोमन साक्ष पटताच नातेवाईकांच्या रागाची व इष्टमित्रांच्या नाराजीची क्षिति न बाळगता निराळ्या धर्ममताचा स्वीकार करून आपले मनोधैर्य (moral courage) प्रकट केले, त्याच्या ठायी अनिष्ट सामाजिक प्रवृत्तींचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य नव्हते असे विधान करणे हास्यास्पद आहे. टिळकांची समाजसुधारणा केवळ शाब्दिक नव्हती. तिला कृतीचे अधिष्ठान होते. 'ब्राह्मण किंवा महार' या अस्पृश्यतानिषेधक कवितेत त्यांनी समाजाला शिव्याशाप देऊन उगाच थयथयाट केलेला नाही. त्या कवितेत नसत्या अभिनिवेशाचा फेस नाही, तर शांत व समतोल विवेकाचे 'जीवन' आहे;—

मी ब्राह्मण वा महार मी, । गणीं न कवणालच कमी
या सृष्टींतिल दिव्यपण । तेंच तेंच हें मनुजपण
विपन्नता ज्यांच्यापाठीं । जीव कळवळे त्यांसाठी

---

* टिळकांच्या 'अमेरिकन मुली'ची माधव ज्यूलियन यांच्या 'पिरोजा कौला'शीं तुलना करून पाहण्यासारखी आहे. दोन्ही कविता सुंदर आहेत. परंतु एकीत मूर्तिमंत वात्सल्य आहे, तर दुसरींत सौंदर्यलालसा आहे.

खाइन अवघ्यांच्या लाथा । देइन सेवेला माथा;
होइन नीचाहुन नीच । करीन अवघ्यांना उंच;
ते ब्राह्मण मग महार मी । कोण गणी मग मला कमी ?

टिळकांच्या 'रणशिंगा'ला एका समीक्षकाने 'तुतारी'चे अनुकरण म्हणताच इतरांनी आपला सूर त्याच्या सुरात मिसळला आहे. टिळकांची प्रतिभा जशी परिपक्व तशीच तरल होती. त्यांच्या कवित्वाची थोरवी त्या काळचे संपादक ओळखून होते. 'सृष्टींतील करमणुकीची घटका' ही कविता हरिभाऊ आपटयां-सारख्या रसिकवर्याने 'करमणुकी'च्या वसंत अंकाकरिता मागितली म्हणून स्फुरली आहे. 'लोकमित्र' ही कविता 'मनोरंजना'च्या मित्रांवरून स्फुरली आहे व सडेकरांच्या 'लोकमित्रा'त प्रसिद्धि पावली आहे. मित्रांच्या 'मनोरंजना'च्या वसंत अंकासाठी मराठी साहित्यातील एक उत्कृष्ट कविता स्फुरली आहे. टिळक परिणतप्रज्ञ होते. त्यांना प्रसिद्धीची हाव असण्याचे कारण नव्हते. मित्रांनी वसंतपर कवितेची मागणी करतांच तत्त्वज्ञानाची आवड असणारे त्यांचे कविमन जागे झाले. मित्रांचा 'वसंत' संकुचित होता. टिळकांचा 'वसंत' व्यापक होता. ते मित्रांना आपला व्यापक अनुभव सांगू लागले;–

वनीं एका दिनीं गेलो पहायला वसंताला
विचारीतां कुणालाही नसे ठावें कुठें गेला !
घरी येणार, तो कोणी मला भासे मला वाही,
क्षणामध्यें पुढें येई, करीं माझ्या करा घेई
अहो ! दिव्याहुनी दिव्य स्वरूपाची जणूं खाणी !
अहो ! ब्रह्माण्ड गोलाची उभी तेजस्विनी राणी !
म्हणे, 'जा, जा, वसंताला तुझ्या कोठेंहि धुंडाळ !'
म्हणालों मी 'वसंताच्या मुठीमध्यें दिशा, काळ !'
गुलाबाचीं फुलें रम्यें दिसे तैशीच केव्हाही
नुरे भिन्नत्व जें सांचे मनुष्याच्या सदा हाटीं.
अतां कोण्या वसंताचें म्हणूं सांगा मला गाणें ?
निधीमाजी रमे मासा कशाला तो घडा जाणे ?

या कवितांप्रमाणें 'रणशिंग' ही कविता त्यांनी नव्याने निघालेल्या 'नवयुग' मासिकाकरिता लिहिली होती व ती 'नवयुग' या शीर्षकानें नोव्हेंबर १९१३ च्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकात आली होती:–

नवयुग ! नवयुग ! नवयुग हो !
शिंग फोडितें हा टाहो
अंधारांतुन उजेड ये

तत्त्व नवें हें सदा नवें !
अशुभ निराशेच्या उदरी
देवी आशा जन्म वरी
नवयुग अर्पी नवेंपण
घे घे तें अपुलें करुन

'टिळकांच्या कवितें'त तिचे संपादक रेव्हरंड उजगरे यांनी या कवितेस 'रणशिंग' हें नांव दिलें. 'तुतारी'चे व या कवितेचें Spirit एकच आहे. कदाचित् 'तुतारी' वरून ही कविता स्फुरलीहि असेल. परंतु याँ कवितेंत अदम्य उत्साह आहे. 'तुतारी'तील उत्साह 'धिक्कार अशा मूर्खालागुनि' अशा संतापात विकृत झाला आहे.

टिळकांच्या शंभर टक्के राष्ट्रीय वृत्तीची साक्ष देण्यास 'माझ्या जन्मभूमीचे नांव' ही त्यांची एकच भावनिर्मल कविता पुरे आहे. राष्ट्रीय पुढाऱ्यातील दोषांची त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्याबद्दलचा त्यांचा वीट 'खरे पुढारी' या कवितेत व्यक्त झाला आहे. त्यांना राष्ट्र आमरण प्रिय होतें. 'माझ्या जन्मभूमीचें नांव' या शीर्षकांतच त्यांचे राष्ट्रप्रेम प्रकट झालें आहे. त्यात त्यांना जन्मभूमि तर प्रिय आहेच. परंतु तिचे नांव देखील प्रिय आहे हा भाव ध्वनित झाला आहे. इतर कवींच्या राष्ट्रीय कवितांत भौगोलिक विभागांची रुक्ष नांवनिशी व इतिहासांतील शुष्क तपशील आहे. टिळकांच्या कवितेचा आरंभच काव्यमय व भावपूर्ण आहे;—

सृष्टी तुला वाहुनी धन्य माते ! अशी रूपसंपन्न तूं निस्तुला
तूं कामधेनू ! खरी कल्पवल्ली ! सदा लोभला लोक सारा तुला;

भारतामुळे जगाला शोभा आली आहे व त्याच्या अस्तित्वामुळे सृष्टि भाग्यशाली झाली आहे हा टिळकांचा भाव किती उदात्त आहे ! दुसऱ्या ओळीत 'सदा लोभला लोक सारा तुला' या शब्दात भारताचा सारा इतिहास आला आहे.

माते ! महात्मे तुझे, तत्त्ववेत्ते, तुझे शूर योद्धे, तुझे सत्कवि,
श्रेणी तयांची सदा माझिया गे ! मना पूजनीं आपुल्या वांकवी

यांत टिळकांचा प्राचीन परंपरेचा व या देशातील संस्कृतीचा आदर व अभिमान उघड झाला आहे.

तूझ्या महोदार सारस्वताच्या महासागरीचा जरी मीन मी
झालों, तरी गे ! तृषा मन्मनाची कधीही कधींही न होणे कमी

यांत टिळकांचा स्वभावसुंदर विनीत भाव प्रकट झाला आहे. आणि या कवितेचा शेवट तर कृतज्ञतेने उजळून निघाला आहे;—

वारा तुझ्या स्पर्शनें शुद्ध झाला मला लाधल ! भाग्य हें केवढें !
माते ! स्वयें देशि जें अन्नपाणी, सुधा वापुडी कायशी त्यापुढें !

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसि' या पंक्तीतील भावनेपेक्षा व कल्पनेपेक्षा टिळकांच्या या काव्यपंक्ती अधिक उत्कट व सुंदर आहेत. टिळकांचा पिंड कलाकाराचा नव्हता. परंतु अंतःकरणातला भाव प्रांजळ व विमल असला म्हणजे त्याचा आविष्कार सहज व कलापूर्ण होतो याची साक्ष ही कविता अजरामर झाली आहे. उद्दंडता नसून देखील ही विनयमधुर कविता प्रभावोत्पादक झाली आहे. देशप्रेमाच्या कवितेत बेपर्वाई हवी त्याशिवाय ती ऊर्जस्वल होत नाही ही कल्पना या कवितेने भ्रामक ठरविली आहे !

भावभावना हृदयात जागृत होताच व्यक्तीच्या ठिकाणी त्या आविर्भूत होतात. त्यांचा अभिनय मार्मिकांना व रसिकांना हृद्य व आस्वाद्य वाटतो. प्रेरणांचे तसे नाही. त्या आत्मशांति व आत्मतृप्तीसाठी असतात. त्यांचा अनुभव घ्यावयास रसिक त्या उंचीचा व पातळीचा हवा. 'केवढें हें क्रौर्य !' या करुणोदात्त कवितेच्या निर्मितीचे निवेदन करताना टिळक म्हणतात, "हा एका पक्षिणीचा अल्प इतिहास वाचून पहा. आणि मग योग्य वा[illegible]स देवाने निर्मिलेल्या या सहजमनोहर, स्वभावरसिक जिवंत फुलांचा केवळ खेळ म्हणून, किंवा आपल्या जिभल्यांचे लाड पुरवावे म्हणून किंवा नुसत्या टोप्या सजविण्यासाठी करावासा वाटल्यास नाश खुशाल करा. ज्याच्या दर्शनानें प्रत्यक्ष प्रेतावर प्रसन्नता दिसूं लागावयाची, ज्याच्या आलापांनी दगडाला देखील काव्यस्फूर्ति व्हावयाची, ज्याच्या लीला पाहून मन मारून पृथ्वीवर कोठेंतरी पडलेल्या जीवन्मुक्ताला वात्सल्यानें वेड लागावयाचे, त्या पक्ष्याला ठार करावयास धावणाऱ्यास काय म्हणावें ते आम्हांस समजत नाही" या करुण कवितेंत टिळकांची अहिंसक वृत्ति दयार्द्र झाली आहे. तिची अनुकंपा केवळ मानवांपुरती मर्यादित नाही. तिच्या मायेत पशुपक्ष्यांचाहि वाटा आहे. पाखरांची हिंसा करणाऱ्याचा टिळकांना सात्त्विक सन्ताप येतो. त्या निमित्ताने ते मानवी स्वभावावर टीका करतात. मानवाची प्रथम मानवतेवर श्रद्धा हवी आणि मग ती परमेश्वरावर हवी. मनुष्याच्या हिंसक वृत्तीचा व्याजस्तुतीने धिक्कार करताना टिळक म्हणतात;—

अहा ! मधुर गाउनी रमविलें सकाळी जनां,
कृतघ्न मज मारितील नच ही मनीं कल्पना !
निघून नर जातिला रमविण्यांत गेलें वय,
म्हणून वधिलें मला ! किति दया ! कसा हा नय !
उदार बहु शूर हा नर खरोखरी ज्ञाहला

वधून मज पांखरा निरपराध की दुर्बला !
जिवंत वहु बोलकें किति सुरम्य तें उत्पल
नरें धरुनि नाशिलें, खचित थोर बुद्धी, बल !

टिळकांची संवेदनशक्ति जितकी सूक्ष्म तितकीच तीव्र होती. ती सहज आविष्कृत व्हावयाची ! प्रचारकी थाटाच्या लाखो मानवतावादी कवितांपेक्षा टिळकांची ही एकच कविता विलक्षण प्रभावी आहे !

टिळकांच्या कवितेचा वराच भाग तात्त्विक ज्ञानाला वाहिलेला आहे. तत्त्वज्ञान टिळकांचा आवडता विषय होता. त्यांत ते एकदम रमत. 'अद्वैता'ची ओळख पटवताना ती ते काव्यमय भाषेत सांगतात;—

वुदवुद, लहरी वघतांना । म्हणती जन हा उंचपणा !
वुदवुद, लहरी फुटतांना । पुन्हां तयाला नीचपणा !
परंतु जीवन एकचिरंतन ! मजला यांतुन
दावुन किति दमले द्वैता । कारण मी वेडा नुसता !

सौन्दर्याचा जन्म कावाडकष्टांच्या व मनाला लागलेल्या टोचण्यांच्या उदरी असतो हे तत्त्व आशावादी दृष्टिकोणातून विशद करताना ते म्हणतात;—

मातीतच परि फुलें उगवती,
मातीहुनि जरि भिन्नें दिसती,
अंधाराच्या उदरी येती,
रम्य नक्षत्रें ! ही परमेशाची नीति

टिळकांचे हे तत्त्वान्वेषण अस्पष्ट किंवा अंधुक नाही. ते कुणालाहि सहजासहजी आकलन होईल अशा रीतीने मांडण्यात आले आहे.

—८—

टिळक हे मोठे उत्साही कार्यकर्ते होते. त्यांनी कवितालेखनाप्रमाणे कथालेखन व नाटचलेखनहि केले आहे. अर्थात् ते त्यांच्या कवितांप्रमाणे प्रथम प्रतीचे नाही. 'सायंकाळ' हे त्यांचे एक गद्यकाव्यहि *मनोरंजनात आढळते. १९०७ सालीं मार्चच्या दुसऱ्या व तिसऱ्या तारखेला जळगांवला जे कवि संमेलन भरले होते त्याच्या मागे टिळकांची प्रेरणा होती. 'कवितेच्या खालावलेल्या

(* जुलै १९१३ "जे व्यक्त आहे, किंवा व्यक्त करतां येण्यासारखें आहे, त्यापेक्षा जे व्यक्त नाहीं व व्यक्त करता येण्यासारखें नाही, असें पुष्कळ आपणांस कळण्यासारखे आहे. इतकेंच की त्याला विचाराच्या मुशींत घालणें दुरापास्त आहे. मग तो उच्चाराच्या आटोक्यांत कोठून यायचा !")

स्थितीची कारणे व तिच्या निराकरणाचे उपाय' या विषयावर भाषण करताना टिळकांनी 'लोकांनी कवितेला उत्तेजन दिले पाहिजे' असे सांगितले होते. बडोदे येथें आक्टोबर १९०९ मध्ये भरलेल्या आणि मुंबई येथें जून १९१५ मध्ये भरलेल्या आठव्या साहित्य संमेलनांत त्यांनी मोठ्या हिरीरीने भाग घेतला होता. आक्टोबर १९१५ मध्यें मुंबईला अकरावें नाटच संमेलन भरले त्याचे अध्यक्षपद टिळकांकडे होते. टिळकांच्या भाषणात नाटचकलेचा मार्मिक विचार असून नाटचकलेचे ध्येय किती सुंदर असले पाहिजे याचे विवेचन आहे. हास्यरस उत्पन्न करण्यासाठीं उपटसुळासारखी मध्येंच कांही पात्रे घुसडणे, संगीत नाटकांत पद्यांची गर्दी करणे, कारण नसतां रंगभूमीवर वेश्यांचा अथवा देवांगनांचा नाच करविणे इत्यादि गोष्टींचा त्यांनी निषेध केला आहे. रसाच्या एकतानतेचा भंग करणाऱ्या 'वन्स मोअर'चाहि त्यांनी समाचार घेतला आहे. नट म्हणजे येनकेन प्रकारेण लोकरंजन करणारे निव्वळ पोटभरू लोक नसून राष्ट्राचे खरे सेवक व शिक्षक आहेत असा त्यांनी नटवर्गाला उपदेश केला आहे. (मनो. जून १९१५)

टिळक चारचौघात मिळणारे मिसळणारे होते. ते जुन्यात जुने व नव्यात नवे होते. या त्यांच्या समाजशील स्वभावामुळे अनेक नवेजुने कवि त्यांचे चाहते व मित्र होते. अभिनव काव्यमालेचा दुसरा भाग त्यांनी संपादन केला. तेव्हां त्यात त्यांनी गणेशशास्त्री लेले, लेंभे, कुरुंदवाडकर, विष्णुबावाजी व कृष्णाजी-बावाजी कुळकर्णी, वैद्य, व लोंढे या जुन्या वृद्ध कवीच्या जोडीने भालचंद्र, गोविंदाग्रज, नागेश, रेंदाळकर व ठोमरे या नव्या तरुण कवींनाहि मानाचें स्थान दिले आहे. १९१४ मध्यें हा भाग प्रकाशित झाला. त्यावेळी 'इंदुप्रकाशां'तून आणि 'ज्ञानांजनां'तून आजगांवकर, देवस्थळी, गणेश विठ्ठल कुळकर्णी प्रभृतींनी आधुनिक कवि व त्यांची कविता यावर वेगुमान हल्ला चढविला होता. तो समोर असल्यामुळें समतोल टिळक प्रस्तावनेत तारतम्याने म्हणतात, "हें तयार करणार, अर्वाचीनांचा भयंकर द्वेष म्हणजे प्राचीनाविषयीं अमर्याद प्रेम असें समजणारा नाहीं. भिन्न भिन्न काळीं व भिन्न भिन्न परिस्थितींत झालेल्या कवींची तुलना करून एकाला उत्तम व एकाला अधम ठरविण्याची याची तयारी नाही. हा काल स्थित्यन्तराचा आहे. पूर्व आणि पश्चिम यांचे संमेलन होत जाणें हें या स्थित्यंतराचे मुख्य लक्षण असून तें जसें इतरत्र तसें आधुनिक काव्यवाङमयां-तहि दिसून येत आहे."

स्वतः टिळकांचा जन्म नव्या जुन्या जमान्यांच्या संधीवर झाल्यामुळे त्यांच्या कवितेत त्यांच्यातील गुणांचा हृदयंगम संगम झाला आहे./ टिळकांची रचना प्रौढ व भारदस्त असली, आणि तिच्यात संस्कृत शब्दांचे प्राचुर्य असले,

तरी प्रसाद व प्रवाह आहे. जुन्या लगत्वानुसारी वृत्तांवर तसेच नव्या मात्रिक वृत्तांवर त्यांचे प्रभुत्व आहे. 'साकी' हे मात्रावृत्त त्यांच्या अतिशय आवडीचे होते. एकदा त्यांच्या काव्यात वृत्तवैचित्र्य नाही असा आक्षेप घेण्यात आला असताना त्यांनी तुकोबांचे अभंग, श्रीधराची ओंवी, मोरोपंतांची आर्या इत्यादिकांची उदाहरणे उद्‌वृत करून म्हटले होते;–

क्षणामधें हें, क्षणामधें तें वृत्त गोड हा काळ,
परी तयास्तव व्हावे नकळे कैसें प्रौढें बाळ ?
वैचित्र्याचें खरें समापन म्हणजे एकीं प्रीति,
एकीं प्रीती हीच खरोखर वैचित्र्याची भुक्ति !

दत्त, केशवसुत, विनायक, ठोमरे, इंदुकांत आदि कवींवर टिळकांची फार ममता होती. गोविंदाग्रज २३ जानेवारी १९१९ ला वारले व टिळक ९ मे १९१९ ला गेले. या मधल्या अवधीत त्यांनी गोविंदाग्रजांच्या मृत्यूवर एक विलापिका आळविली आहे. ती 'नवयुगां'त आली होती. तिच्यात वृद्ध टिळकांनी 'दुर्दैवी' असा आपला निर्देश केला असून 'कोणता नवा गड घ्याया गडकरी जासि येथून ?' असा दिवंगत गोविंदाग्रजांना प्रश्न केला आहे. दत्त गेले तेव्हां टिळकांनी एप्रिल १८९९ च्या सुविचार समागमांत 'प्रियमित्र स्वर्गवासी दत्तात्रेय कोंडो घाटे बी. ए.' ही शोककविता लिहिली. केशवसुतांसंबंधीं टिळक सांगतात, "१८८३ सालीं नागपुरास, १८८८ किंवा ८९ सालीं *पुण्यास व १८९५–९६ सालीं मुंबईस आम्हांला दोन दोन चार चार महिने परस्परांचा सहवासाचा लाभ घडला आहे. (केशवसुतांची निवडक कविता प्रस्तावना ३–११–१९१६) केशवसुतांना उद्देशून टिळकांच्या तीन कविता आहेत. मात्र या उभयतांच्या काव्यलेखनाच्या दिशा अगदी वेगवेगळ्या आहेत. 'इंदुकांत' या टोपण नांवाने अभिजात संस्कृत धाटणीची मराठी कविता लिहिणारे कवि दिनकर नानाजी शिंदे हे १७ आक्टोबर १९१३ रोजीं वारले. तेव्हां टिळक 'काव्यरत्नावली'ला पत्र पाठवितात, "यांचा स्वभाव इतका प्रेमळ होता, विचार इतके उदात्त होते, वाणी इतकी रसाळ होती, कीं यांच्या काव्यापेक्षां यांच्या समक्षेंतच अधिक मोहनी भरली होती" (का. र. वर्ष २४ अखेर) बालकवि ठोमरे १९०९ च्या बडोदे साहित्य संमेलनानंतर नगरला टिळकांकडे जाऊन राहिले होते. टिळकांनी बालकवींच्या कवितेसंबंधी जो अभिप्राय दिला आहे, तो मूळात जयदेवाच्या कवितेविषयीं आहे. त्यांत त्यांनी किंचित् फेरबदल केला आहे;–

* 'गावीं गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' ही केशवसुतांची कविता टिळकांना उद्देशून आहे. सप्टेंबर १९६१ च्या 'युगवाणी'तील माझा लेख पहा.

"मधुर कोमलकान्तपदावलि । श्रुणुत बालकवेश्च सरस्वती !"
टिळकांचे बालकवींवर पुत्रवत् प्रेम होते. बालकवींची काव्यसमाधि लागावयाची तिला अनुलक्षून टिळकांनी "त्वां काय पाहिलें सांग ?" हे गीत लिहिले आहे. एकदां बालकवि अकारण कुरकूर करून नगर सोडून पुण्यास निघून गेले. त्या प्रसंगाविषयीं टिळक लिहितात;—"ठोमऱ्यांनी आमच्या सहवासांत राहू नये, अशी ज्यांची मनापासून इच्छा होती अशा कित्येक थोर माणसांनी पुढे त्यांना पुण्यास नेले. तेथें नवीनच स्थापन झालेल्या तुतारी मंडळाचे ते सभासद झाले. हें 'तुतारी मंडळ' कवि केशवसुत यांच्या सन्मानार्थ स्थापण्यात आले होते. ते अजून आहे किंवा मोडले, हे आम्हांला ठाऊक नाही. 'तुतारी मंडळा'चा व ठोंबऱ्यांचा संबंध फार थोड्या दिवसांचा होता. ते पुन्हा पुणें सोडून नगरास आले." (मनो. मे १९१८) या कुरबुरीवर टिळकांनी 'पाखरा ! येशिल का परतून ?' हे गीत रचले व ते 'ज्ञानोदया'त प्रसिद्ध केले. टिळकांचा 'तुतारी मंडळा'शी संबंध नव्हता असें ते बजावून सांगत असतांना 'आधुनिक कवि पंचक-कारां' पासून तो 'पांचकवी' कारांपर्यंत सारे समीक्षक त्यांना बळेबळे त्या मंडळीत कोंबीत आहेत हे दृश्य प्रेक्षणीय आहे !

कविमित्रांप्रमाणे टिळकांचे सार्वजनिक संस्थाशी आणि नियतकालिकांच्या संपादकांशी जिव्हाळ्याचे संबंध असत. जुलै १९१५ मध्ये पुण्याला हरिभाऊ आपटे यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक प्रांतिक परिषद भरली. तिच्यात ख्रिस्ती समाजाचे प्रतिनिधि म्हणून टिळक उपस्थित होते व त्या समाजाच्या वतीने त्यांनी परिषदेत भाषणहि केले होते 'काव्यरत्नावली'चे फडणीस टिळकांना फार चाहत. टिळकांनी ख्रिस्तीमताचा स्वीकार केल्यावरहि 'माझे दशावतार', 'काळाशी संवाद', 'गायत्री' या सारख्या सनातनी कविता रचल्या आहेत. त्या संबंधात फडणीस म्हणतात, "टिळकांचे धर्मान्तर हें त्यांच्या स्वभावचांचल्याचे निदर्शक होतें. टिळकांची मनोवृत्ति हिंदु धर्ममय होती"

टिळक कविता म्हणताना देहभान विसरत आणि श्रोत्यांना त्या समाधि-सुखाचा अनुभव देत. तांबे मला सांगत असत, "नारायणरावांना मी जळगांवच्या कवि संमेलनांत पाहिलें होते. नारायणराव म्हणजे मूर्तिमंत काव्य होते.-त्यांचे चालणें बोलणें सारे काव्यमय होते." टिळकांचे 'वनवासी फूल' तांब्यांना मुखो-द्गत होते. टिळकांच्या आवाजात गोडवा नव्हता. परंतु त्यांची म्हणण्याची ढब वेधक होती. हा अनुभव सागतांना गोविंद मल्लिनाथ ठेंगे लिहितात;—"१९११ सालच्या उन्हाळ्यांत माझ्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें काशीनाथपंता-बरोबर मी लोणावळ्यास राहावयास गेलों होतो. एके दिवशी आम्ही सकाळची सहल करण्याकरितां बाहेर पडण्याच्या बेतात असता आमचे परम पूज्य स्नेही

आधुनिक महाराष्ट्रकविललामभूत प. वा. रेव्हरंड नारायण वामन टिळक आमच्या बंगल्याच्या आवारांत अवचित येऊन ठाकले. ती प्रेममूर्ति पाहिल्या-बरोबर आम्ही हर्षभरित झालों. चहा आटोपल्यावर आम्ही गप्पा मारीत बसलो. गप्पांचा विषय मुख्यतः महाराष्ट्र वाङ्मय व साहित्य यांची चर्चा व तत्संबंधी काशीनाथपंतांनी केलेली महाराष्ट्र सेवा हाच होता. त्यांत ओघावरोबरच काशीनाथपंतांच्या अंगांतली चिकाटी, उद्यमशीलता, सहिष्णुता, प्रेमळपणा, सौजन्य, लेखकांशी त्यांचे बंधुत्वाचें नातें वगैरे गुणांचा उल्लेख करून कविवर्य मला म्हणाले;—"काय हो मि. ठेंगे, हे आपले मित्र खरोखर लोकमित्र आहेत, नाही काय ?" लगेच कविवर्यांनी प्रेमभराने आपल्या गोड आवाजात एक चिमु-कले रसाळ पद्य आम्हांस गाऊन दाखविले. कवि प्रेमरंगांत येऊन आपण निर्माण केलेल्या काव्यसृष्टीत स्वैर राममाण होऊन तल्लीन झाले असता बाह्यसृष्टीच्या दृष्टीने ते वेडे कसे बनतात हा प्रसंग प्रत्यक्ष अनुभवण्याचा प्रसंग त्यावेळी आम्हास लाभला. त्यावेळचे आलाप अजून माझ्या कर्णरंध्रात खेळत आहेत. ते पद्य खरोखर अहर्निश हृदयांत साठवून ठेवण्याच्या योग्यतेचे आहे;—

खरोखर लोकमित्र ते
सेवक आपण सकल जनांचे
स्वप्नी ठाउक अन्य न अपुले ज्यास जगी नातें (मनो. जुलै २०)

टिळकांना मैत्रीचें फार महत्त्व वाटे. ते त्यांच्या 'जगन्मित्र' या काव्यनांवात व्यक्त झाले आहे. ठेंग्यांप्रमाणें वि. ज्ञा., विस्ताराचे संपादक अ. आ. मोरमकर यांनीहि टिळकांविषयींचा आपला अनुभव नमूद केला आहे;—"टिळकांची कविता महा-राष्ट्रांत अत्यंत लोकप्रिय असून ती त्यांची आठवण ताजी ठेवण्यास समर्थ आहे. त्यांची काव्यसंपत्ति मोठी असून कित्येक प्रकरणें नितांत मधुर आहेत. ते आप-णांस नव्या थाटाचे कवि म्हणवीत पण त्यांच्या कवितेंत जुन्या विचारांचे मिश्रण बरेंच आहे. त्यांची भाषा मधुर, रचना साधी आणि कल्पना हृदयंगम आहेत. टिळकांचा स्वभाव निर्मत्सर आणि गोड असे. 'प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवीचा असे,' याप्रमाणें त्यांची वृत्ति आणि वर्तन असे. काव्यविषयाची चर्चा चालली असतांना ते अगदी अल्लड तरुणाप्रमाणें बोलूं लागत. आपल्या वयाची त्यांना विस्मृति पडे. (वि. ज्ञा. वि. मे १९१९ कव्हर)

टिळकांच्या या आत्मविस्मृत आनंदी वृत्तीमुळें जगाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण निकोप व आशावादी होता;—

होते जें जें; आहे जें जें
तें तें स्मृतिगत मात्र विराजे;
काल सनातन

तसेंच आपण
कां मग बोंबाबोंब ?

असा त्यांचा दृढ विश्वास होता.

निर्मम, निरहंकार आणि निर्मत्सर वृत्ति टिळकांना कांही एकदम प्राप्त झाली नाही. सुखात आणि दुःखात चित्ताची समता ढळू द्यावयाची नाही यासाठी बालपणापासून त्यांची साधना चालू होती. जवळ जवळ पांच तपानंतर त्यांना स्थितप्रज्ञत्वाचा लाभ झाला होता. ही साधना चालू असताना त्यांना बाहेरचा त्रास व आंतला ताप यांचा जांच व जुलूम सोसावा लागला. परंतु त्यांनी प्रेमाने त्यावर विजय संपादन केला. त्यांच्या कवितासंग्रहात 'चन्द्रान्योक्ति' ही कविता संगृहित झालेली नाही. तिच्यात टिळकांची शेवटच्या पांच वर्षांतील मनःस्थिति प्रतिबिंबित झालेली आहे. यासाठी ती संपूर्ण कविता येथे उतरून घेतो;—

जो तूं चंद्रा ! जगाला परम सुखकरा दीप्तिला अर्पितोसी,
तो तूं कैसा कळेना निजतनुवरती डाग हा साहतोसी ?
किंवा आश्चर्य कैसें ? परहितरत जे पूर्ण झाले तयांना—
प्रायः स्वीयी न देहीं अनुरति लवही साधुवृंदाग्रणींना !
त्राता तूं औषधींचा, अमृतकर खरा, या जगा बुद्धिदाता,
तूंते बाधा क्षयाची ! अयि कुमुदपते ! काय मी बोलूं आंता !
किंवा आश्चर्य कैंचे ? परहितरत जे पूर्ण झाले तयांना—
प्रायः स्वीय स्थितीचें स्मरण न सदयां साधुवृंदेश्वरांना !
तेजोहानी रवी हा प्रतिदिन करितो, हें तुला साहवेना ?
कर्तव्यां दक्ष तू तें सहुन सकल हें चन्द्रम्या ! राहवेना ?
किंवा आश्चर्य कैंचें ? परहितरत जे पूर्ण झाले तयांना—
बाधा मानापमाने लवकर न घडे साधुवृंदाधिपांना !
केव्हां केव्हां सुधांशो ! गतविभ दिससी खिन्न पूर्णोपरक्त,
तेव्हां होतोस भासे सकलहि जगापासुनी तूं वियुक्त
चंद्रा ! प्रेमांबुराशे ! परहितरसिका ! ही परी व्यर्थ भीति,
थोडया वेळांत घेसी पुनरपि पहिली आपुली रम्यवृत्ति !
सदा रंगले जे परार्थी तयांना,
जगाच्या खऱ्या बंधुंना आश्रयांना,
कुठें देह ! वित्तें कुठें ! मान कीर्ति !
कुठें काय चिंता ! कुठें काय भीति !

'आगंतुका'चे अंतरंग

—ले. प्रा. दा. ल. अडोणी

हिंदी व मराठी या पर्यायाने एकाच संस्कृत भाषेपासून निघालेल्या म्हणजे सगोत्र भाषा आहेत. दोघींनी मुक्त हस्ताने संस्कृतमधील शब्दभांडार लूटले आहे. तो त्यांचा जन्मसिद्ध अधिकार कोणीहि अमान्य करत नाही. तत्सम शब्दांचे उभय भाषातील प्रचलित अर्थ नेहमी सारखेच असतात असे मात्र नाही. भिन्न भाषा बोलणारे लोक आपापल्या भाषेत किती वेगवेगळया दिशांनी अर्थ-विकास साधसात, हे निगडित संबंध आला म्हणजे लक्षात येते. एका भाषेत शब्दाला अर्थगौरव प्राप्त होतो; तर दुसरीत त्याचा अर्थापकर्ष होतो. दुसरे शब्दाचा विशिष्ट अर्थ कधी कधी इतका रूढ होऊन बसतो, की तोच त्याचा मूळ अर्थ आहे असे मानले जाते. आपल्या 'बलीयसी रूढी' मुळे तो अर्थप्रकार धात्वर्थादिकांना हतबल करून टाकतो. अशा अर्थभेदाच्या परंपरेचा मागोवा घेणे उद्‌बोधक व मनोरंजक ठरेल असे वाटते.

या दृष्टीने 'आगंतुक' शब्दाचा येथे विचार करू. सभेच्या व व्याख्यानाच्या आरंभी 'आगन्तुका'चे किंवा 'आगन्तुक सज्जनां'चे स्वागत करण्याचा हिंदी भाषिकात प्रघात आहे. आमंत्रणानुसार उपस्थित असलेल्या नवख्या मराठी भाषिकाला आपली गणना 'आगन्तुका'त झाली आहे, ही जाणीव प्रथमश्रवणी तरी खटकल्याशिवाय राहणार नाही. कारण हा शब्द कानी पडताच त्याच्या मनात जो भावबंध साकार होतो, तो वक्त्याच्या विवक्षेहून—त्याच्या 'वक्तव्या'-पेक्षा—अगदी वेगळा असतो. तो मोठासा सुखद किंवा स्पृहणीय नसतो; तर उलट अप्रिय व विसंवादी असतो.

वक्त्याने सद्भावाने उच्चारलेल्या शब्दांमुळे जर श्रोत्यांच्या मनात गैरसमज उत्पन्न झाला, तर विचारांची देवघेव करण्यात मोठाच अडथळा निर्माण होतो. संवादात विक्षेप होण्याचे कारण तरी येथे किती विलक्षण ! शब्द तर परिचित असतो, पण आपणाला स्फुट होणारा भाव मात्र विसंगत, अनपेक्षित वाटतो. अज्ञानापेक्षा अन्यथाज्ञान अधिक बाधक असते म्हणतात त्याचा अशा वेळी पडताळा येतो. श्रोता दुश्चित्त असला (किंवा झाला) तर संवादातील रसाची हानि होते असे ज्ञानेश्वर म्हणतात. (ज्ञा. ९—२८) 'संकेतां'त एकता नसली तर बोलणारा व ऐकणारा यांच्यात विसंवाद उत्पन्न होणारच.

अनुक्रमणिका

दि. २२–६–६२ च्या 'नवशक्ति' दैनिकाच्या अंकात "आमदारांची आगं-तुकी" म्हणून अग्रलेख आला. त्यातील प्रस्तुत भाग पुढे देतो.––

"आगंतुक म्हणजे बोलावणे नसतांना जेवायला येऊन पंगतीत बसणारा माणूस. आगंतुक हा चतुर असावा लागतो. जेवणावळीची बातमी काढून कुणाला पता न लागता जेवण उरकून व दक्षिणा उचलून त्याला जाता आले पाहिजे.........महाराष्ट्रातील जिल्हा परिषदात आपल्याला स्थान मिळावे म्हणून महाराष्ट्र विधान सभेतल्या ज्या बहुसंख्य सभासदांनी मुख्य मंत्र्याकडे अर्ज करून शिष्टमंडळ नेण्याचे ठरवले आहे ते आगंतुक आहेत."

यात विवरण केलेला 'आगंतुक' शब्दाचा अर्थ ज्याच्या मनात घर करून राहिला आहे, अशा मराठी माणसास (सामान्यत: आपण सारे याचे भाऊबंद आहोत) हिंदीतील 'आगंतुक सज्जन' हा शब्दप्रयोग उपरोधाने, व्याजोक्तीने तर योजिला नाही ना अशी शंका येईल. ती अनाठायी आहे, असे पुढे स्पष्ट झाले तरी मनाचा ग्रह एकदम पालटणार नाही. दुसरे, प्रस्तुत पदाचा आपला अर्थग्रह– 'अनाहूतपणे विशेषतः जेवणास आलेला (मनुष्य)' हा सोडण्याचे कांही कारण नाही. 'आगंतुक' शब्दाचे हे मराठीत झालेले **विशेषीकरण** होय. त्यात जोडीने **अर्थापकर्षहि** झाला आहे हे मात्र मान्य केले पाहिजे. व्यक्ती-प्रमाणे शब्दालाहि (वर–खाली जाण्याचा) 'चक्रनेमिक्रम' लागू पडतो. समाजाच्या अवनतीप्रमाणे तदाश्रित शब्दाच्या अपकर्षाला कांही कारणे असतात.

'नवशक्ति'कारांनी आगंतुकावर आरोपित केलेले चातुर्य उपरे आहे. त्यातील व्याजस्तुति सहज जाणवते. हा स्वार्थमूलक गुण, ही पोटभरूची कळा इष्ट किंवा स्पृह्य वाटणारी नाही. (आगंतुकाची हीच तेवढी वृत्ति 'आगंतुक' या भाववाचक नामातून नेहमी व्यक्त होते) उदरंभराचा–परान्न-पुष्टाचा संगदोष शब्दाला बाधक झाला व त्यात **अर्थापकर्ष** उतरला.

वरील मराठी आणि 'उपस्थित, अतिथि, पाहुना' या हिंदी भाषेतील प्रचलित अर्थात आढळणारी भिन्नता, किंबहुना त्यातील विरोध, लक्षणीय आहे. इंग्रजी host शब्दातहि असे विलक्षण अर्थपरिवर्तन आढळते.

"It is remarkable in what opposite directions the Germans and Romans have developed the meaning of the old heriditary name for 'stranger' (Lat. hostis, enemy). To the Roman the stranger becomes an enemy, among the German he enjoys the greatest previleges".—E. Weekly: The Romance of words, pp. 125-126

शब्दातून स्फुट होणाऱ्या या मानसिक व्यापाराबद्दल वेन्द्रिज् (J. Vendryes) हा भाषाशास्त्रज्ञ म्हणतो.––

"We can imagine a psychology of peoples, based upon the examination of divers semantic changes, attested in the language they speak. This study would call for considerable subtlety of mind, but it would be worthwhile attempting. It is possible that no accurate conclusions could be drawn therefrom, ... but we could perhaps define certain limits and establish certain nuances—Language, p. 209.

या दृष्टीने 'आगंतुक' शब्दाच्या कोणत्या विविध अर्थच्छटा मराठीत आढळतात याचा मागोवा घेऊ.

(२)

(१ त) दुर्जे पात्र खालीं जैसें होतें तैसें । वाढीलेच असे घवघवीत ।
अगांतुक चौघे आले त्यांसी पात्रें । दिधली विचित्रें पाहाती हे ॥
भीमस्वामी, भक्त० पृ. ८२

(१ प) दाराबाहेर शेपन्नास आगंतुक आरोळ्या देत आहेत, तर त्यांपैकीं एकासच आंत घेऊन. . . . . पंचपक्वान्नी भोजन घालणें. . . . . यापेक्षां (सर्वांसाठी) साधा बेत करणें बरें नव्हे काय ?
(चि. 'माला')

'नवशक्ति'कारांनी वर वर्णिलेल्या आगंतुकाचे–'आमंत्रणाशिवाय जेवावयास आलेले'–हे भोजनभाऊ आहेत. नेहमीच्या बोलण्यात विशेष प्रचलित असणारी ही अर्थच्छटा होय. तीत अर्थापकर्ष (pejoration) कसा झाला हे वर सांगितलेच आहे.

(२ प) 'ज्यां आमंत्रण त्या घरां मुळि नसे ऐशा स्त्रिया'
तैलंग वृत्तीने वागून, रांगोळी घातलेली पाहून' हळदी कुंकवास जातांना म्हणतात—
'ही आगंतुक वृत्ति आपण जरी धिक्कारिली यापरी
प्राप्तीचार घरें उगीच फिरुनी होईल का हो तरी ? —गो वाग्वै. ६६

(२ फ) हा कृष्ण राजा नाही. उद्या आमंत्रण नसलेल्या या आगंतुकाला मी स्वयंवराच्या मंडपांत पाय टाकूं देणार नाही. —खा. स्वयंवर

—"(जेवणाचा नव्हे, पण दुसरा) कोणता तरी उद्देश मनांत धरून "आमंत्रण नसतांनाहि येणारे" वरील आमदार व हे (२) मधील 'आगंतुक' एकाच प्रकारचे होत. भोजनेतर 'आन्तर:कोऽपि हेतु:' (कोणता तरी अन्य उद्देश) हा व्यवच्छेदक धर्म आहे.

(३ प) वैश्वदेवानंतर चवाठ्यावर घटकाभर उभे राहून आगंतुक (एकाएकी येणाऱ्या) अतिथीची मार्ग प्रतीक्षा करावी आणि नंतर अन्नग्रहण करावें हा गार्हस्थ्याचा धर्म होय हें सर्वप्रसिद्धच आहे. —चि. 'माला' ११७१ टीप

—"अवचित, सहजगत्या, आपाततः 'एकाएकी' येणारा, पांथस्थ, वाटसरू" असा येथे वाच्य असणारा अर्थ प्रस्तुत शब्दाचा मूलार्थ आहे. यांत कुत्सित भाव प्रतीत होत नाही. या आगन्तुकाचे आगमन निषिद्ध मानले नाही. उलट गृहपति, यजमान हा अभ्यागत म्हणून त्याला पंक्तीला घेणार आहे.

(४) मांडे भोजनाचें जालें नांव। परि व्यंजनादि पदार्थ चारी ठाव।
जेवि अगांतुक मागतां हो अन्न द्यावें। सर्वहि ते संज्ञीं आले कीं॥
—आ. दावि. ९९.१२३

—"अतिथि, पाहुणा". (३) ऱ्या उल्लेखांत विवरलेला अतिथिभाव येथे चरितार्थ झालेला आहे. 'आगन्तुक' हे कृदन्तरूप अर्थ प्रकार (३) मध्ये अपूर्ण क्रियावाचकाचा तर (४) मध्ये पूर्ण क्रियावाचकाचा भाव दाखविते. सभा संमेलनाचे 'यजमान' याच आतिथ्यशील वृत्तीने उपस्थितांना 'आगंतुक' म्हणून संबोधतात.

(५ च) जे ग्रामि कर्म वर्तलें तेथ ज ब्राह्मण अतित अभ्यागत आगांतुक त्यांस राजा आपले सत्तेकरून त्याचा विभाग शास्त्रसंमतप्रमाणे तो यांप्रति धर्म करववितो. महिका. बखर, ५५

(५ त) अकरा वर्षें कसब्यांत राहून वृत्ति चालवावयाकरितां सरकारांतून आगांतुक ब्राह्मण ठेविले होते तेच वृत्ति चालवीत होते. ऐति. सं. सा. १०.८

(५ प) असा हा कांहीसा सुधारलेला वारली उत्तर कोंकणात स्वयंभू आहे की आगंतुक आहे ?...तो ह्यांच्यामध्ये बाहेरून शिरला किंवा पूर्वापार स्वयंभू आहे ? राज. महिका. ब. प्रस्ता. ८३

—"बाहेरून आलेला, अ-स्थानिक, (तेथे) नेहमी न राहणारा" या अर्थ प्रकारात आमंत्रणाच्या अभावी आगमन म्हणून अनादर. अथवा आतिथ्यभावाचे अगत्य प्रतीत होत नाही. हा स्थितिदर्शक अर्थ केवळ बोधक आहे, भावनिक छटा त्यांत नाही.*

---

* 'दुसऱ्या सीमेंतून येणारा, मठाला भेट देणारा' भिक्खू या अर्थाने पाली वाङ्मयांत 'आगन्तुका'ची योजना करतात. पहा—'आगन्तुका भिक्खू उज्झायन्ति खिय्यन्ति विपाचेन्ति।—...थेरे न आणत्ता नवा भिक्खू न सम्मज्जन्ति। महावग्गो, २—१८—२, पृ. ११९

(६) मराठींत वाफ शब्द आहे त्यामुळे ब–असलेलें रूप (बाफ–बाष्प) आगंतुक असेल असा संशय येतो. –ब्लोक, मभावि, १२६

–'परक्या भाषेंतून आलेला' असा प्रकरणानुसार अर्थ होतो. प्रचारांतील शब्द निश्चित अर्थाने नित्य प्रयुक्त करून त्याला पारिभाषिक बनविण्याची शास्त्रांची परिपाठी आहे. हें भाषाशास्त्रांतील उदाहरण झालें. 'एका विशिष्ट तापाला' आगंतुक ज्वर व 'त्वचेवर झालेल्या जखमेला' आगंतुक व्रण असें वैद्यकांत म्हणतात. पारिभाषिक शब्दांत साहजिक अर्थसंकोच होत असतो.

(७) परंतु नायक व नायिका यांना त्यांच्या उच्च पदावरून भ्रष्ट करून त्यांचे जागीं एखादा आगंतुक आणून बसविणें मात्र कधीं योग्य होणार नाही.

–वि. ज्ञान विस्तार, १९००

–'अप्रस्तुत, अनपेक्षित, अनुचित असा, नको तो आलेला, मध्येच उपटलेला, उपऱ्या' (intruder). वाक्यगत संदर्भावरून हा अर्थ फलित होतो.

येण्याजाण्याची क्रिया सचेतनांच्याच संबंधात शक्य आहे. तथापि उपचाराने भावांच्या (concepts) बाबतीतहि आपण ती पुष्कळदा योजतो. "दया आली, राग गेला" सारख्या वाक्यात क्रियापद गौणी लक्षणेने योजिले आहे हे रूढीमुळे सहज लक्षात येत नाही इतकेच. व्यक्तीप्रमाणे भाव, गुण, धर्म इ. कसे आगंतुक वाटतात हे पुढील उल्लेखांवरून समजून येईल. त्यात विविध छटा दिसतात.

(८ क) येकि येकी भूतीं येकु येकु । विशेष गुण मुख्य नायकु ।
अन्य भूतांचा गुण आगांतकु । वर्त्ते कारणत्वें ।। मु. सिंधु ४–३१

(८ च) म्हणसी मुक्तीसी आगंतुकता । तेणें मोक्षासि आली अनित्यता ।
बद्ध आगंतुक म्हणतां । त्यासि सादिता येऊं पाहे ।।

एभा. १०.७४५

(८. त) जैसा कार्पास शुद्ध शुभ्र । तद्विकार तें श्वेत वस्त्र ।
आगंतुक रंग चित्रविचित्र । तैशी संसारपरिभाषा ।।

कृह्. २.४७२

(८. थ) प्राण्यास दुःख जें तें स्वाभाविक किंवा अगांतुक ऐसे म्हणाल तरि अगांतुक म्हणोनि बोलावे. रा. सं. मंडळ, 'मनन ग्रंथ' ६.६३

(८. प) मनुष्य स्वभावाच्या नित्य व शाश्वत स्वरूपापासून त्याचें आगंतुक म्हणजे देशकालविशेषजन्य स्वरूप निवडतां येण्यास अर्थात् असेंच एकंदर सर्व राष्ट्राचें मनाने आकलन झाले पाहिजे. चि. विष्णुपदी, १३७

अनुक्रमणिका

(८. फ) अशा स्थितींत एखाद्या आगंतुक विचाराचें प्रतिबिंब त्या दर्पणांत पडूं देऊन त्याच्या रूपाची व आकाराची इतरांच्या रूपाशीं तुलना करण्यास भीति कशासाठी वाटावी ? आगरकर नि. सं. १.१९१

(८. ब) कवीच्या काव्यदृष्टीची किंमत याच न्यायाने, वाचकाने बरोबर आणलेल्या इतर आगंतुक दृष्टीपेक्षा अधिक आहे. के. गद्यगुच्छ, २०

(८. बा) कारण, म्हणीस यमक हें केवळ आगंतुक आहे, व त्यापासून अर्थांत बदल होतो असें नाही. 'केळकर' साहित्य, ३८

(८. भ) आपल्या पूर्वीच्या राजांस आगंतुक बाह्य विघ्नांशिवाय इतर प्रसंगी अपाय होण्याची भिति नव्हती. को. लेख. २६६

(८. भा) आगंतुक किंवा आकस्मिक कारणांनी कथेंतील महत्त्वाचें कार्य घडविल्यास वाचकांस असमाधान उत्पन्न होतें. को. लेख. ६२१

(८. म) आमच्या धार्मिक वाङमयावर किती भलत्याच आगंतुक विचारांची कोळिष्टकें जळमटें जमलीं आहेत... (शिंदे.)

(८. य) लेकीची विचारपूस करायला कारकून पाठवला तरी चालतो अन् कोर्टाची आगंतुक कामंहि स्वतः ज़ातीनं हृदयाशीं धरावी लागतात हा समज तिला कोठला ! फ. दौलत, १९

(८. या) कारण बोधवादाचें खंडण करण्यांत मुख्य मुद्दा हा कीं, नीति–अनीतीचा प्रश्न कलाविलासाच्या बाबतींत आगंतुक आहे. फ. प्र. सा. ५५

(८. र) आहे त्यांतच मी मानी सुख
मिथ्या आशा नको अगान्तुक माजू. सुधारक, १४.३५

(८. ल) अच्युतराव येईपर्यंत (साने) गुरुजींना विरंगुळा वाटावा म्हणून कांही तरी वाङमय विषयक संभाषणांत त्यांना गुंतवून ठेवण्याचा जो मी आगतुक प्रयत्न केला, तो सपशेल माझ्या अंगावर उलटला. अत्रे, मराठी–मनें, ११६

(८. व) अशा (पोट) निवडणुकांत तर बऱ्याच आगंतुक गोष्टींचा प्रभाव पडतो असें (गृहमंत्री प. पंत) त्यांना वाटते. केसरी १८–४–५८

(८. वा) सत्ताधाऱ्यांच्या अदूरदृष्टीच्या वर्तनामुळे प्रांतोप्रांती आकस्मिक व आगंतुक झगडेहि हल्ली उद्‌भवतांना दिसतात. केसरी १५–८–५८

(८. श) प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळीं (स्टुडिओचें) दार नीट घट्ट बसलं आहे याची खात्री करून घ्यावी लागते, नाहीतर बाहेरून कांही आगंतुक आवाज तरंगत आंत येऊन ध्वनिक्षेपित व्हायचे. सई परांजपे, 'स्त्री'

अनुक्रमणिका

—'आकस्मिक, अनपेक्षित, अप्रस्तुत, असंबद्ध, अनुचित, अनिष्ट, उपरा, अशाश्वत, बाह्य,' इ. अर्थच्छटा वरील उल्लेखात प्रतीत होतात. अन्य शब्दाचे सान्निध्य, क्वचित येणारा स्पष्टीकरणात्मक पर्यायशब्द व प्रकरण किंवा संदर्भ यांच्या अनुरोधाने विवक्षित सूक्ष्म भावाचे आकलन करता येते. अमूर्त बाबीतील सूक्ष्म व तरल अर्थच्छटा सूचित करण्यासाठी या शब्दाची योजना थेट मुकुंदराजापासून कशी परोपरीने करण्यात आली आहे हे वरील उल्लेखावरून ध्यानात येईल. हिंदी व बंगाली भाषात अशी भावबोधक छटा विकसित व रूढ झाली नाही असे कोश व 'आप्तवाक्य' यांवरून समजते. क्वचित कोठे असा उपयोग आढळला तर तो संस्कृतानुसारी होय.

महानुभावीय वाङ्मयांत आढळणारा 'आगंतुका'चा आगळा उपयोग पहाः—

(९ क) अनुसरलेयाचे आगंतुक कुंडेः अनारब्ध सुकेः प्रारब्धो भोगेक्षयो ॥२४॥ सूत्रपाठ, उद्धरण

प्रारब्ध व अनारब्ध (संचित) या शब्दांच्या सान्निध्यामुळे 'क्रियमाण, जें फळ भोगलें जात आहे' असा अर्थ येथे निष्पन्न होतो.

(१०. ट) रूपलावण्य अभ्यासितां नये। सहज गुणास न चले उपाये।
कांही तरी धरावी सोये। अगांतुक गुणाची॥
रादा. २.८.३१ व १४.६.३

(१०. त) म्हणोनि आगंतुक ज्ञानें। कैसेनि भवाब्धि निस्तरणें।
मुक्त म्हणतां बद्ध होणें। येणें गुणें शास्त्रज्ञीं॥ कृद. २.४८१
—'प्रयत्नसाध्य, संपादतां येण्या जोगा'

उल्लेख (१०. ट) मध्ये 'सहज' पदाच्या विरोधाने हा अर्थ निर्णिता येतो. रामदासांनी आशयांत भर टाकून प्रस्तुत शब्दाला अर्थगौरव प्राप्त करून दिला. कृष्णदयार्णवांनी तो उचलून धरला आहे.

'आगंतुक' शब्दांत 'येणारा' (—आलेला) ही बीजभूत कल्पना असून तिला विविध अर्थप्रकारांचे अंकुर फुटलेले दिसतात. आ+गम् धातूला तुन् प्रत्यय लागून आगन्तु हे प्रातिपदिक बनते. त्याला 'स्वार्थे' कन् प्रत्यय लागून 'आगन्तुक' रूप सिद्ध झाले. 'अगांतुक' व 'आगान्तुक' ही तद्भव पर्यायी रूपें रूढ आहेत.

आगमनशील व्यक्तीसंबंधी होणारी प्रतिक्रिया अनुकूल प्रतिकूल यांपैकी एक कोणती तरी असते. ती तशी होण्यास आत्मगत व तद्गत कारणांच्या जोडीला स्थल, काल, हेतु इ. अनेक निमित्तें असतात. यांच्या समवायाने बनलेली पार्श्वभूमि 'आगंतुका'चें स्वरूप समजण्यास सहायक होते. 'आगंतुका-' विषयीची तटस्थ वृत्ति अर्थप्रकार (३) व (५) मध्ये तेवढी स्फुट होते. अर्थात

भावनिक अंश (Emotional content) किती मोठ्या प्रमाणात मिसळलेला असतो हे इतर सर्व उल्लेखांवरून दिसून येते. शब्दाच्या अशा विविध अर्थच्छटा पाहिल्या म्हणजे अर्थतत्त्व कसे सूक्ष्म व तरल आहे याचा प्रत्यय येतो. श्रीचक्रधरांनी या पदाला कर्मफलाचे रूप दिले, तर रामदासांनी त्यात यत्नवादाचा रंग भरला.

'अनाहूत जेवणास आलेला' या अर्थाने हा शब्द (लेखनापेक्षा) बोलण्यात अधिक येतो. हे तीन्ही अर्थ केवळ मराठीत आढळणारे आहेत. भाववाचक नामांच्या संबंधातील योजनाहि मराठीतच विशेषत: आढळते. बाकीचे अर्थप्रकार संस्कृतात व अविकउणे तद्‌त्पन्न भाषात आढळतात.

विशिष्ट पद्धतीने लोकमानसात पडलेली आणि स्थिरावलेली शब्दाची अर्थच्छाया म्हणजे अर्थच्छटा. भिंगाचे स्वरूप, त्याची ठेवण, वस्तूचा संमुख भाग इत्यादि बाबींवर पडछाया अवलंबून असते हे बरीक ध्यानात ठेवले पाहिजे.

---

* उल्लेखांचा स्थलनिर्देश ग्रंथकार व ग्रंथनाम यांच्या शक्य तेथे आद्याक्षरांनी अध्याय–ओवी, वा पृष्ठ देऊन केला आहे. उदा...'आ. दावि.–आत्माराम–दास विश्रामधाम.' बहुतेक उल्लेख प्रसिद्ध ग्रंथकारांचे असल्यामुळे स्थलसंकोचास्तव संदर्भसूचि दिली नाही.

वाङमयातील वास्तववाद (पृ. १६ वरून)

आणखीहि एक प्रश्न मला अनेकदा जाणवत असे. पण वास्तववादावरील हे विवेचन लिहावयास घेतल्यानंतर विद्यापीठातील एका अन्यभाषिक विद्वानांशी चर्चा करताना त्यांनी तोच प्रश्न मला अधिक आत्मविश्वासाने विचारला: "Can there be realism in poetry ?" कथावाङ्मयात वास्तववादाला जागा आहे; पण काव्यात कुठवा आला आहे वास्तववाद ? माझ्या त्या विद्वान् मित्राच्या प्रश्नाला कांही अर्थ असेल, तर वस्तुनिष्ठ (Objective) वृत्ति आणि वास्तववादी (Realistie) दृष्टि यात कांही तरी फरक आहे, या माझ्या अस्फुट जाणिवेला अधिकच अर्थ प्राप्त होतो.

वरील दोन्ही प्रश्नांची उत्तरे मी साम्प्रत माझ्या वाचनातून आणि चिन्तनातून शोधण्याचा यत्न करीत आहे. अर्थात् येथे तरी केवळ त्या प्रश्नांचा उच्चार करून थांबणेच उचित आहे.

अनुक्रमणिका

संस्कृत–मराठी वाद

–ले. प्रा. पां. कृ. सावळापूरकर

मराठी भाषेमध्ये ग्रंथरचनेस प्रारंभ बाराव्या–तेराव्या शतकात झाला असे अनुमान आज उपलब्ध असलेल्या तत्कालीन मराठी ग्रंथांवरून निःसंदिग्धपणे करता येते. ग्रंथरचनेसाठी पारंपरिक संस्कृतचा आश्रय न करता मराठीचा आश्रय केला यासाठी प्राचीन (महानुभाव व ज्ञानेश्वर ते मोरोपंत) मराठी लेखकांची खालील प्रमाणे प्रशस्ति करण्याची वहिवाट आहे.–

(१) ज्ञानेश्वरादि मंडळींनी संस्कृतविरुद्ध बंड पुकारून नवीन हितकारक पायंडा पाडला; असे करण्यात त्यांनी लोकोत्तर धैर्य दाखविले. त्यांनी बंडखोरांची परंपराच निर्माण केली. 'या बडया बंडखोरात ज्ञानेश्वर मानें पहिला'

(२) मराठीत कवित्व करण्याच्या अपराधाबद्दल प्रतिपक्षीयांनी (म्हणजेच संस्कृत पंडितांनी) या मंडळींचा छळ केला तरी, तो सोसूनहि त्यांनी आपले अंगीकृत कार्य सोडले नाही !

(३) अति प्राचीन ऋषींनी व ब्राम्हणांनी संस्कृतच्या कडचा–कुलुपात कृपणपणे बंद करून ठेवलेले ज्ञान या मंडळींनी मराठीत आणून बहुजन समाजास मोकळे करून दिले.

(४) संस्कृत ही मृत भाषा आहे हे लक्षात घेऊन नवीन जीवनदात्री अशा मराठीचा आश्रय या मंडळींनी घेतला यात त्यांची व्यापक दृष्टि दिसून येते.

आता संस्कृत–मराठी वादा संबंधी प्राचीन मराठी कवींची जी मते होती त्यातील कांही प्रातिनिधिक मते त्यांच्याच शब्दात संक्षिप्तपणे पाहू:–

(१) नागदेवाचार्य महानुभाव (शके १२०६)–

नको गा केशवदेया, येणे (म्हणजे संस्कृत रचना करण्याने) माझिये स्वामीचा सामान्यु परिवारू नागवेल की !

(२) ज्ञानेश्वर (शके १२१२)

'माझा मराठाचि बोल कौतुके । परि अमृतातेहि पैजा जिंके'
' इये मराठीचिये नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं'

(३) एकनाथ (शके १४५५ ते १५२१)

संस्कृत ग्रंथकर्ते महाकवि । मा प्राकृती काय उणिवी ?
नवीं जुनी म्हणावीं । कैसेन कधी सुवर्ण सुमनें

अनुक्रमणिका

कपिलेचें म्हणावें क्षीर । मा इतरांचें काय नीर ?
वर्णसाम्यें एकचि मधुर । दिसे साचार सारखे
जें पाविजे संस्कृत अर्थे । तेंचि लाभे प्राकृते
तरी न मानावया येथे । विषम चित्ते ते कायी
देशभाषा वैभवें । प्रपंच परमार्थी पालटली नावें
परी रामकृष्णादि नामा नव्हे। भाषा वैभवें पालटू
संस्कृत वाणी देवे केली । प्राकृत काय चोरापासौनि आली ?
असो या अभिमान भुली । वृथा बोलोनि काय काज ?

(४) दासोपंत (काळ तोच)–
प्राकृत म्हणौनि दूषिती । तेचि यया ज्ञाना वंचिती
भाषाचि केवळ भजती । ते मूर्ख की ना
संस्कृतें बोलिलें सेवणें । तेचि सांडावें प्राकृत वचनें
ऐशिया मूर्खा मुंडणे । किती आता

(५) रामदास (शके १५३०–१६०२)
येक म्हणती मन्हाटे काय । हें तो भल्यांसि ऐको नये
ती मूर्खे नेणती सोये । अर्थान्वयाची ॥
लोहाची मांदुस केली । नाना रत्नें साठविलीं
ते अभाग्याने त्यागिली । लोखंड म्हणौनि
तैसी भाषा प्राकृत । अर्थ वेदान्त आणि सिद्धान्त
नेणोनि त्यागी भ्रांत । मंदबुद्धिस्तव
आहाच सापडता धन । त्याग करणे मूर्खपण
द्रव्य घ्यावे साठवण । पाहोंच नये

(६) श्रीधर (मृ. शके १६५१)
प्राकृत आणि संस्कृत । दोन्ही माजी एकचि अर्थ
जैसा दोन स्त्रियांचा एक नाथ । दोन्ही हस्त एकाचेची
अवळास न कळे संस्कृत वाणी । जैसे आडांतील पाणी
परी दोरपात्रा वाचूनी । अशक्त जनी केवि निघे ?
ते तडागासि येता त्वरे । तात्काळचि तृषा हरे
भोळे जन तारावया ईश्वरे । प्राकृत ग्रंथ निर्मिले
गीर्वाण हें शशिमंडळ अद्भुत । त्याची प्रभा ही प्राकृत
संस्कृत ग्रंथ वर्णिती पंडित । अर्थ प्राकृत करिती की
संस्कृत इक्षुरस अपार । त्याची प्राकृत ही साखर
सुज्ञजन सुकुमार सेवणार । प्रेमरसी मिळवुनिया

(७) मोरोपंत (श. १६५१–१७१६)

रामाचे रचिलें चरित्र मुनिने वाल्मीकिने संस्कृती
नाही हानि कदापि अन्य कविहीं तें वर्णिता प्राकृती
मुक्ताचा रचिलाचि हार वहिला जो रेशमाच्या गुणें
तो कार्पास गुणे करून रचिता काय प्रभेला उणें ॥
गीर्वाणिं राघवाचें यश रसिक जना लागतें फार मिष्ट
तैसे जे प्राकृताते अचतुर म्हणती मानिती ते न शिष्ट ॥
पीता गोक्षीर कार्तस्वरमणिचषकें देतसे जेवि गोडी
सारज्ञाला पलाशद्रुमदलपुटकें सेविता ते न सोडी ॥
प्राकृत म्हणोनि निर्भर हासतिल अतज्ञ मत्कृतिला
परि जाणशील वा तूं रसिक कविवरा मनी चमत्कृतिला ॥
ज्वरितासि शर्करा जशि कटु होय खळासि सुरस ही कविता
शिष्टा पद्मां सुख दे दुष्टा घूकासि ताप दे सविता ॥

प्रातनिधिक कवींचे अधिकृत उद्गार आणि तत्कालीन परिस्थिति यांची तपासणी करून प्रारंभी दिलेली प्रशस्ति कितपत योग्य आहे ते ठरविले पाहिजे.

(१) ज्ञानेश्वर ते मोरोपंत या सुमारे पांचशे वर्षांच्या काळात प्रत्येक मराठी लेखकाला आपल्या मराठी लिहिण्याबद्दल कांही समर्थनात्मक उद्गार काढावे लागले. सर्वांनाच आपल्या मराठी लिहिण्याचा आत्मविश्वास आणि अभिमान होता हे तर उघडच आहे. पण यापैकी काहींच्या ठिकाणी थोडासा न्यूनगंडहि होता की काय अशी शंका येऊ शकते. किंवा अति विनयाचाहि तो प्रकार असू शकतो. मराठीचा यथार्थ अभिमान धरताना संस्कृतचा अधिक्षेप मात्र कोणी कोठेहि केला नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. फक्त एकनाथ व दासोपंत यांनी थोडे कडक शब्द वापरले आहेत आणि रामदास व मोरोपंत हेहि कडकपणाकडे झुकले आहेत. तथापि या मंडळींचा संस्कृत लिहिण्याला विरोध असावा असे दिसत नाही. संस्कृत बरोबर मराठीहि लिहिण्यात हानी नाही हेच त्यांना म्हणावयाचे आहे.

या पांचशे वर्षांच्या काळात संस्कृत पंडितांचा मात्र मराठी लिहिण्याला सतत विरोध होत असला पाहिजे असे अनुमान वर उद्धृत केलेल्या कव्युद्गारां-वरून अनेक लोक काढतात. किंबहुना संशोधक विद्वानांचे ते एक गृहीत कृत्यच आहे. हे अनुमान खरे मानले तर ज्ञानेश्वरांच्या काळापेक्षाहि एकनाथ–दासो-पंतांच्या काळात हा विरोध तीव्र स्वरूपास पोचला होता असे मानावे लागेल. कारण त्यांनी ज्ञानेश्वरापेक्षा अधिक कडक शब्द वापरले आहेत. पण उत्तरोत्तर प्राकृत ग्रंथांचीच निर्मिति अधिक होत गेली; इतकेच काय पण पद्या बरोबर

गद्यहि प्रतिष्ठित होण्याच्या मार्गाला लागले असे इतिहास सांगत असल्यामुळे वरील अनुमान लंगडे पडते. शिवाय वरील आनुमानिक सिद्धान्त निःसंदिग्ध मानण्यासाठी अन्य निश्चित पुराव्याची गरज आहे. ज्ञानेश्वर पूर्वकालीन वा तदुत्तरकालीन एकाहि संस्कृत पंडिताने मराठी (किंवा प्राकृत. कारण हाच सार्थ शब्द प्राचीन कवींनी 'मराठी' या अर्थाने वापरला आहे.) भाषा लिहिण्यात वापरू नये असे निषेध वाक्य लिहिले नाही. आमच्याकडे यावनी भाषा वापरण्याचा निषेध होता; प्राकृताचा नाही. सर्वच संस्कृत नाटककारांनी 'हीन' पात्राच्या मुखात प्राकृत भाषा घातली आहे. तसा भरताचार्यांचाच आदेश होता. म्हणजे हजारो वर्षांपासूनच संस्कृत पंडित प्राकृताला आश्रय देत होते— निषिद्ध तर मानीत नव्हतेच नव्हते. असे असताना त्यांनी मराठीला येवढे निषिद्ध मानावे व याच कारणासाठी मराठी लेखकांस 'बंड' पुकारणे भाग पडावे असा प्रकार असण्याचे कांही कारणच नाही. प्राकृत म्हणजे महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, पैशाची इत्यादि होत. संस्कृत पंडितांना याच प्राकृत भाषा अभिप्रेत होत्या, मराठीला प्राकृत म्हणून त्यांची मान्यता नव्हती असे कोणी म्हणतील तर तेहि बरोबर नाही. सामान्यांची जी कोणती बोली ती प्राकृत. या काळात ती जागा महाराष्ट्री इत्यादि बद्दल मराठीने घेतली होती इतकेच काय ते. संस्कृत पंडितांचा विरोध केवळ तोंडी होता, लेखी नव्हता, असे मानले तर मराठी लेखकांनी तरी त्यांना लेखी उत्तरे देण्याचे कारण काय ? या विरोधाची इतकी प्रतिष्ठा त्यांनी का मानावी ? आम्हास या सर्व वादात मराठी लेखकांचेच एकतर्फी आक्षेप दिसतात; संस्कृत लेखकांचे म्हणणे कोठेच समोर येत नाही ! त्यामुळे मराठी लेखकांच्या धैर्याचे मूल्यमापनहि करता येत नाही.

(२) संस्कृतज्ञांनी मराठी कवींचा छळ केला याचीहि उदाहरणे उपलब्ध नाहीत रामेश्वरभट्ट व तुकारामबाबा यांची गोष्ट उपलब्ध आहे. पण रामेश्वरभट्ट शेवटी तुकारामाचे पट्टशिष्य झाले तेव्हा हा केवळ व्यक्तिगत असलेला विरोध संपूनच गेला. नाथांच्या ग्रंथांना देखील काशीच्या संस्कृत पडितांनी आदर केला हें प्रसिद्धच आहे.

ज्या अर्थी संस्कृत पंडितांनी केलेला मराठीचा निषेध उपलब्ध नाही. (उलट प्राकृताच्या उत्तेजनाचे पुरावे मात्र हवे तितके आहेत) आणि ज्या अर्थी मराठी लेखकांची मराठीची तरफदारी करणारी एकतर्फी वचने मात्र आढळतात त्या अर्थी असे दिसते की कोणत्याहि मराठी ग्रंथात मराठीची प्रशस्ति यावी व ती प्रशस्ति संस्कृतच्या तुलनेने यावी असा केवळ उपचार होता. त्या शिवाय जणू कोणताहि मराठी ग्रंथ पूर्णच होत नाही अशी पारंपरिक समजूत असावी. जशी गणेश, सरस्वती, सद्गुरु इत्यादींची नमने तशीच

अनुक्रमणिका

मराठी–संस्कृत संबंधीची वचने ! ज्ञानेश्वरांनी ही परंपरा सुरू केली ती उत्तरोत्तर चढती वाढती चालली. फादर स्टीफन्स सारख्या ख्रिस्ती कवीने देखील आपल्या मराठी ग्रंथात मराठीची प्रशस्ति करून ही पद्धति चालू ठेवली. फादर स्टिफन्सचे मराठी–प्रेम हे ज्ञानेश्वरादि भारतीय कवींच्या सारखे मनापासूनचे नव्हते; केवळ वेगडी होते हा भाग वेगळा. या वचनावरून संस्कृत पंडितांच्या मराठी विरोधाची कल्पना करण्याचे काही कारण नाही. त्यांच्यावरचा तो केवळ मिथ्यारोप आहे असे वाटते.

(३) आता संस्कृत पंडितांनी बुद्धिपुरस्सर कृपणपणे संस्कृतच्या कड्या कुलपात ज्ञान बंद करून ठेवले होते काय याचा विचार करू. ज्ञानेश्वर महाराजांनी 'कृपण' हे विशेषण लावले ते वेदास लावले संस्कृत भाषेस नव्हे. तीनच वर्णाच्या कानी लागणाऱ्या वेदांनी गीतारूपाने प्रगट होऊन आपले मागील उणे फेडले या विधानात गीतेची प्रशस्ति आहे. वेद हा 'निद्रिताचा घोरू' असून गीता हा त्याच सर्वेश्वराने जागेपणी केलेला वेदानुवाद आहे, हीहि गीतेची प्रशस्तीच आहे. यात संस्कृत भाषेत ज्ञान 'बंद' करून ठेवण्याचा आरोप अगदी नाही. गीता देखील संस्कृतातच नाही काय ? पण वेदास ज्ञानेश्वरांनी लावलेले 'कृपण' हे विशेषण कालांतराने अज्ञजन संस्कृतास न लावू लागले असे दिसते. वेदाक्षराचा अधिकार व वेदाक्षरार्थाचा अधिकार या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. दुसरा अधिकार सर्वांनाच होता. पुराणादिकाच्या द्वारा हे ज्ञान बहुजनसमजापर्यंत पोचण्याची सोय परंपरेने चालत आलेली होती. ज्या काळात छपाईची साधने नव्हती, कागदहि विशेष प्रमाणात उपलब्ध नव्हता व म्हणून साक्षरता प्रसारहि अशक्य होता त्या काळात प्राकृतात तरी ग्रंथ लिहून ते वाचणार कोण ? नाटकाची बाब वेगळी होती. कारण हा प्रयोगप्रधान वाङमय प्रकार लोकांच्या श्रवणांचाहि विषय होता. त्यामुळे त्यात प्राकृत येणे योग्यच होते. अशाहि अवस्थेत मराठी कवींनी मराठीत ग्रंथ लिहिले ते आडातील पाणी तडागास आणण्याचा प्रयत्न म्हणून योग्यच आहे. पण हा प्रयोग 'मराठीचिये नगरी, ब्रम्हविद्येचा सुकाळू' करण्यापुरताच मर्यादित होता. अन्य प्रौढ विषय मराठीत लिहिण्याचे प्रयोजनच नव्हते. परंतु हा मराठीचा (वा अन्य प्राचीन वा अर्वाचीन प्राकृत भाषेचा) प्रयोग केवळ प्रादेशिक होता. अखिल भारतीय वा वैश्विक नव्हता हेहि मान्य केलेच पाहिजे.

एका अर्थाने पाहिले तर कित्येक संस्कृत ग्रंथांचे वाचक त्यांच्या मराठी अवताराच्या वाचकांपेक्षा संख्येत अनेक पटींनी अधिक भरतील. ज्ञानेश्वरी वा वाचक वर्ग व गीतेचा वाचक वर्ग यांच्या संख्येची, जागतिक लोकसंख्या विचा-

रात घेऊन, तुलना केली तर काय दिसेल ? ज्ञानेश्वरीपेक्षा मूळ गीता अधिक वाचकांकडून वाचली जाते हेच सिद्ध होणार नाही काय ? मग ज्ञानेश्वरी बहुजनसमाजाची की गीता ? मराठीत ग्रंथ लिहिला की तो सोपा होतो म्हणावे तर मराठी ज्ञानेश्वरी संस्कृत हितोपदेशापेक्षा केवळ भाषेच्या कारणावरून सोपी आहे काय ? संस्कृत ग्रंथाची प्रादेशिक रूपांतरे व अवतार होणे आवश्यक असले तरीहि मूळ संस्कृत ग्रंथांची गरज त्यामुळे नाहीशी होत नाही. कोणत्याहि संस्कृत पंडिताने ज्ञान बंद करून ठेवले नाही ते सर्वांस सर्वत्र खुलेच होते व प्रत्येकास त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे कणाकणाने ते मिळतहि होते. पण आश्चर्याची गोष्ट अशी की संस्कृत विरुद्ध बंड म्हणून ज्यांनी ज्यांनी प्राकृतचे प्रयोग केले त्यांना पुन: त्याच बाबतीत संस्कृतचाच आश्रय घ्यावा लागला. 'लोकां'च्या भाषेत म्हणजे 'पाली'त उपदेश करण्याचा प्रयोग बौद्धांनी करून पाहिला. पण कालांतराने त्यांच्या प्रमुख पाली ग्रंथांचा परत संस्कृत अनुवाद करावा लागला. कित्येक महानुभावीय मराठी ग्रंथहि यास अपवाद नाहीत. फार काय सांगावे, ज्ञानेश्वरीचाहि अलिकडे संस्कृत अनुवाद होऊन सर्व जगांतील संस्कृत ज्ञात्यांना ज्ञानेश्वरी वाचण्याची सोय झाली, याचा अर्थ या नव्या अवतारात ज्ञानेश्वरी अधिक लोकाभिमुख (निदान व्यापक प्रदेशाभिमुख) झाली असा होत नाही काय ? प्रादेशिक कक्षेच्या बाहेर पडावयाचे झाले की प्रादेशिक भाषेचा आग्रहहि सोडावा लागतो व विद्वद् भाषेकडेच वळावे लागते. राज्य व्यवहारकोशासारखे ग्रंथ ऐन मराठी राज्यात संस्कृतात याच कारणासाठी रचले गेले. संस्कृतचा बुद्धिपुरस्सर त्याग केलेल्या प्राकृत लेखकांच्या प्राकृत ग्रंथांची परत संस्कृतात रूपांतरे होणे हे कोणास विडंबन वाटेल. पण तसे नाहीं, तीहि एक गरज आहे. आज आपण महत्त्वाचे ग्रंथ इंग्रजीत लिहिले जावे, निदान ते भाषांतरले जावे असा प्रयत्न करतोच की नाही ? तसाच स्तुत्य प्रयत्न संस्कृत पंडितांचा होता. त्यात ज्ञान लपविण्याचा किंवा कृपणतेचा लवलेश नव्हता. उलट ज्ञान अधिक चिरस्थायी व व्यापक करण्याचा तो प्रयत्न होता. मराठी लेखकांची दृष्टि देखील मराठी भाषेपेक्षा वर्ण्यविषयाच्या पावित्र्यावरच जास्त खिळली होती हा महत्त्वाचा मुद्दा या भाषिक वादात बहुधा दुर्लक्षिला जातो.

(४) आज महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी पैशाची प्राकृत भाषा खऱ्या अर्थाने मृत झाल्या असून, सर्व प्रादेशिक भाषांस प्रतिष्ठा व संजीवनी देणारी संस्कृत तेवढी जिवंत आहे असे म्हणावे लागेल. आचार्यांनी द्राविडी व मम्मटाने उत्तरीय प्रादेशिक भाषात आपले ग्रंथ लिहिले असते तर आज आपण त्या ग्रंथाचा जसा मुळातून आस्वाद घेऊ शकतो तसा सुलभतेने घेणे शक्य झाले

असते काय ? मराठी कवींनी संस्कृतचे हे ज्येष्ठत्व व श्रेष्ठत्व मान्य केले आहे.

प्रादेशिक भाषा प्रतिष्ठित झाल्या की त्या संस्कृत होत जातात. त्यानंतर अनेक बोली डोके वर काढतात. आपले स्वतंत्र अस्तित्व व स्थान आहे असा आहंकारिक दावा करतात. (अलिकडच्या कांही प्रादेशिक मराठी कादंबऱ्यातील बोली किंवा कोकणीचा वाद हे याचे उदाहरण म्हणून दाखविता येईल.) आकुंचित क्षेत्रात त्यांची थोडी चलती दिसते. बाहेर पडले की या बोली अधिक शहाण्या व प्रौढ होऊन संस्कृतात मिळतात किंवा संस्कृतचा आश्रय घेतात. अशा रीतीने प्राकृताची ये जा व रूपांतरे चालू असतात. संस्कृत मात्र शैलनिवेशासारखी स्थिर व सार्वकालिक राहते हेच तिचे बळ आहे. (दासोपंता सारख्याने 'घट' इ. चे उदाहरण घेऊन संस्कृतपेक्षा मराठी अधिक अर्थवाहक आहे असा दावा केला तरी तो केवळ विनोद आहे हे ग्रंथ-संदर्भावरून ध्यानात येईल.)

सारांश मराठी (किंवा प्राकृत) व संस्कृत या दोन्ही भाषांची गरज आहे. दोघींनाहि आपापली स्थाने व कार्ये आहेत. त्यात संघर्ष व वाद नव्हता व नाही. उलट त्यांचे एकमेकांना सहायच झाले आहे. प्राचीन मराठी कवींच्या वचनाकडे याच अर्थाने पाहिले पाहिजे.

सुखात्मिका आणि कॅथर्सिस

—प्रा. म. ना. लोही

मानवी जीवन हे सुखदु:खाने युक्त आहे म्हणूनच सुखात्मिका आणि दु:खात्मिका हे प्रकार निर्माण झाले असावेत ! दु:खात्मिकेचा (Tragedy) व्यक्तीवर काय परिणाम होतो हे ॲरिस्टॉटलने आपल्या विरेचन सिद्धान्ताने (Catharsis) जगाला उघड करून सांगितले आहे. तथापि, सुखात्मिका कोणता परिणाम घडवून आणते याबाबत तो बव्हंशी मौन धारण करून बसला आहे. सुखात्मिकेमुळे मानवी मनातील कांही मूलभूत प्रवृत्तींचे विरेचन होणे शक्य आहे काय ? या प्रश्नावर थोडा प्रकाश टाकण्याचा या लेखात प्रयत्न केला आहे. त्यावर तज्ञांनी अधिक चर्चा करावी अशी अपेक्षा आहे.

मानवी जीवनाचे वैशिष्ट्य व वैगुण्य आपल्या समृद्ध जीवनानुभूतीतून स्पष्ट करून माणसाला अंतर्मुख करण्याचे कार्य प्रत्येक प्रतिभावंत करीत असतो. कोणाला घडलेले जीवनदर्शन करुण आणि गांभीर्यपूर्ण तर कोणाला घडलेले जीवनदर्शन खेळकर आणि सुखद असते. तदनुसार त्याच्या कलाकृतीला—विशेषत: वाङमयकृतीला—प्राप्त होणारे स्वरूप असते. नाटयक्षेत्रात दु:खात्मिका व सुखात्मिका हे वर्गीकरण असेच आहे. वरवर पाहता दु:खात्मिका ज्याप्रमाणे माणसाला अंतर्मुख बनवून विचार करावयास लावते त्याप्रमाणे सुखात्मिका मानवाला विचारप्रवृत्त करीत नाही. मग सुखात्मिकेचे उद्दिष्ट काय ?

या संबंधात पाश्चात्य देशात अनेक उपपत्ति मांडण्यात आल्या आहेत. बर्गसाँ (Burgson) म्हणतो की सुखात्मिका ही समाजातील दोष दूर करण्यास मदत करते. यावर लेसिंग (Lessing) विरोध करतो. तो म्हणतो की मोलियरने उपहास आणि उपरोध यांच्या सहाय्याने व्यक्तीच्या व समाजाच्या अनेक दोषांवर हल्ले चढवले म्हणून कांही सामाजिक दोष दूर झाले नाहीत. फार तर असे म्हणता येईल की सुखात्मिका ही इतरांमध्ये असलेल्या दोषांपासून दूर राहण्यास प्रवृत्त करते. म्हणजेच सामाजिक दोषांचे निर्मूलन करणे हे सुखात्मिकेचे उद्दिष्ट नव्हे.

मनोरंजन करणे हे सुखात्मिकेचे उद्दिष्ट असून जीवनातील मांगल्य आणि मौज यांचा आविष्कार तिने करावा असा शॉपेनहार या तत्त्वज्ञाचा अभिप्राय आहे. ग्रीसमधील सुखात्मिकांची निर्मिति सामान्य लोकांच्या

अनुक्रमणिका

मनोरंजनार्थ झाली तर भारतातील सुखात्मिकांची निर्मिति राजांच्या व राजसभेच्या करमणुकीसाठी झाली असे आढळून येते. भरतमुनीने मनाचे रंजन किंवा सान्त्वन हे नाटयकलेचे प्रयोजन असल्याचे आवर्जून सांगितले आहे. तरीहि मनोविनोदन हेच सुखात्मिकेचे उद्दिष्ट होय असे म्हणवत नाही.

श्लेगेल च्या मते सुखात्मिकेचे उद्दिष्ट लोकांचा उपहास अगर मस्करी करण्याचे नसून त्यांना सभ्य आणि शिष्ट वर्तन करण्यास शिकविण्याचे आहे. हे कार्य करण्याला सुखात्मिका असमर्थ असल्याचे लेसिंग सांगतो हे आपण पाहिलेच. याचा अर्थ असा की सुखात्मिकेचे उद्दिष्ट आणि कार्य यावद्दल समीक्षकात एकमत नाही. तिचा व्यक्तीवर आणि समाजावर होणारा परिणाम अस्पष्ट आणि अनाकलनीय आहे. तरीहि एक प्रश्न विचारावासा वाटतो. ज्याप्रमाणे दुःखात्मिका ही माणसातील भीति आणि अनुकंपा या मूलभूत भावनांचे विशुद्धीकरण करते त्याप्रमाणे सुखात्मिका ही विरेचनाचे कार्य करू शकेल काय ?

प्रो. कपूर (Prof. Lane Cooper) यांनी या संबंधात कांही निष्कर्ष काढले आहेत. ते म्हणतात– 'ज्याप्रमाणे दुःखात्मिकेत भय आणि अनुकंपा या प्रमुख सहज प्रवृत्त भावनापासून व्यक्तीला सुटकेचे समाधान मिळते त्याप्रमाणे सुखात्मिके द्वारा तेवढयाच प्रवळ व सार्वत्रिक स्वरुपाच्या क्रोव (Anger) आणि मत्सर किंवा असूया (envy) या भावनांपासून माणसाची मुक्तता होऊन त्याला हलके वाटणे शक्य आहे.' Now, two emotions equally common with pity and fear, and specially capable of relief through comedy, are anger and envy. Both These emotions are rather constant in daily life. They are like pity and fear, intimately related, both are disturibng emotions; and their catharsis would amount to a form of pleasure as is the catharsis of tragic emotions. पुढे हेच विवेचन करताना त्यांनी क्रोध आणि असूया यांचा उम्दव कसा होतो हे स्पष्ट केले आहे. Going a little deeper, we find that anger and envy are emotions that arise from a sense of injustice or injury. विपमता आणि अन्याय हीच यांची मुख्य उगमस्थाने होत. माणसाचे मन दुखावताच तो रागावतो. अर्थात् क्रोध ही सहज प्रवृत्ति (Instinct) असून अगदी लहानपणापासूनच तिचा उद्रेक पाहावयाला मिळतो. असूयेची भावनाहि मूलभूत स्वरुपाची आहे. अगदी लहानपणापासूनच ती दृग्गोचर होते. लहान भावाचे लाड होत असलेले पाहून बालकाच्या मनास असूया निर्माण होऊ लागते. तो आत्मविधानाला (Self assertion) प्रवृत्त होतो. म्हणजेच, आत्मविधानाच्या सहज प्रवृत्तीशी असुयेची भावना निगडीत असते. आणि सुखात्मिकेत अन्याय झालेल्या व्यक्तीला बहुधा

न्याय मिळालेला दिसून येतो. साहाजिकच आपल्यालाहि न्याय मिळेल या सुखद जाणीवेमुळे ही असूयेची भावना तीव्रता सोडून मंदावत जाते. तसेच क्रोधाचेहि आहे. क्रोध हा क्षणिक असतो. म्णूहनच राग आला की दहा अंक मोजावे, असे म्हणतात. अेवढयानेसुद्धा रागाची तीव्रता कमी होते. मग क्रोध आलेला माणूस हसू शकला तर त्याचा क्रोध एकदम नाहीसा होऊ शकतो, हे सांगणे नलगे ! अर्थातच या क्रोधाचा गंड (Sentiment) निर्माण व्हावयाच्या आधीच हे शक्य असते. सुखात्मिकेचा स्थायिभाव हास्य हाच असल्याने तिच्या दर्शनाने अगर वाचनाने रागाचा पारा कमी होऊन मनाचे शुद्धीकरण सहज शक्य आहे.

सुखात्मिकेमुळे मनाला वाटणारा आनंद आणि उत्साह यांचे स्वरूप इतके साधे नाही. इतके विशुद्ध नाही. आपल्या मनावर दडपण आणणाऱ्या आणि त्याला ग्रासून बसणाऱ्या क्रोध व असूया या भावनांचे विरेचन झाल्यामुळे मन शुद्ध होत असले तरी मनाला आनंद देणाऱ्या गोष्टीत अपेक्षाभंगाचा धक्का, उपहासित व्यक्तिसारखे आपण नाही हे समाधान यांचाहि अंतर्भाव होतो. कांहीसा असाच प्रकार दुःखात्मिकेतहि होत असतो. शिवाय दुःखात्मिकेची तऱ्हा ही Homeopathic म्हणजे मूळ रोगाला चेतवून मग त्यावर उपाय योजना करण्याची तर सुखात्मिकेची तऱ्हा Allopathic म्हणजे रोग दावून टाकण्यासाठी उपाय योजना करण्याची असते. कारण सुखात्मिका ही माणसातील क्रोध आणि मत्सर यांना चेतावणी न देता त्यांच्या मुळावर घाव घालण्याचा प्रयत्न करते. विशेषतः मनाला टोचणारी अन्याय्य आणि विषम परिस्थिति कधी तरी निवळून आपल्यालाहि न्याय मिळेल अशी सोयिस्कर समजूत करून घेण्याला सुखात्मिका प्रवृत्त करीत असते. पण त्यासाठी सुखात्मिकेचे स्वरूप उपहास व उपरोव यांनी युक्तच असावे असे नाही. ज्यात विनोदाला प्राधान्य आहे असे नाटक हे कार्य सहज घडवून आणू शकेल.

क्रोध आणि मत्सर यामुळे माणूस विवेकहीन बनतो. क्रोधामुळे वुद्धिभ्रंश होतो असे गीतेतहि सांगितले नाही का ? रागाच्या भरात मनुष्य दुसऱ्याचा जीव घ्यावयासहि मागेपुढे पाहत नाही ! मत्सरामुळे देखील माणसाच्या हातून असामाजिक कृत्ये घडू शकतात. म्हणून या भावनांचे विरेचन होणे आवश्यक आहे. आणि त्यावर तोडगा विनोद आणि तज्जन्य हास्य हाच आहे. पूर्वीच्या काळी राजदरबारातील विदूषक हे कार्य करीत आणि राजाचा राग शमवीत हेच विदूषकाचे कार्य सुखात्मिकेद्वारे होत असते. (येथे आपण हे ध्यानात घेतले पाहिजे की मुळात Catharsis ची उपपत्तीच विवाद्य आहे.) 'हसा आणि लठ्ठ व्हा' अशा अर्थाची जी इंग्रजी म्हण आहे तिच्यातहि हास्याचे सुप्त सामर्थ्य प्रगट

झाले आहे. दैनंदिन जीवनात पदोपदी अन्याय व अपमान सहन करणारा मनुष्य चिडचिडा बनतो. त्याच्या शरीरातील स्रावाचे प्रमाण वाढते आणि त्याचे स्वास्थ्य बिघडते. हे स्वास्थ्य पुन्हा लाभण्यासाठी हास्य हा एक चांगला उपाय आहे. हास्यामुळे मनातील दूषित भावनांचे (क्रोध आणि असूया) निराकरण होते. अर्थात् या भावनाच सुप्त असल्याने त्यांचे निराकरण देखील अदृश्य आणि अव्यक्तच असेल तर नवल नाही. प्रस्तुत विवेचनावरुन हास्यामुळे म्हणजेच सुखात्मिकेमुळे माणसाच्या मनातील सुप्त क्रोध आणि असूया यांचे विरेचन होऊन विशुद्धीकरण होते या मताला पुष्टी मिळते. ॲरिस्टॉट्ल याबाबत गप्प आहे हे आधी सांगितले आहेच.

तथापि, दुःखात्मिकेचे आवाहन अधिक व्यक्तिगत असते. सुखात्मिकेचे तसे नाही. सुखात्मिकेचे आवाहन अधिकतर सामाजिक असते. कोणत्याहि गोष्टीचा अतिरेक वाईट हे 'एकच प्याला' आणि 'साष्टांग नमस्कार' ही दोन्ही नाटके पटवून देत असली तरी त्यांचे व्यक्तिमनावर होणारे परिणाम किती भिन्न असतात ? तसे पाहिल्यास आनंद देणे हेच कोणत्याहि वाङमयकृतीचे उद्दिष्ट असते. फक्त त्या आनंदाचे स्वरूप सुखात्मिकेच्या बाबतीत वेगळे आणि दुःखात्मिकेच्या बाबतीत वेगळे असते. तरीहि Relief ची भावना दोन्हीतहि असू शकते हेच प्रामुख्याने सांगावयाचे आहे.

प्रो. भूषण (Prof. V. N. Bhushan) यांनी असे मत व्यक्त केले आहे की सुखात्मिका ही दुःखात्मिकेप्रमाणेच मानसिक विशुद्धीकरण घडवून आणू शकते. High comedy is as purifactory as pure tragedy, and it [is thus that both discharge the same ethical function of catharsis. त्यांनी वापरलेला High Comedy हा शब्दप्रयोग लक्षात घ्यावयास पाहिजे. केवळ प्रहसनांनी हे कार्य होणार नाही असेच जणू त्यांना सुचवावयाचे आहे. हसवता हसवताच रडवणारी आणि अंतर्मुख करणारी उत्कृष्ट सुखात्मिकाच हे विशुद्धीकरणाचे कार्य करू शकते असे प्रा. भूषण यांनी म्हटले आहे. विचारांती कोणालाहि हे मत पटेल !

—सत्याग्रह—

("Poets' contribution to Satyagraha" या रवींद्रनाथ टागोर यांच्या कवितेचा मराठी अनुवाद)

अनुवादक—शरच्चंद्र वामन रानडे

प्रभो त्वदाश्रय सदा अम्हांप्रति ।
अविश्वास जरि तव सामर्थ्यी—
तरीच जगती वाटे भीती ।
दृढ श्रद्धा मम राहो तुजवरि, निर्भय मन मम राहो दे ॥
कोण नृपति वा मानव पामर—
थोर, ईश्वरा, त्वत्सम भूवर ? ।
अपार शक्ती साह्यासी तव तरि मी राहू का न मुदे ? ॥ १ ॥

कोण हरिल मम स्वातंत्र्याते ?
कोण करिल मज प्रतिबंधाते ?
कोण नेइ कारागृहि माते ?
प्रबल असे या त्रिभुवनात तरि कोणाची सत्ता ऐशी ? ॥
बंदिगृहाच्या भिंति भेदुनी,
प्रेमल स्वकरी मज आलिंगुनी—
देशी प्रभो तूं अप्रतिबद्ध स्वातंत्र्या मम जीवासी ? ॥ २ ॥

जेवि धनाचा क्षुद्रहि ठेवा—
कृपणासी अति प्रिय वाटावा ।
देह तेवि का हा मज व्हावा ? ।
जड देह का कवटाळावे धरुनि भीति मी मृत्यूची ? ॥
त्यागिताचि या देहा मृण्मय
चिरानंद मज लाभे निर्भय ।
व्हावी कैसी विस्मृति मजसी तया चिरंतन सौख्याची ? ॥ ३ ॥

दुःखे अथवा मृत्यु भीषणहि
कृष्ण सावली क्षणिक असे ही ।
असुरि बलाचे पटल हे मही ।
सूर्या झाकी घुके क्षण तसे सत्य लुप्त जरि क्षण होय—

अनुक्रमणिका

अवमानुनिया मम धैर्याते
स्वशक्तिदर्पे छळितो माते
त्या नीचाहुनि अलोट बलयुत सखा पाठिशी तूं मदीय ॥ ४ ॥

तव इच्छेपरि जगि वर्ताया
वदावया वच, दु:ख सहाया
धैर्य असो सर्वस्व मुकाया ।
निर्जन स्थलिहि वास घडे तरि शांति ढळावी मनिची ना ॥
नश्वरशा या देहि यापरी
सात्विक राहे बल मम अंतरि ।
जोड अशा श्रद्धेची मज दे, प्रभो, प्रार्थना तव चरणा ॥ ५ ॥

क्षण भंगुरशा सौंदर्यातहि--
अभेद्य शक्ती सदैव राहो ।
ज्ञान तियेचे मजसी देई ।
मृत्यू वाटो मजसी जीवन, अपजय वाटो यश विमल ॥
दु:खे सकलहि मुदे सहावी ।
प्रत्ययकारी वुद्धि नसावी ।
सत्याचा आग्रह मनि दृढ हो, त्वत्पदि हो निष्ठा अढळ ॥ ६ ॥

एकएकला निश्वास

एकएकला निश्वास, देठहीन, ज्योतिसम
अंधारल्या अवकाशी पर्णहीन कासाविशी
चांदण्याच्या ठिणग्यांनी वाफारलेली आंसवे—
मुसमुस कोंदलेले शुभ्र गुलाबांचे थवे ॥

—गोविंद जोशी

बाभूळ

पिवळ्या फुलांनी
बाभूळ नटली
अंग घुसळून
मनासी हसली
ओहळात तिने
निरखिले रूप
सावळ्या अंगात
रंगला हुरूप
कातर श्वासात
जागले यौवन
मातीस बाजूच्या
मिळाले सांत्वन
आपुल्यात आता
रंगते बाभूळ
अंधारात तिला
जपतो ओहळ
रातकिडे तिला
गातात अंगाई
रंगविते तिला
नभाची निळाई
लागते मधून
कुणाची चाहूल
थरकते तिचे
उगीच पाऊल
कधी स्वतःशीच
हसून लाजते
एकटेपणात
भिजते, झिजते !

—बाबा मोहोड

रानात . . . रानात

रानात रानात
जांभुळ बनात
झडली श्रावणगाणी
गंधल्या मातीत
पूनव ऊजर
अंकुरे लाख वितानी

नागड्या झाडांना
लखडे पालवी
स्वप्निल होऊन धुंद
पांगल्या नभात
दाटली दर्वळ
ओठात रुतले छंद

सांजल्या मनात
जाणीव जागली
लेऊन मोत्याचा तुरा
क्षितीज वाटेत
सांडल्या चांदण्या
होऊन सोन-फुलोरा !

—ना. धों. महानोर

अनुक्रमणिका

पूजापाठ नको —

पूजापाठ नको, नकोस भुलवू स्तोत्रे मला गाउनी
नानारंगि फुले नकोत मजला वा बेल दूर्वांकुर
सोन्याचे नव दागिने मज नको, वस्त्रे नवी सुंदर
विद्याज्ञान अलंकृता बनुन मी होईत धन्या जनीं.

ओवाळून निरांजने मज नको घालू असे साकडे
सौगंधी नित धूपदीपहि नको, पंचारतीही नको
गाभाऱ्यातिल अंधकार उजळी जी मंद ज्योती नको
अंधारातुन या निघून मज द्या जाऊ प्रकाशाकडे

पक्वान्नेहि नकोत नित्य मजला, नैवेद्य वाटे सजा
भाजीभाकर रोजची मज पुरे, प्रेमे जरी वाढिता
प्रेमाचा मज एक शब्दहि पुरे, स्तोत्रे नको आरत्या
नाही मी भुलणार पाहुनि तुझी ही मानभावी पुजा

देवाचेहि तुम्हा खपे न जगती वर्चस्व तुम्हावरी
यासाठी मजला गुलाम करुनी या ठेविता मंदिरी.

—सौ. उषा लिमये

भाग्य

पहाट—एकांत...

एकांती मी तुला कुंकवाची सुंदरशी अर्धकोर—
—लावताना पाहिले !
तरी काय मी तुला सौभाग्यवती म्हणूच नको ?

तर वेळ...

कातरवेळी, साऱ्या साऊल्या निघून गेल्यावर,
मी तुला जाता जाता एकदा भरल्या डोळ्यांनी
माझ्याकडे बघताना पाहिले...
तरी काय मी मला भाग्यवंत समजूच नको ?

—भा. ज. कविमंडन

दान

झेपावले पंख
तेजाळले रूप
मानव्याचे माप. .पुरेच ना

दाही दीशा आता
कवळाव्या उरी
घ्यावे पंखावरी...ब्रह्मांडही

याचसाठी आहे
युगायुगी यत्न
कैवल्य ते दान..देशील कां?

—मनोहर अपोनारायण

मुक्या पाखराची बोली

तुझ्या निळ्या लोचनात
निळे भाव आढळले
आणि माझ्या हृदयात
स्वप्न उद्याचे हासले

चांद ताऱ्यांची लाखोळी
झाली भावनेची ओळ
कसे बोलावे ओठांनी
नाही साहवत कळ

मंत्रमुग्ध मनातली
सांज वहूरून आली
नाही कळायची तुला
मुक्या पाखराची बोली

—म. ना. श्रीखंडे

उल्का

नील नभातिल एक चांदणी
तन्मय होउनि गाते गाणी
त्यात अुमटते तिची कहाणी
वाऱ्यावरती किरणांवरती
लहरत आली माझ्या कानीं
"निळ्या सांवळ्या विशाल रानीं
वृक्षवल्लरी इथे न पाणी
जिकडे तिकडे माझ्या बहिणी

सूर्य चंद्रमा सभोति पिंगा
घालित मोही दाहि दिशांनी
सूर्याचे नच प्रेम कुणावर
कुणा न घेई अपुल्या ध्यानी

पूर्णचंद्रमा सुखकर, शीतल
रुप जयाचे राजस वाणी
घडपड अमुची मोहि तयावर
प्रति पंक्तीची गाते गाणी

मूल्य तयाचे कुणा न मिळते
म्हणुनि सांगते ही रडगाणी
प्रीत तयाची सदा निछावर
ती बघ हंसते शुक्र चांदणी

प्रीत सुमांची वृष्टि तिच्यावर
सदा उगवते निकट राहुनी
हिच्याच पायी तापुन तापुन
उड्या घालती माझ्या बहिणी

उल्का होउन, त्यागित जीवन
तरिही हंसते शुक्र चांदणी
कैफात प्रीतिच्या रुपगर्विता
एके दिवशी मीही ठेविन
उल्का होउन माझे जिवन
प्रितयज्ञाच्या बलिवेदीवर
अर्पुनि देहा सार्थक कल्पिन"

नील नभातिल एक चांदणी
तन्मय होउनि गाते गाणी
वाऱ्यावरती, किरणांवरती
लहरत आली माझ्या कानी.

—यशवन्त पारखी

खऱ्या कवीला काव्य सुचावे

चहुबाजूला हिरवळ आणिक रम्य सुगंधी पुष्प ताटवे
संध्यासमयी नीलाकाशी खगपंक्तींनी उंच उडावे
पिउनि सुगंधा वाऱ्याने त्या वातावरणा धुंद करावे
अशा निसर्गासन्निध असता खऱ्या कवीला काव्य सुचावे

पहाट वारा कुजबुजताना पूर्व दिशेला चढे रवितमा
सोनेरी रविकिरणे देती निसर्गास तो गोड मुलामा
वृक्षाच्या पानावर दिसती दव बिंदूंची सुखद आंसवे
अशा निसर्गासन्निध असता खऱ्या कवीला काव्य सुचावे

खटयाळ अवखळ निर्झर धावे निळे तयाचे रूप गोजिरे
तरु वेलींच्या ताटव्यात त्या कोणी पक्षी हळुच चिवचिवे
निर्जन रानी निशब्द वाणी कविमन कैसे शांत बसावे
अशा निसर्गासन्निध असता खऱ्या कवीला काव्य सुचावे

दिसता बालक गोड निरागस दिसे कवीला अपुले शैशव
भान हरवुनी बघे त्याकडे ऐकुन त्यांचा गोड शब्दरव
वात्सल्याने उचंबळे ते हृदय कवीचे अयांग हळवे
असे निरागस शैशव दिसता खऱ्या कवीला काव्य सुचावे

सदा भोवती दु:खच असता दु:ख सागरा येई भरती
कारुण्यमयि जीवन जगता नयनामधुनी अश्रू झरती
आर्त मनाची व्यथा साहता मनोमनी ईशास आठवे
अशाहि साश्रू नयनी सुद्धा खऱ्या कवीला काव्य सुचावे

कविमन असते हळवे चंचल मुळी न राही ते स्थिर क्षणभर
जिथे तिथे त्या सुचे कल्पना काव्य करी तो मिळता अवसर
उठता, बसता, हसता, रडता काव्यामागे कविमन धावे
अनुसरुन त्या वातावरणा खऱ्या कवीला काव्य सुचावे.

—आशा लिमये

अनुक्रमणिका

खुळी :

भिजलेली अर्ध जरी
सुटलेली थंड हवा
सुकलेल्या ओठावर
दहिवरला रंग नवा...१

दहिवरला रंग नवा
अंधारी रात्र खुळी
मेघांच्या सावलीत
झोपली न आज मुळी...२

आज कशी जाग तिला
काचळल्या डोळियात
ध्यास घेत क्षितिजाचा
भेरवीस आळवीत...३

—सुखराम हिवराळे

व्यथेची कहाणी

टाळ मृदंगाच्या
ओलावल्या कडा
विटेवर तडा
शहारला...

जळत्या उबेला
कस्तुरीचा वास
काळजीचा ध्यास
भोवळतो...

अंधाराच्या डोळा
चांदणीचे पाणी
व्यथेची कहाणी
पान्हावली...

—केशव बोबडे

कळ

कळ आली कळ आली
कळ लावूनिया गेली
गेली गंधाने भरून
रित्या मनाची पोकळी

कळ आली कळ आली
फिरली रक्तात वादळे
निळया अंधारात न्हाले
कोंब विजेचे कोवळे

कळ आली कळ आली
स्मृति चाळवून गेली
अंधाराच्या कचपाशी
खूण शुक्राने खोवली

कळ आली कळ आली
आली काळीज पिळून
पुन्हा नव्या वादळाने
गेले क्षितिज पेटून

कळ आली कळ आली
बंध देहाचे गळले
आणि माझ्या अस्तित्वाने
सारे आकाश व्यापले

—म. ल. वराडपांडे

वेड

या मातीच्या कणाकणातिल
नवसृजनाचे वेड मला—
अणुरेणूतुन येथे मजला
थाट विराटाचा दिसला ! ॥ १ ॥

या दगडाची निधडी कणखर
छाती लावी वेड मला—
कठोर हृदयी ओलावा अन्
देवपणा मज जाणवला ! ॥ २ ॥

या गवताची जीवत उन्मूख
वृत्ती लावी वेड मला—
खडकाखडकातून जयाने
बरडमाळही पालविला ! ॥ ३ ॥

या पाण्याच्या रंग–तरंगी
चैतन्याचे वेड मला—
हांसत खेळत आकाशाला
हात जयाने लावियला ! ॥ ४ ॥

या झाडांच्या पानफुलातिल
रसरंगाचे वेड मला—
ऊन्ह, चांदणे, वायु, खगांचा
छंद जयाने जडवियला ! ॥ ५ ॥

या गाईंच्या गोपालांच्या
संथपणाचे वेड मला—
बघता बघता अनुभवली मी
सुख शांतीची भोगकला ! ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

या पक्षांच्या हलक्या चंचल
पंखाचेहि वेड मला--
जड देहाला उद्धारुनिया
आसमंत नव दाखविला ! ॥ ७ ॥

या मेघांच्या आकाराति
नूतनतेचे वेड मला--
नाना रंगी रंगुन ज्यांनी
रंग जीवनी भरून दिला ! ॥ ८ ॥

या ताऱ्यांच्या, हंसऱ्या गहिऱ्या
रूपाचेहि वेड मला--
अंधाराचा मार्ग मनाचा
सोबत करुनी उजळियला ! ॥ ९ ॥

या नीलाच्या गूढ मनाचे
मौनाचेहि वेड मला--
या गूढाचा, या मौनाचा,
अर्थ अनंत मी ओळखिला ! ॥ १० ॥

कणाकणाने, क्षणाक्षणाने
विश्व लाविते वेड मला !
सारे जाते, केवळ उरतो--
वेडेपणाच भरलेला ! ॥ ११ ॥

—शं. श्री. वाशीकर
उस्मानाबाद.

विराणी

समर्पणाचे भाव घेउनी
बांधलेत स्वप्नांचे सेतु
कळा पाघरुन अमंगळाची
तरिहि नासले अवघे हेतु

भग्नागारी या करमेना
अवाक आता परत फिरावे
अनवाणी इच्छांच्या गावी
मीच एकटा वसती व्हावे

कधीचाच मी जाइन म्हणतो
इथेहि चुकती परंतु ताळे
पायावरती खिळे मारुनी
हा कुरवाळे, तो कुरवाळे...

विझण्याचे भय म्हणुन जळावे
तसाच मी श्वासांना सोबत
दु:खावरुनी हात फिरविता
खूप रडावे, रडवे हासत

अशी वंचना लाख थरांची
जिच्याखालती झुरते जोगिण–
अपेक्षितेची किती काळच्या
गात विराणी तेव्हापासुन

—श्रीधर शनवारे

अनुक्रमणिका

आजची लघुकथा

(चर्चा)

(प्रा. श्री. मा. कुलकर्णी व प्रा. भ. प्र. मोहरीर)

प्रा. मोहरीर–नमस्कार कुलकर्णी

प्रा. कुलकर्णी–नमस्कार मोहरीर. आज आपणाला 'आजची लघुकथा' या विषयावर चर्चा करायची आहे.

प्रा. मोहरीर–हो ! पण प्रथमच एका गोष्टी संबंधी खुलासा झाला पाहिजे.

प्रा. कुलकर्णी–कोणती गोष्ट म्हणता ?

प्रा. मोहरीर–आज घडीला जुने नवे असे अनेक लेखक कथालेखन करीत आहेत. तेव्हां आजची कथा म्हणजे नवकथा म्हणून जी ओळखली जाते तीच तेवढी घ्यायची की आज निर्माण होत असलेली पण जुन्या वळणाची अशी कथाहि विचारात घ्यायची ?

प्रा. कुलकर्णी–तुम्ही म्हणता ती अडचण आहे खरी. परंतु आपणाला जुने नवे सर्वच प्रवाह विचारात घेतले पाहिजेत. असे केल्याने कालच्या कथेच्या तुलनेने आजच्या कथेचे स्वरूप अधिक स्पष्ट होऊ शकेल.

प्रा. मोहरीर–हो. स्थूल मानाने गेल्या १०–५ वर्षांतली कथा विचारात घ्यायला कांही हरकत नाही. मघा तुम्ही भिन्न प्रवाहांचा उल्लेख केला त्या दृष्टीने पाहिल्यास आज कथा लेखकांच्या तीन पिढया विद्यमान आहेत असे म्हणता येईल. त्यांच्या लेखनाच्या आधाराने आपणांला हे भिन्न प्रवाह तपासून पाहता येतील.

प्रा. कुलकर्णी–भिन्न प्रवाह तपासण्याचा तुम्ही म्हणता तोहि मार्ग उपयुक्त होईल. या तीन पिढयापैकी पहिली पिढी फडके, खांडेकर, चोरघडे, बोकील यांची मानावी लागेल. होय ना ?

प्रा. मोहरीर–हो. आणि दुसऱ्या पिढीचे मानकरी गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर, शांताराम हे होत. याशिवाय आजच्या पिढीतील लेखकात अनेक उगवते कथालेखक असून त्यांनी मराठी कथेचा फुलोर फुलविला आहे.

प्रा. कुलकर्णी–तिसरी पिढी अद्याप आकाराला यायची आहे अशा समजुतीने तुम्ही या पिढीतील कथाकारांची नांवं घेण्याचं टाळलं ते रास्तच आहे. तरीपण

अनुक्रमणिका

कथाविश्वाचा वेग लक्षात घेतला तर एवढ्यात तिसरी पिढीहि क्षितिजाच्यावर आली आहे आणि शंकर पाटील, द. मा. मिरासदार, जी. ए. कुलकर्णी, उद्धव शेळके अशी कांही नांवे कथा वाचकांच्या परिचयाची व आवडीचीहि होत चालली आहेत.

प्रा. मोहरीर–तुम्ही म्हणता हीच तिसरी पिढी माझ्याहि समोर आहे. या पिढ्यांपैकी पहिल्या पिढीचे कोणते ठळक विशेष तुम्हांला वाटतात ते सांगा तर बरं होईल.

प्रा. कुलकर्णी–असे विशेष सांगण्यामधे एक अडचण आहे. जिला आपण आजच्या आपल्या चर्चेसाठी पहिली पिढी म्हटली तिच्यात वस्तुतः दोन पिढ्या आहेत. फडके, खांडेकरांची एक व चोरघडे, कुसुमावती देशपांडे यांची दुसरी. या प्रत्येक पिढीने, नव्हे तिच्यातील प्रत्येक प्रमुख कथाकाराने देखील, मराठी कथेला कांही विशेष प्रदान केले आहेत.

प्रा. मोहरीर–तुम्ही म्हणता ही अडचण आहे खरी. तथापि या दोन्हीहि पिढ्या कालच्या झाल्यामुळे कालच्या लघुकथेचे विशेष लक्षात येण्यासाठीच या दोन्ही पिढ्यांच्या विशेषांचा उल्लेख करा म्हणजे झाले.

प्रा. कुलकर्णी–हा मार्ग मलाहि बरा वाटतो. प्रा. फडके यांनी मराठी कथेला सर्वात मोठी देणगी जर कोणती दिली असेल तर ती तंत्रशुद्धतेची, हरिभाऊ आपट्यांच्या काळच्या गोष्टीतील गोष्ट' कायम ठेवून फडक्यांनी तिच्या मांडणीत आटोपशीरपणा आणला. तिला रेखीव आकार दिला; तिच्या कथनशैलीत लालित्य आणले. व तिच्या परिणामकारकतेत भर घातली. बोधप्रदतेच्या जबाबदारीतून तिला मुक्त केले आणि कलात्मक रीतीने संस्काराचा एकेरीपणा साधण्याला तिला शिकविले.

प्रा. मोहरीर–फडक्यांच्या कामगिरीचे तुम्ही केलेले वर्णन अचूक आहे. पण काय हो ! फडक्यांनी कथेच्या बाह्यांगात जसे परिवर्तन घडवून आणले तसा अंतरंगात कांही बदल केला असं म्हणता येत नाही. विशेषतः कथेच्या अंतरंगात त्यांना वैचित्र्य आणता आले नाही. मध्यमवर्ग व त्यातील तरुण-तरुणींचे प्रेम हाच त्यांच्या बहुतेक कथांचा विषय दिसतो.

प्रा. कुलकर्णी–तुम्ही म्हणता ते एका मर्यादेपर्यंत खरं आहे. पण पूर्णांशाने मात्र नाही. ज्याला मनोविश्लेषण म्हणण्यात येते त्याचा उपयोग फडक्यांनीहि बेताबाताने पण कलापूर्ण रीतीने केला आहे. आणि विषयांच्या दृष्टीने म्हणाल तर प्रेमाखेरीज इतर विषय त्यांनी हाताळले नाहीत असे म्हणणे बरोबर होणार नाही. विषयांच्या बाबतीत देशात घडणाऱ्या सामाजिक, राजकीय, आर्थिक

अनुक्रमणिका

इत्यादि हरतऱ्हेच्या घडामोडींकडे त्यांनी जागरुकतेने लक्ष पुरविलेले दिसते. मात्र हे खरे की एका विशिष्ट पातळीवरूनच व कांहीशा अलिप्तपणानेच त्यांनी या गोष्टींकडे पाहिले आहे. आणि अंतर्मुखतेविषयी म्हणाल तर तो विशेष मराठी कथेला अर्पण करण्याच्या बाबतीत प्रा. चोरघडे, यांचेच नांव घ्यायला पाहिजे. चोरघडयांनी कथेला अन्तर्मुख बनविले. तिच्यात सूक्ष्मता आणली व तिला काव्यात्मताहि बहाल केली.

प्रा. मोहरीर—जुन्या पिढीतील खांडेकरांचाहि आपणाला उल्लेख केला पाहिजे. त्यांच्या कथातील सामाजिक जाणीव व त्यातून घडणारे जीवन दर्शन यामुळे त्यांच्या कथा निराळ्या वाटतात. आणि अंतर्मुखतेविषयी म्हणाल तर चोरघडयांच्या बरोबरीनेच कुसुमावती देशपांडे यांचाहि उल्लेख करायला हवा. दोघांच्याहि कथातून एक प्रकारचे तत्त्वचिंतन जाणवते आणि त्यामुळे ती कथा फडके–खांडेकरांच्या कथेहून वेगळ्या पातळीवरील वाटते.

प्रा. कुलकर्णी—आज जिला सामान्यतः नव कथा म्हटले जाते तिचा उगम चोरघडयांच्या कथेतच सापडण्यासारखा आहे. केवळ अन्तर्मुखता व सूक्ष्मता या विशेषांच्या बाबतीतच नव्हे तर आजच्या कथेत जे भिन्नभिन्न प्रकार दिसतात त्यांचीहि सुरवात चोरघडयांनी केली असे म्हणता येते.

प्रा. मोहरीर—कोणते प्रकार म्हणता ?

प्रा. कुलकर्णी—आजच्या कथा–वाङ्मयाकडे पाहिले तर कांही कथांचा तोंडवळा लघुनिबंधासारखा दिसतो, काहींचे साम्य शब्दचित्राशी वा व्यक्ति-चित्राशी आहे. पु. ल. देशपांडे व व्यंकटेश माडगूळकर यांच्या कित्येक कथा शब्दचित्र किंवा व्यक्तिचित्राशारख्या आहेत. तर कांही 'एक मनोविश्लेषण' या सदरात पडतात. या तीन्ही प्रकारात बसतील अशा कथा चोरघडयांच्या कथा-संग्रहातून आढळतील. ग्रामीण जीवनाचे चित्रणहि चोरघडयांनी केलेले आहे.

प्रा. मोहरीर—हे खरे आहे. आणि म्हणूनच चोरघडे यांच्या कथातून जुन्या नव्याचा सांधे जोड आढळतो. 'शाहण्याने घातला उखाणा' ही त्यांची अली-कडची एक कथा. एका विवाहितेच्या बोथट जीवनातील हरपलेल्या श्रेयावर अचूक बोट ठेवते. फडके खांडेकरांची कथा स्वनिर्मित तंत्राच्या लक्ष्मणरेषे पलीकडे सरकत नाही. तसे चोरघडयांचे वाटत नाही.

प्रा. कुलकर्णी—फडके-खांडेकरांच्या कथांचा साचेबंदपणा नाकारण्याचे कारण नसले तरी त्यावर अवास्तव भर द्यावा हे मला योग्य वाटत नाही. तसेच पाहू गेले तर नवीन कथेचे आघाडीवरील कथाकार गंगाधर गाडगीळ किंवा अरविंद गोखले यांच्याहि कथेचा एक साचा तयार होत असल्याची, तक्रार

आता ऐकू येऊ लागली आहे. आणि हे सर्वांच्याच बाबतीत अपरिहार्य आहे असे मला वाटते.

प्रा. मोहरीर–परंतु गंगाधर गाडगीळांच्या प्रयोगशीलतेचा आवाका व नवनिर्मितेचे त्यांचे सामर्थ्य आघाडीवरील लेखकाला शोभेसेच आहे. 'पाळणा' हा गाडगीळाचा अलीकडचा कथासंग्रह पहा. व्यक्तिमनांतील विविध अनुभूति गाडगीळांनी धिटाईने व समर्थपणे रेखाटल्या. मानवी मनातील अबोध भाव-वृत्तींचे, क्रियाप्रतिक्रियांचे बारकावे गाडगीळांनी डोळसपणे टिपले. त्यांच्या कथेतील आशयाचा भार त्यांच्या समर्थ अभिव्यक्तीने पेलून धरला. मनो-विश्लेषणाच्या साह्याने व्यक्तिमनाचे पैलू त्यांनी शब्दगोचर केले.

प्रा. कुलकर्णी–हे सर्व खरे आहे. गाडगीळ काय किंवा अरविंद गोखले काय यांनी कथेला बरेच पुढे नेले यात शंका नाही. नव–कथेचे म्हणून जे विशेष सामान्य व सर्वमान्य झाले आहेत ते या दोघांच्या कथा विशेषात प्रामुख्याने आढळतात. नवी कथा अधिकाधिक अन्तर्मुख व सूक्ष्म होत गेल्याचे इथे दिसते. तुम्ही म्हणता तो मनोविश्लेषणाचा पैलूहि या पिढीने अधिक विकसित केला. परंतु आता हीहि कथा स्थिरावत असल्याचे, तिच्या मर्यादा स्पष्ट होत असल्याचे दिसते. अर्थात् माझ्या मते ही बाब तक्रारीची नाही.

प्रा. मोहरीर–ते कसेहि असले आणि या नवकथेत कांही दोषहि उत्पन्न झालेले असले तरी एक गोष्ट लक्षात घ्यायला पाहिजे ती ही की गाडगीळ गोखले किंवा भावे या नवकथाकारांनी व्यक्तिमनाचे व समाजजीवनाचे वेग-वेगळ्या पातळीवरून अनुभव घेतले आणि त्यामुळे मराठी कथा अधिक सखोल, झाली. व विविधतेच्या दृष्टीनेहि ती अधिक संपन्न झाली.

प्रा. कुलकर्णी–भिन्न पातळीवरील अनुभवांच्या दृष्टीने जशी संपन्नता दिसते तशी विषयांच्या बाबतीतहि भरपूर विविधता आजच्या कथेत आढळते. किंबहुना आजच्या कथेला कोणताहि विषय वर्ज्य राहिला नाही. समाजातील भिन्नभिन्न वर्गांचे तसेच भिन्नभिन्न प्रदेशातील समाजाचे चित्र आजच्या कथेने काढले आहे.

प्रा. मोहरीर–आजच्या कथेला विषयाच्या बाबतीत मर्यादा नाही हे खरेच आहे. कारण कोणतेहि बंधन या बाबतीत नवकथेने स्वीकारलेले नाही. फार काय अशिष्टता, ग्राम्यता, अशिवत्व, यांचाहि धाक नवकथा बाळ-गत नाही.

प्रा. कुलकर्णी–अहो, दुर्बोधतेचेहि भय तिला वाटत नाही.

प्रा. मोहरीर–दुर्बोधतेचा तुम्ही उल्लेख केला हे ठीकच झाले. नव-

अनुक्रमणिका

काव्याप्रमाणेच नवीन नवीन प्रतीके व अपरिचित संकेत नवकथेतहि वापरले जातात व ती दुर्बोध होते.

प्रा. कुलकर्णी–दुर्बोधतेचे केवळ एवढेच कारण आहे असे नाही. हेतू शून्यतेमुळेहि कित्येक कथा दुर्बोध वाटतात. तसेच मनोविश्लेषण व संज्ञाप्रवाह यांच्या आहारी जाऊन अबोध मनातील तुटक व्यापार जसेच्या तसे दाखविण्याचा हव्यास वाढल्यामुळे आजची कित्येक कथा अनाकलनीय व अनाकर्षक झाली आहे. मनोविश्लेषणाच्याच अतिरेकी उपयोगामुळे व चुकीच्या कल्पनेमुळे कित्येक कथांना विकृत स्वरूपहि प्राप्त झाले आहे. 'चंद्र सावली कोरतो' ही सदानंद रेगे यांची २–३ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली कथा या प्रकाराचं उत्तम उदाहरण होय. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, यांच्याहि या प्रकारच्या कांही कथा दाखविता येतील.

प्रा. मोहरीर–या मनोविश्लेषणाच्याच आहारी गेल्यामुळे आजच्या कथेत आणखी एक दोष उत्पन्न झाला आहे.

प्रा. कुलकर्णी–तो कोणता ?

प्रा. मोहरीर–आजच्या कथेत कथा ही फारच थोडी शिल्लक उरली. कांही कथातून तर कथा अशी कांही नसतेच. अरविंद गोखल्यांची 'मीलन' 'माहेर' किंवा कातरवेळ या कथा घ्या किंवा गाडगीळांची 'विन चेहऱ्याची संध्याकाळ' ही कथा पहा. या कथांना कथानक आहे असे म्हणता येणार नाही.

प्रा. कुलकर्णी–अहो पण हा कित्येकांना दोष वाटत नाही. कथा अधिकाधिक अन्तर्मुख बनल्याचेच ते एक लक्षण मानण्यात येतं पूर्वीची कथा घटना प्रधान असे. व्यक्तिप्रधान कथा मध्येहि कथानक असेच. पण आजच्या कथेत मात्र व्यक्ति–चित्रणाला, इतकेच नव्हे तर व्यक्तीच्या केवळ मनोविश्लेषणाला, महत्व दिले जाते. आणि जिच्यात काहीच घडत नाही अशी कथा अस्तित्वात येते. पणकथा म्हटली की तिच्यात गोष्ट story ही पाहिजेच.

प्रा. मोहरीर–असे कांही दोष नवकथेत जाणवत असले तरी एकंदरीने आशय व अभिव्यक्ति या दोन्हीं बाबतीत तिने पुष्कळच प्रगति केली आहे हे मान्य करावे लागेल. आशय अधिकाधिक सूक्ष्म व खोल होत गेला व अभिव्यक्ती अधिक वास्तवतेकडे झुकत गेली. नवीन नवीन प्रतिमा व संकेत यांच्यामुळे तिला एक प्रकारची धार येत गेली. तुम्हाला काय वाटतं ?

प्रा. कुलकर्णी-तुम्ही म्हणता ते मला पटण्यासारखंच आहे. परंतु कालच्या व आजच्या कथेची तुलना केली असता कांही गमतीदार विरोध मला जाणवतात. (पृष्ठ ७९ वर)

एक कथा तीन रूपे

लेखिका– सौ. इंदुमती शेवडे

[या कथेची दुसरी दोन रूपे यथावकाश 'युगवाणी'च्या वाचकांना सादर करू. ––संपादक]

बाहेर अंधारुन आलंय......सोसाट्याचा वारा सुटलाय......बंगली समोरची नाजूक, उंच 'वकेनची' झाडं जोरानं पिंगा घालीत आहेत....... रस्त्यावरील पान पाचोळा हवेत मिसळून आवर्तनं घालीत आहे .पलीकडच्या खोलीतून नितीनच्या पियानोचे स्वर कानावर पडत आहेत...ते स्वर माझ्या मनाला स्पर्श करुन जाताहेत, अन्. ..अन् स्मृतीची वलयं माझ्या मनात.... निर्माण होत आहेत.

आमच्या या कथेत पात्रं तीन.....मी, विसू अन् नितीन. आमची ही गोष्ट थोडी जगा वेगळी आहे....अकल्पित....कांहीशी अघटित आहे म्हणा हवं तर....पण विचित्र, भयंकर, विलक्षण अशी विशेषणं लावलेली मला सहन होत नाहीत... .एकाद्या तंतुवाद्याच्या नाजुक तारेला घसमुसळा स्पर्श केल्यागत ते वाटतं.. ..अशा स्पर्शानं माझ्या कवितेतील संगीत नाहीस होतं...त्या मागलं काव्य कोलमडून पडतं....त्यातलं शिल्प भंग पावतं.... त्यातील शिळा निर्जीव होऊन पडतात ! .मला हे शिलाखंड पाहवत नाहीत.. मला वाटतं. .एकाद्या स्नेहार्द्र, कल्पक मनालाच माझ्या भावनेच्या या.... विविधरंगी छटा समजू शकतील !

....अन् नितीनची भेट होईतो, मला तरी कुठे समजल्या होत्या, या साऱ्या छटा ? चाळीस वर्षं माझ्या मनाची ओळख कुठे पटली होती मला ? जेव्हां पटली, तेव्हां इतकी वर्षं मनाभोवती उभारून ठेवलेल्या भिंती कोसळून पडल्या.. .जुनी परंपरागत विचारांची तटबंदी भग्न पावली. अन्...नागडं सत्य समोर येऊन उभं राहिलं.. .ते उभं राहिलं...तेव्हां मी हादरले... घाबरले ! अन् निर्दय प्रश्नांची मालिका माझ्या मनात थैमान घालू लागली... बावीस वर्षं विसू बरोबर मी संसार उभा केला....आमची पोरंबाळं वाढवली....त्यांना संसाराच्या मार्गाला लावलं....थोरल्या बबनचं या वर्षांत लग्न व्हायचंय.. .दहाजणी सारखी संसारात रमले....सुखावले...हे सारं

अनुक्रमणिका

काय खोटं होतं ? माझ्या सुप्त मनात खरंच, कांही अतृप्त भावना दडून पडल्या होत्या, की संधी सांपडताच त्या वर आल्या ? मग विसू बद्दल जे वाटत होतं......ते काय खोटं होतं ?....अन् आज वयाच्या चाळीशीनंतर जे इतकं तीव्रतेनं वाटलं, ते तरी खरं होतं का ?

किती दिवस, किती रात्री, ह्या प्रश्नांची उत्तरं देण्यात मी घालवलीय ? अन् मी एकटीनंच कशाला ? विसू नि नितीननंहि या गोष्टीचा कमी का विचार केला ? तो केला.....समंजसपणे, डोळसपणे, वस्तुनिष्ठपणे, म्हणूनच ना अखेरीस तिघेहि एकाच निर्णयावर आलो ? तो निर्णय चूक असेल म्हणा हवं तर !...पण प्राप्त स्थितीत तिघांनाहि तोच घ्यावासा वाटला ना ?

.गेले सहा महिने गावात आमच्याबद्दल नाही नाही ती चर्चा होत आहे.....ऐकून मन व्यथित होतं.....पण नवी मळवाट चालून जातांना माणूस ठेंचाळायचाच......पावलं रक्त बंबाळ व्हायची, ते ठाऊक आहे मला.

म्हणूनच पुन्हा म्हणते,...उदार मनाच्या, कल्पक, डोळस माणसालाच माझी व्यथा कळेल...मानवी मनाच्या गूढ मनोव्यापारांची ज्याला कल्पना आहे, त्यालाच आमची गोष्ट समजेल. त्यांनाच मी केलं ते भयंकर वाटणार नाही....समाजाचा, रूढींचा, प्रतिष्ठेचा...मी अपराध केला असं वाटणार नाही......नितीनला ते दोषी ठरवणार नाहीत, विसूची कींव करणार नाहीत....

विसूला अशी दुसऱ्याची कीव नको आहे. स्वाभिमानी माणसाला कीव सहन होत नाही....विसू स्वाभिमानी आहे....व्यावहारिक, सामान्य असला तरी स्वतःच्या मनाची जखम उघडी करणार नाही कुणा जवळ !

होय, ही जखम विसूला मी केलीय ठाऊक आहे मला...पण त्याला ठाऊक आहे की ही जखम मी त्याला दुखविण्याच्या बुद्धीनं केली नाही... मी अगतिक होते.. .समूळ हादरून निघाले होते....त्याला माझी व्यथा दिसत होती !.......एकत्र राहण्याची व्यर्थता जाणवली होती...... म्हणून त्यानं घटस्फोट देण्याची तयारी दर्शविली....तीहि आपणहूनच....!

बावीस वर्षांच्या सुखी संसारानंतर घटस्फोट ! अन् तोहि माझी चाळिशी उलटल्यावर ? आयुष्याच्या अपराण्ह काळी ? पुष्कळदा माझा स्वतःवर विश्वास बसत नाही. गेल्या बावीस वर्षातली मी... .अन् सहा महिन्यातली मी !.....ह्या दोघी एकच होत्या का ? आपण पुनर्जन्म हा एकच प्रकारचा मानला आहे. तो माणसाला मेल्यावर प्राप्त होतो....म्हणतात...परंतु मला वाटतं...माणूस एकाच जन्मात...किती तरी पुनर्जन्म घेतो ! कालाच्या

प्रवाहात माणसाच्या जीवनात कितीतरी घडामोडी होतात ! ....बालपण, तारुण्य, वृद्धापकाळ....जीवनाच्या ह्या विविध खंडात माणसाचा एकच देह वावरतो खरा...पण ते व्यक्तित्व एकच असतं का ? कितीदा तरी कांही घटना त्याच्यात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणतात ? कितीदा तरी त्याच्या जीवनाचा संपूर्ण तळ उध्वस्त होतो ? अन् त्यातून जगते, ती एक नवीन व्यक्ति बनते. मला वाटतं......तसाच पुनर्जन्म माझा झालाय. बावीस वर्षापूर्वी विसूशी लग्न करून दहाजणीसारखी समाधानाने त्याच्याशी संसार करणारी लीना नाहीशी झालीय....तिचा मागमूसहि आता माझ्यात राहिला नाही....नितीनशी भेट झाल्यापासून एका वेगळ्या जगात मी जन्मलेय...!

...बाहेर अंधारून आलंय....सोसाट्याचा वारा सुटलाय....बंगली समोरची नाजूक उंच, सुरूची झाडं जोरानं पिंगा घालीत आहेत.....पली-कडच्या खोलीतून पियानोचे स्वर कानावर पडत आहेत. ते स्वर माझ्या मनाला स्पर्श करून जाताहेत...अन् जुन्या स्मृतींची वलयं माझ्या मनात निर्माण होतात.

× × × ×

असंच काहीसं संगीत त्या दिवशी कलाप्रदर्शनात चालू होतं..

आमचं गांव ते केवढं ? केवळ वीस बावीस हजार वस्तीचं ! शांत, संथ जीवन ! उंच उंच वृक्ष, मध्ये सुंदर जलाशय, त्याभोवती सारं शहर वसलेलं...एका काठावर मिशन व तिची शाळा, अन् चर्च; दुसऱ्या बाजूला क्लब, लायब्ररी, इतर आफिसर्सची घरं !...ह्या चिमुकल्या गांवी भरलेलं हे पहिलं प्रदर्शन...केवढी नवलाई ? मी तर ती चित्रं पाहून भारावले... त्या चित्रातून कदाचित् कसलेल्या कलाकाराचं कसब नसेल....परंतु रंग-संगतीचं विलक्षण सौंदर्य होतं....साध्या आकृतिबंधातून वेगळाच जिवंतपणा ...होता...रेषांमधून चैतन्य खळखळल्यासारखं मला वाटलं....हे सारं कांही आगळंच होत....मला या जिवंतपणानं आकृष्ट केलं. पण मला खरी चित्रकला कुठे ठाऊक होती ?...चित्रकला व चित्रकार यांच्या संबंधी नुसती पुस्तकं वाचली होती. लिओवार्डीचं प्रभावी व्यक्तित्व, गोयाची क्रांतिकारी कला, व्हॅन गाऊची भावनोत्कटता व कलेसाठी केलेलं आत्मसमर्पण, गोगांची एक आगळीच कलासाधना...या गोष्टी मी फक्त वाचल्या होत्या. कला-कृतींची चित्रं पाहिली होती. टर्नरची निसर्ग दृश्ये मला वेड लावीत, रेनॉरची माणसं मला बोलकी वाटत....चित्रकलेच्या काल्पनिक विश्वात मी पावले होते...कधी काळी चित्रं रंगविण्याचं स्वप्न होतं...पण ह्या कला प्रदर्शनातल्या

चित्रातून ते विश्व साक्षात् माझ्या समोर उभं होतं. विविध रंग आणि आकृति यांच्यात एवढं प्रभावी सामर्थ्य असतं यांची जाणीव मला त्या दिवशी झाली. प्रदर्शनातल्या एका चित्रासमोर मी वारंवार येऊन उभी राहत होते. अगदी साधंच चित्र ! सूर्यास्ताचा देखावा. समोर सोनेरी, नारिंगी समुद्र पलीकडे दूरवर किनारा.....त्याच्या आसऱ्यानं जायला निघालेलं एक जहाज..... चित्रातलं सौंदर्य डोळ्यात साठविण्याचा मी प्रयत्न करीत होते, तेवढ्यात मागून हळूच कुणाचे तरी इंग्रजी शब्द ऐकू आले,

"आवडलेलं दिसतंय हे चित्र तुम्हांला ?"

मी चमकून मागे वळून पाहिलं.....एक गोरापान चेहऱ्याचा, गोटी असलेल्या, काळ्याभोर डोळ्यांचा गृहस्थ माझ्या पाठीशी उभा होता...... मी भांबावून म्हटलं "अं ऽऽ ! हो ऽऽ !"

"माफ करा हं ? ओळख नसताना बोललो मी !"

"कांही हरकत नाही"...मी चटकन् बोलून गेले.

"तसं नाही...पण या देशातल्या स्त्रिया फार लाजाळू असतात. ओळखी शिवाय पुरुषांनी त्यांच्याशी आपणहून बोलायचं नसतं, होय ना ?"

"अगदी तसंच कांही नाही, म्हणा"

"हे चित्र आवडलं तुम्हांला ?"

"हो.....फार !"

"कां बरं ?"

"अं ऽऽ ?" त्याचा प्रश्न चालवीत मी म्हणाले "इतक्यातच सांगता यायचं नाही मला ! पण आवडलं हे खरं !"...किंचित् थांबन मी विचारलं,

"तुम्हांलाहि चित्रकलेची आवड आहे, होय ना ?"

तो नुसता हंसला...मी गोंधळून विचारलं

"कां विचारण्यात चूक झाली माझी ?"

"फार नाही !"....फक्त थोडीशी !"

"म्हणजे ?"

"मला चित्रांची आवडच नव्हे तर ते माझं जीवन आहे !"

"म्हणजे....?....तुम्ही ?

"हो ! .ही माझी चित्रं आहेत..."

"खरंच ? ..माफ करा हं ? खरं म्हणजे मला तुम्हांला ओळखायला हवं होतं..."

"कसं ओळखणार ? चित्रकाराच्या कपाळावर शिक्का नसतो !"

असं म्हणून तो मोकळेपणी हंसला. माझाहि संकोच दूर झाला. चित्रात खालच्या कोपऱ्यातली अक्षरे वाचण्याचा प्रयत्न करीत मी म्हणाले : "ली रॉय नितिन...(Lee Roy Nitin")

"हो ! माझं नांव नितिन लीलाधर रॉय."

"म्हणजे बंगाली ?"

"हो !"

"पण तुम्ही भारतीय दिसत नाही.."

"हो...युरोपियन दिसतो...अर्धं सत्य आहे ते"

"म्हणजे ?"

"माझी आई यूरोपियन, पिता बंगाली.

"भारतात प्रथमच आलात...?"

"अं...तसा जन्मलो मी इथंच....पण मग वडील वारले. अन् आई स्वीडनला निघून गेली....तीन वर्षांचा असताना भारत सोडलं मी ! अन् तेव्हांपासून ही तेहतीस वर्षं मी तिथंच होतो..."

"मग आताच कसे काय आलात ?"

"आई वारली....ती चित्रं काढीत असे. तिनंच मला ही कला शिकविली ....तिनं दिलेली कला घेऊन पित्याच्या मायभूमीला यावंसं वाटलं मला.... वास्तविक, अजून मला ही मायभूमि वाटत नाही.... "

"आमच्या या चिमुकल्या गांवी कसे काय आलात ?"

"कलकत्याला प्रदर्शन भरवणार आहे मी. .मिशनच्या स्मिथ साहेबांची व वडिलांची दाट मैत्री...म्हणून वाटेत इथं उतरलो. .त्यांना चित्रं आवडली म्हणून त्यांनी ह्या प्रदर्शनाचा आग्रह केला. "

"अन् म्हणून एका मोठ्या चित्रकाराच्या चित्रसृष्टीचा परिचय तरी झाला...!"

तो नुसतं मोकळेपणी हंसला.

मी जायला निघाले तेव्हां त्यानं हळूच विचारलं आपलं नांव मात्र सांगायचं विसरलात तुम्ही"

"लीना...लीना दीक्षित.."

नेमका तेवढ्यात विसू आला...त्याच्याकडे पाहून हसत त्यानं विचारलं 'म्हणजे दीक्षित मास्तरांच्या कुणी"

"माझी पत्नी !"

"आपल्या पत्नीला चित्रकलेची आवड आहे, हे कधी बोलला नाहीत तुम्ही.....नुसती माझीच चित्रं मांडीत राहिलात ? "

"पण मला तरी कुठं ते माहित होतं ? ...."तिचं पुस्तकांचं वेड तेवढं ठाऊक आहे मला !"

"या छोटया गांवात निदान एक तरी रसिक भेटला म्हणायचा..." त्यानं निरोप घेतला....पार्श्व भूमीत तेच संगीत चालू होतं...हीच नितिनची पहिली भेट,...

माझं मन भारावलं होतं....गेल्या सहा महिन्यात कितीदा तरी मी या प्रसंगाची उजळणी केली असेल ? मला वाटतं, तोच माझ्या जीवनातला परिवर्तन बिंदु !....त्यानंतर झालेली प्रत्येक भेट माझ्या स्मरणात आहे. त्यातील संवाद मनावर कोरलेले आहेत.....

× × × ×

पुन्हा नितिन भेटला तो त्यादिवशी क्लब मध्ये ! मला एकटी पाहून तो म्हणाला :

"तुम्हांला माझं ते चित्र का आवडलं, तुम्ही सांगितलं नाहीत ते अजून ?"

"....अं...खरं म्हणजे मलाहि नीट उमगलं नाही ते"...पण... मला वाटतं..."

"सांगा ना ?"

"तुमच्या चित्रातला तो सूर्यास्त, ते एकाकी वाटचाल करणारं, दर्यात सांपडलेलं जहाज......ही सारी उतरणीला लागलेल्या जीवनाचं प्रतीक वाटली...मला..."

"हो...पण चित्रात दूर...अगदी अस्पष्ट का होईना, पण...किनारा कल्पिला आहे मी"

"तुमच्या चित्राकडे पाहून मला कोण जाणे कां एक ओळ सुचली !"

"कोणती ?"

"एकटीच पांथ मी ! I am a lone traveller !"

"अरे वा ऽ ! ही तर कवितेची ओळ दिसतेय !"

"हो" मी संकोचून म्हणाले—

"म्हणजे, तुम्ही कविता करता ?"

"अं...अशाच कधी कधी !—पण कुणाला दाखवीत नाही. .स्वतःच्या करमणुकीसाठी लिहिते..."

"मिस्टर दीक्षितांना तरी वाचून दाखवता की नाही ?"

"दीक्षित आणि कविता ? म्हणजे झालंच...दोन ध्रुवांना जवळ आणल्यासारखं आहे ते ! अहो, सायन्स अन् गणित विषय आहेत त्यांचे !"

अन् ते बोलणं तेवढ्यावरच राहिलं....

× × × ×

त्यादिवशी स्मिथसाहेबांकडे पार्टी होती. त्यांच्या बंगलीसमोरच्या लहानशा बागेत टेबलं मांडली होती. आजूबाजू डोलणारी फुलझाडं, ‹रंगीबेरंगी फुलांचे ताटवे, कोपऱ्यांना उंच, ताठ सुरूची झाडं, त्यांच्या मिश्रित सुवासांनी वातावरण धुंद झालं होतं. पार्टी संपून मंडळी गप्पात रंगली होती. स्मिथ साहेबांचा धाकटा मुलगा माऊथऑर्गन वर एक गाणं वाजवीत होता....अन् नितीन त्याचा ताल धरून मध्येच गाण्याची एकादी ओळ गात होता....एका सुरूच्या झाडाशी उभी राहून मी ते पहात होते...संध्याकाळ संपून चंद्र वर येत होता....एका कवितेच्या ओळी माझ्या मनात आकार घेत होत्या..... गुणगुणत होत्या. तेवढ्यात नितीन जवळ येऊन उभा राहिला...म्हणाला :

"किती गंभीर अन् अबोल असता तुम्ही ?"

"गंभीर ?" मी एकदम हंसून म्हणाले. "अहो, आता एकाद्या अल्लड तरुणीप्रमाणे का मी हंसायचं ?"

"पण आता हसताहात त्या मात्र एकाद्या पोरीसारख्या.–."

मी लाजेनं गप्प राहिले...ह्या परदेशी मोकळेपणाला काय म्हणावं ?

"मिसेस दीक्षित, एक सांगू ?"

"सांगा..."

"तुमचं हे हास्य....फार आकर्षक आहे. मनाचा वेध घेणारं वाटतं मला...."

"भारतात स्त्रीला परपुरुषाकडून असले compliments ऐकायची संवय नसते..."

"माफ करा मला...मला इथल्या पद्धति माहीत नाहीत...पण वाटलं ते मोकळेपणी बोललो मी !...खरंच तुमचं हे हास्य आठवलं, तुमची ही शांत गंभीर मूर्ति आठवली, की बेचैन होतो मी कधी कधी......मला समजत नाही....."

मला काय होत होतं ? माझं मलाच कळत नव्हतं....तीच अनामिक ओढ....तीच अस्वस्थता...पहिल्यांदा मला त्यातील साऱ्या छटा उमगल्या नाहीत....जेव्हां उमगल्या तेव्हां मी घाबरले, हादरले. नितीनशी भेटणं बंद केलं....स्वतःच्या मनाचे पापुद्रे उकलून पुन्हा पुन्हा निदर्य विश्लेषण करीत होते. इतकी वर्षं खरोखरच माझ्या व्यक्तित्वाचा एक कोपरा रिकामा राहिला होता ? अतृप्त होता ? त्यालाच का मी वाचनाने, कथा कादंबऱ्यातील

काल्पनिक प्रसंगांनी तृप्त करीत होते ? नितीनबद्दल मला वाटणारी भावना कोणती होती ? जिच्याबद्दल आपण एवढी वर्णनं वाचत होतो, तीच का ही प्रीति ? अन् ती आली अशावेळी ? इतक्या उशीरा ? आता तारुण्य संपल्या-वर ?.....एक चाळिशी उलटलेली, विशिष्ट चाकोरीनं जाणारी, जगाच्या एका कोपऱ्यात जीवन संपविणारी एक अज्ञात स्त्री मी ! काय करणार मी हिचं ?

मला उत्तर सापडत नव्हती....नितीनच्या वागण्यातहि मला तीच ओढ दिसत होती ! पण हे परस्पर आकर्षण घेऊन कुठे जाणार होतो आम्ही ? माझ्या बावीस वर्षांच्या संसाराचं घरकुल भंग पावणार होतं की काय ? हा माझा संसार ही चूक होती की काय ?

आठवडाभर मी नितीनला भेटले नाही स्वतःला घरात कोंडून ठेवलं. त्यादिवशी एकांत हवा म्हणून फिरायला निघाले......जलाशयाच्या वाटेनं पावलं मला नेत होती. केव्हां काठाशी येऊन बसले ते मला समजले नाही.... भानावर आले ती नितीनच्या हांकेनं.

"लीना"

प्रथमच त्यानं मारलेली ती एकेरी हांक. मी दचकले.

"गेल्या आठवडाभर भेटली नाहीस तूं"

"हो..."

"भ्याली आहेस ना ?"

मी उत्तर दिलं नाही—...माझ्या डोळयांच्या कडा ओल्या झाल्या.

"आपल्या मनाला कोंडून ठेवल्यामुळं कुठलाहि प्रश्न सुटत नाही, लीना !"

"मग काय करायचं ?"

"त्याला मोकळं करायचं....सत्याला धीरानं तोंड द्यायचं.

"म्हणजे काय करायचं ?"

"जे अशा वेळी नेहमी करायचं असतं ते...मग एकाएकी गंभीर होऊन ...शून्यात नजर टाकीत तो म्हणाला

"लीना, तुला वाटतं...ही नुसती थिल्लर भावना आहे ?...खरं सांगू, मी पसतीस वर्षांच्या आयुष्यात युरोपातली अनेक ठिकाणं पाहिली, खूप भटकलो. अनेक पोरींबरोबर मजा केली....पण ते सर्व चैतन्यहीन वाटतंय आज मला...तुझ्या गंभीर, अबोल व्यक्तित्वासारखा माझ्या काळ-जाचा ठाव आजवर कुणी घेतला नव्हता...? खरंच लीना, प्रीति हे देवाघरचं देणं आहे ! ते साऱ्यांना लाभत नाही !"

अनुक्रमणिका

"पण मला ते देणं नकोय....मला पेलणार नाही ते! माझ्या ह्या बावीस वर्षाच्या जुन्या भिंतीची कोंडीच मला परवडेल...ती फोडली तर समुद्रात गटांगळ्या खाणंच नशिबी उरेल माझ्या!" मी ओरडून म्हणाले.

"माझं चित्र आठवतं ना? त्यात अस्पष्ट कां होईना, दूरवर किनारा कल्पिला आहे मी?"

"दूरवरच्या त्या किनाऱ्याच्या आशेवर आजवर माझं रक्षण करणाऱ्या ह्या भिंती मी स्वतःच्या हातानं फोडून देऊ, म्हणतोस?"

"ह्या भिंती रक्षण करणाऱ्या वाटत असतील लीना! ..अन् म्हणूनच कदाचित् सामान्य माणसं आपलं मन मारून कोंडीत पडून राहतात!... पण लीना प्रीति ही जगात सर्वश्रेष्ठ गोष्ट मी मानतो. मी तिच्यासाठी वाटेल ते करीन.'

नितीनच्या या वाक्याने मला एकदम वेगळ्या दिशेनं विचार करायला लावलं...असा विचार मी आजवर केला नव्हता. कुटुंब, समाज, कीर्ति-अपकीर्ति, इतरेजनांच्या भावना, इष्टानिष्टता, इत्यादि गोष्टींच्या वर्तुळात आजवर माझं मन भ्रमण करीत होतं...ह्या साऱ्यापेक्षा वेगळी, स्वतंत्र मूल्य असलेली एकादी गोष्ट असूं शकते...स्थलकाळातीत अशी. .हें मला पटलं... अन् माझ्या मनातला संघर्ष दूर झाला....अखेर मी निर्णय घेतला की विसूला सारं सांगून टाकायचं! ..तो घेताना एकेक पाऊल मी किती फुंकून टाकलं... माझ्या मनाला त्याच्या किती यातना झाल्या ते माझं मलाच ठाऊक! पण ह्यानंतर विसूबरोबर संसार करणं म्हणजे प्रतारणा करण्यासारखं वाटलं मला!

त्यादिवशी बाहेर पाऊस टिपटिपत होता...रात्र अंधारी होती. आपल्या खोलीत टेबलावरील दिव्याच्या अर्धवट प्रकाशात विसू वाचीत बसला होता. त्याच्या चहेऱ्याकडे पाहून माझ्या डोळ्यात अश्रु दाटले. .पावलं अड-खळली.. .सारा निश्चय गळून पडला. .वाटलं, आल्या पावली परत फिरावं. पण लगेच मनात विचार आला...विसूबद्दल वाटणारी ही कीव आहे...इतक्या वर्षाच्या सहवासामुळे वाटणारी आपुलकी आहे. ..पण ते प्रेम नाही...मग हळूच नितीनचे शब्द आठवले...मनाचा कोंडमारा आठवला...अन् मी निश्चयाने पुढे गेले. म्हटलं

"विसू, मला कांही सांगायचंय तुला! पण कसं सांगावं तेच कळत नाही..."

"मग नको सांगूस. .मला कळतंय ते सारं"

"काय कळतंय?"

अनुक्रमणिका

"तुझ्या मनातलं..."

"पण कसं शक्य आहे ?"

"अगदी पहिल्या दिवसापासून कळलंय मला. .आज का तुझी माझी ओळख झाली..." "विसू ऽऽ!"

"लीना, तुझ्यापेक्षा मलाच तुझं मन अधिक ओळखता येतयं...अगदी सुरवातीपासून तुमच्या दोघांच्या मनाची आवर्तनं मी पाहतोय...अन् मीहि रोज विचार करतोय...!"

"कसला...?"

"तुझी सुटका कशी करायची ?"

"विसू ! मी तुझा फार मोठा अपराध केलाय...पण काय करु मी ? समजत नाही मला..." मी कसं बसं म्हटलं.. माझा गळा दाटून आला... विसूनं उत्तर दिलं नाही...

"विसू, माझ्यावर फार रागावला असशील ?"

"...रागावलो..सुरवातीला रागावलो ! चिडलो..मग खूपच विचार केला. शेवटी वाटलं..कुणावद्दल प्रेम वाटणं, न वाटणं, हे काय आपल्या हातात असतं थोडंच ?"

"तुला मी चार सामान्य, थिल्लर तरुणी सारखी वाटले असेन..."

किंचित् थांवून विसू म्हणाला.." नाही तू तशी नाहीस..म्हणूनच... मी एवढा विचार केला ह्या गोष्टीचा ! अन् एक वेगळाच विचार माझ्या मनात आला.."

"कोणता..?"

"असं वाटलं की तुझ्या मनात दुसऱ्या माणसाच्या वद्दल भाव निर्माण झाल्यावर आता माझा तुझ्यावर कांहीच..अधिकार राहिला नाही !"

"विसू ऽऽ!" माझ्या मनाचे वांध फुटले...त्याची अनपेक्षित वृत्ती पाहून मी भारावले. मी त्याला सारं सांगून टाकलं...

पुढच्या घटना साऱ्या गावाला ठाऊक आहेत....घटस्फोटाची कल्पना विसूचीच होती...मी विसूला सोडलं...अन्...

एकाद्यावेळी मन विचलित होतं...जुन्या आठवणी मनात उभ्या राहतांत...वाटतं, "मी केलं हे चूक की वरोवर ?" अन् पुन्हा साऱ्या घटनांचा चित्रपट माझ्यापुढे सरकतो.....अन् मी स्वतःला विचारते : मी असं का केलं ? कसल्या सुखासाठी का ?..नितीनच्या कीर्तीला भाळून ? की संसाराच्या चाकोरीचा कंटाळा आला म्हणून ?"

अन् ह्या साऱ्या प्रश्नांना बाजूला सारून एक उत्तर पुढे येऊन उभं ठाकतं "नाही ! या कशासाठीहि नाही ! ज्या दिव्य प्रीतीची महती जगानं गायिली.....तिचा अनुभव घेण्यासाठी ! ती उशीरा जीवितात आली..... तरीहि....ती एक गोष्ट माझ्यासाठी अंतिम आहेसं मला वाटतं....!"

('नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने')

आजची लघुकथा (पृष्ठ ६८ वरून)

प्रा. मोहरीर–कसले विरोध ?

प्रा. कुलकर्णी–असं पहा, कालच्या कथेवर ती पाल्हाळिक आहे असा आरोप केला जात असे. आजच्या कित्येक कथा प्रदीर्घ झाल्या आहेत आणि त्यात अनावश्यक तपशील किंवा अतिरेकी मनोविश्लेषण यांचा पाल्हाळच अधिक. जी. ए. कुलकर्णी यांची 'माणूस नांवाचा बेटा' किंवा 'गिधाडें' या कथा पहा. कालच्या किंवा त्याहिपेक्षा परवाच्या कथेवर बाळबोधपणाचा शिक्का मारला जात असे. आजची कांही कथा दुर्बोध असली तरी पुष्कळशी कथा इतका बारीक सारीक तपशील पुरविते की तिथे वाचकांच्या कल्पना शक्तीचे किंवा अनुमानाचे कामच राहत नाही. हा बाळबोधपणाच नव्हे काय ? तसेच आपटे यांच्या कथा किंवा आरंभी आरंभीच्या फडके–खांडेकरांच्या कथांची भाषा अलंकारिक असे. ती कृत्रिम म्हणून पुढे टाकाऊ ठरली. पण आज गंगाधर गाडगिळांच्या व इतरांच्याहि कित्येक कथातून भरपूर अलंकारिक भाषा दिसेल. प्रतिमा किंवा उपमाने मात्र नवी आहेत.

प्रा. मोहरीर–हे विरोध तर तुम्ही चांगले सांगितले. अशा कित्येक बाबींचा कथाकारांनी अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे.

प्रा. कुलकर्णी–तसा त्यांनी केला तर कालच्या कथेविषयी ते अधिक कृतज्ञ राहतील आणि आजच्या कथेविषयी वृथाभिमान ते टाकून देतील. आणि यातच मला वाटते आजच्या व उद्याच्याहि कथेचे कल्याण आहे. बरंय तर आपला वेळ संपला. नमस्कार.

प्रा. मोहरीर–नमस्कार.

(नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने)

अनुक्रमणिका

नृत्य–नाट्य–संगीतिका--

कंवर पट्टा

लेखक--शंकरराव कुळकर्णी

(अेका शेतकऱ्याचे घर. मोठ्या आनंदान नाचत वागडत किसान वाहेरून येतो. हातात पैशाची पिशवी. पिशवीतील पैशाचा छन् छन् आवाज होतो. कसला आवाज आहे हे पाहण्याकरिता त्याची कारभारीण आतून वाहेर येते—)

कारभारीण—(किसानाला पाहून) छन् छन् काय वाजतंय सांगा मजला धनी ।

किसान-- (पिशवी लपवीत) वळखुनि मजला तूच सांग ते, सखये ग साजणी।

कारभारिण--सवाल अुलटा मलाच करता, काय म्हाणावे धनी !

किसान-- मनकवडी तू हूशार असती, म्हणूनि गे साजणी ।।

कारभारिण--औंदा राया, पिकला वहू आपल्या घरी हरभरा ।

किसान-- आहे शंभर टक्के, सजणी, बोल तुझा, ग, खरा ।।

कारभारिण--म्हणून का हो, चढविता झाडावर त्या मला ।

किसान-- गंमत नाही तव वुद्धीचा गर्व खरा, गे, मला ।।

कारभारिण--जवाव तर मग मीच तुम्हाला देते हो घरधनी !।
चाळ तुम्ही हो पायि वांधला, वछड्याच्या, अंगणी ।।

किसान— छन् छन् वाजत अिथे, सखे, मग चाळ कसा अंगणी ? ।

कारभारिण—अघटित घटना काय असे ही सांगा मजला झणी ।।

किसान-- (पिशवी पुढे करून वाजवीत) चाळ नसे हा, छन् छन्, सजणी, दौलत नाद करी ।

कारभारिण--उगा वनविता, कैसे, राया, धन हो येअि घरी !।।

किसान-- पीक निघाले औंदा दुप्पट, सखये, शेतावरी ।

कारभारिण--वान, कपाशी, गहू, हरभरा, मिरची ज्वार तुरी ।।

किसान-- मेहनत, सखये, तुझी नि माझी फळली शुभ या दिनी ।
घाम गाळता दाम मिळाले, दुप्पट, गे, साजणी ।।

कारभारिण--अंगावरती नाही माझ्या अेकहि फुटका मणी ।
सरी-पाटली-कंवर पट्टा द्याहो मज आणुनी ।।
किसान-- सोने-नाणे धन चोराचे, हाव धरी ना मनी ।
कारभारिण--पुरविलि, का हो, आजवरि सांगा, हौस मनीची धनी !।।
किसान-- दाग-दागिन्या मधला पैका, जाअी कामातुनी ।
कारभारिण--अलंकार परि त्याचा, सखया, घेअी मन मोहुनी ।।
किसान-- किसान सच्चे आम्ही, अमुचा जमीन हो दागिना ।
कारभारिण--कंवरपट्ट्या वाचुन, राया, शोभा मज येअिना ।।
किसान-- हट्ट तुझा हा, कारभारणी, शोभा तुज देअिना ।
कारभारिण--तीन हट्ट जे ख्यात, तयांच्या आड कुणी येअिना ।।
किसान-- सोड नाद तू देतो तूजसी, पट्टा अैसा नवा ।
ज्याते पाहुन म्हणशिल तू, मज, जन्मजन्मी हा हवा ।।
कारभारिण--असा कोणता अमर असे तो, सांगा पट्टा धनी ।
ज्याते पाहुन हुरळिन म्हणता, राया, मी मन्मनी !।।
किसान-- अमर असा जो आहे पट्टा, जमीन घेवु सुपीक ।
धन धान्याचे त्यातुन, सखये, वाही सततचि पीक ।।
कारभारिण--अलंकार मी तुम्हा मागता, अुठते पोट तिडीक ।
जाते मी अजि माहेराला, तुम्हा न घाली भीक ।।
किसान-- भीक मागतो, पदर पसरतो, जाअु नको सोडुनी ।
कारभारिण--आणुन द्या मग कंवरपट्टा, जाअुन, राया, झणी ।।
किसान-- कंवरपट्टा देतो आणुन, मुंवअिला पण जातो घेवुन ।
कारभारिण--जन्मो जन्मी तुम्हालाच, हो, घेअिन पति मागुन ।।
किसान-- धावत जावुनि पळतचि येतो, कंवरपट्टा तुला वांवतो ।
दोघेहि-- पति पत्नीचा स्वर्ग सुखाचा आज खरा वाटतो ।।
(किसान जातो)
कारभारिण--भोळा वाअी सांब किती हा, माझा, हो, घरधनी !।
जीव किती तो माझ्यावरती वसला, ग, लावुनी !।।
खरेच, का हो, गेला राया, परतुनि या, हो, झणी । धनी तुम्ही ।।
(किसान परत येतो)
किसान-- सखे मला तू वोलविले का, हट्ट तुझा सोडुनि !।
कारभारिण--हट्ट नसे तो, केली थट्टा, तुम्हास मी छेडुनी ।

(पृष्ठ ८५ वर)

ऐतिहासिक टिपण–

पं. बेनीराम दुबे हा महाराष्ट्रीय होता काय ?....

ले.—दे. गो. लांडगे

ज्याला नागपुरकर भोसल्यांच्या कारकीर्दीचा अभ्यास करावयाचा असेल त्याला पंडित बेनीराम डुबे या व्यक्तीचा परिचय करून घेतल्याशिवाय भागणार नाही. हा गहस्थ वरून दिसावयास भोसल्यांचा नोकर असतो पण आतून तो इंग्रजांचेच हित साधण्यात गर्क दिसतो. त्याची नेमणूक कलकत्याच्या फोर्ट विल्यम येथे ईस्ट इंडिया कंपनीमार्फत राज्यकारभार हाकीत असलेल्या ब्रिटिश सरकारच्या दरबारी सावाजी[1] भोसल्यांनी आपला वकील म्हणून इ. स. १७७३ साली केली होती व तो ते काम आमरण म्हणजे १७९२ पावेतो करीत राहिला.[2] प्रस्तुत प्रसंगी त्याच्या शीलाचे व स्वभावाचे फारसे चित्रण करावयाचे नाही. येथे मुख्यत: एकाच मुद्याचा विचार करावयाचा आहे. एतद्देशीय सत्ताधीश व कलकत्तेकर इंग्रज यांचा परस्पराशी झालेला जो फारशी पत्रव्यवहार आहे त्याचा सारांश ब्रिटिश आमदानीत १९११ पासून खंडश: प्रकाशित करण्यात आला व ते काम अजूनहि चालू आहे. त्या खंडापैकी ७ व्या खंडाच्या पृ. १२ वर एका पत्राखाली पं. बेनीराम संबंधी पहिलीच पाद-टीप आहे. तिचा आरंभ असा आहे. Beniram Pandit, a Mahratta Brahmin residing at Banaras". ती आणखी असेहि म्हणते आहे की त्याने आपल्या सामर्थ्याने व कार्यकुशलतेने मुधोजी[3] व वॉरन हेस्टिंग्स यांच्यात फार सलोख्याचे संबंध घडवून आणले. या नंतर लगेच दुसऱ्या टीपेत विश्वभंर पंडित हा त्याचा भाऊ व सहकारी असल्याचे वर्णन आले आहे. एवढेच नव्हे तर १७८१ मध्ये झालेल्या बनारसच्या बंडाळ्यात तो वॉरन हेस्टिंगसच्या सेवा शुश्रूषेत असल्याचे नमूद आहे. प्रस्तुत मुद्याशी या विधानाचा प्रत्यक्ष संबंध नसला तरी त्यात डुबे बंधूनी कोणती कामगिरी केली याचे थोडेसे दिग्दर्शन झालेले दिसून येईल. सुमारे दोन वर्षापूर्वी पं. बेनीराम हा महाराष्ट्र ब्राह्मण नसल्याचे नॅशनल

---

१ आद्य रघूजी भोसल्याच्या चार पुत्रापैकी एक

२ कॅलेन्डर ऑफ पर्शियन करस्पॉन्डन्स खंड १० पृ. १४२

३ द्वितीय रघूजीचा वडील.

आर्काईव्हजच्या मुख्याधिकाऱ्याचे निदर्शनास मी आणून दिले असता त्यानी माझ्या विधानाबद्दल पुराव्याची मागणी केली. यानंतर १९६० च्या मध्यात मी दिल्ली येथें नॅशनल आर्काईव्जच्या सौजन्याचा लाभ घेत असता प्रस्तुत मुद्यावर जरूर तेवढा मूळ पत्रव्यवहार पाहिला व स्वस्थ बसलो.

माझी कल्पना अशी आहे की, पादटीप देणाऱ्या गृहस्थाची नागपुरकर भोसल्यांच्या इतिहासातील दुसऱ्या एका नावाशी साम्य असल्यामुळे दिशाभूल झाली असावी. इतिहासाच्या वाचकास माहीत आहे की, १८ व्या शतकाच्या मध्यात **भास्करराम पंडित** या नावाचा भोसल्यांचा एक सेनापति होऊन गेला. त्याचा तेव्हांचा बंगालचा नवाब अलीवर्दीखान याने १७४४ साली मनकारा (ओरिसा) येथे विश्वासघाताने निर्घृणपणे खून केला. भास्करराम हे बेनीराम सारखे एक नांव नाही. यात राम हे स्वतंत्र नांव आहे. ते रामाजी या नावाचे संक्षिप्त रूप होय.[४] मराठ्यांच्या अनेक नावात आपल्याला असे संक्षेप दिसतात परंतु बेनीराम हे नांव तशांपैकी नव्हे. येथे 'राम' हे उपपद एकाच विशेष नामाचा अंश आहे. मराठा बखरीत 'बेनीराम' या नावासहि पंत हे उपपद जोडल्याचे दिसून येते आणि म्हणून तो महाराष्ट्रीय असावा असे वाटण्याचा संभव आहे. तसेच दुसऱ्या एका क्षत्रिय सरदाराचे नाव असल्यामुळे व्यवच्छेदक म्हणून 'पंत' हे उपपद बेनीरामच्या नावास बखरकाराने जोडले असावे. पंडित बेनीरामच्या बापाचे नांव विश्वंभर असे होते. विश्वंभराला पांच पुत्र होते. त्यापैकी बेनीराम हा दुसऱ्या क्रमाकांचा पुत्र होय. सर्वात ज्येष्ठ पुत्राचे नांव गोविंदराम असे होते. तिसऱ्याचे देवभद्दर[५], चौथ्याचे रामभद्दर व पांचव्याचे विश्वंभर अशी नावे आहेत. त्यांना इंद्रबहू नावाची एक बहीणहि होती व तिच्या मुलाचे नांव शंभूनाथ असे होते. गोविंदरामच्या पश्चात हरिभद्र नांवाचा त्याचा मुलगा जिवंत होता व त्याला बेनीरामच्या मृत्युनंतर बेनीरामची जहागीर मिळाली होती. वंशावळीत इतर नांवे शिवनाथ, काशीनाथ व बैजनाथ अशी आहेत. यावरून असे दिसून येईल की, या नावांचे मराठ्यांच्या नावांशी फारच थोडे साम्य आहे.

नॅशनल आर्काईव्जमधील संबंधित कागद पत्रांवरून असे दिसून येते की, विश्वंभर पंडिताचा २८ जानेवारी १८१० ला मृत्यु झाल्यावर **पंडित बेनीरामला** १७८३ साली जी वंशपरंपरा जहागीर[६] देण्यात आली होती. तिचे काय करावे या संबंधी कंपनीत चर्चा झाली. विश्वंभर पंडितची विधवा १८३७ मध्ये

---

४ पूर्ण नांव रामाजी नारायण कोल्हटकर. हा भास्कर पंडिताचा वडील होय.

५ खरी नांवे देवभद्र, रामभद्र इ. आहेत.

६ भेरियाबाद, गाझीपुर जि. स. प्रान्त.

अनुक्रमणिका

वारल्यावर कंपनीकडून जहागीर जप्त करण्याचा हुकुम देण्यात आला व त्या ऐवजी वेनीरामच्या दोन नातवाना प्रत्येकी ५ हजार रुपये वार्षिक वेतन द्यावे असे ठरले. वेनीरामाच्या मृत्युनंतर त्याचा सख्खा भाऊ विश्वंभर हा बाजूला राहून त्याचा पुतण्या हरिभद्र यास वारसा प्राप्त झाल्याचे दिसते. हरिभद्राची विधवा विश्वंभराच्या विधवेनंतरहि जिवंत होती. तेव्हां तिने १८४० च्या मार्च मध्यें इंग्लंडातील कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे एक अर्ज गुदरला. त्यापूर्वी कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने जो निर्णय दिला त्यास अनुसरून स्थानिक सरकारने डुवे कुटुंबास कळविले होते. हे हुकुम स्थगित व्हावे म्हणून उपरोक्त विधवेने डायरेक्टर्सकडे अर्ज केला होता. या अर्जासोवत आपला जहागीरीचा कायदेशीर हक्क शावित करण्यासाठी निरनिराळ्या पंडित मंडळीचे शास्त्रार्थ तिने इंग्लंडात पाठविण्यासाठी रवाना केले होते. जाता जाता हे सांगावासे वाटते की तिने आपले नांव कोठेच दर्शविले नाही. तिची 'जौजे हरिभद्र पंडित' अशी सही दिसते.

वरील शास्त्रार्थात शास्त्री मंडळी आपल्या लिखाणाचा प्रारंभ असा करते, "पंचभ्रातरो नागर ब्राम्हणाः सोदर भगिनीत्युक्ताः एव संभूय राजकर्माणि गृहकृत्यानिच कुर्वाणाः अतिष्ठन्" यानंतर ही पंडित मंडळी प्रश्नाच्या कायदेशीर स्वरूपाची चर्चा करते आणि अर्जदाराच्या तर्फेचा निकाल देताना दिसते. पहिल्या अभिप्रायात २२ पंडितांच्या सह्या आहेत. पाठशाळेचे पंडित स्वतःचे या शब्दांत वर्णन करतात, "महामहिमयुत कंपनी संस्थापित संस्कृतपाठशालास्थ पंडिताः" त्यांचेहि वर्णन 'नागरब्राम्हणानां पंचभ्रातृणाम' इत्यादि आहे. यांच्या लिहिण्यात नागर ब्राह्मण हा शब्दप्रयोग दोनदा आला आहे. तिसरे मत ७० नागर ब्राह्मणांचे स्वतःचे आहे. त्यांनी आपल्या मतात रूढीचा पुरस्कार केला आहे. त्या सत्तरात विजेराम, वलभद्र, संतीकराम, अंबोराम, दुर्गाराम इ. नावे आहेत. बहुतेक नांवाच्या मागे अत्यपद 'राम' असे आहे. याच्या नंतर चौथे मत आहे व त्यावर 'श्री काशीराजाज्ञया श्री अंतुजी मिश्रस्य' अशी सही आहे. या सर्व मतात विषयभूत बावतीत ऐकमत्य आहे. या शिवाय नागपूर विद्यापीठाच्या इतिहास विषयास वाहिलेल्या १९४८ च्या वार्षिकात एका स्थानिक प्राध्यापकाने जो वेनीरामच्या समर्थनपर लेख लिहिला आहे त्यातहि प्रस्तुत पंडित नागर ब्राह्मण असल्याचे म्हटले आहे.

येथे कोणी असे विचारील की, पं. वेनीराम हा महाराष्ट्रीय नसून नागर ब्राह्मण होता हे सिद्ध करण्यात विशेष कोणता लाभ झाला? माझ्या मताने पं. वेनीराम व त्याचे इतर भाऊबंद यांच्या सारखी स्वार्थासाठी परक्यांना आपल्या घरात घालणारी मंडळी इतिहासात क्वचितच झाली असेल. मुसलमानी अंमलात घर मुंडी आणि काप, घे डोळे आणि घाल त्यात तापलेली सळई किंवा

घाल विष आणि घे प्राण अशी रीत असे, परंतु परकीयांना तीव्र विरोध करण्याचे एतद्देशीयांचे, विशेषत: मराठ्यांचे प्रयत्न अपेशी करून देशाचा बलि देण्याचा जर कोणी प्रयत्न केला असेल तर तो या विकृत बुद्धीच्या पडित वंधूंनी होय.

महाराष्ट्रातहि देशबुडवे लोक झाले नाहीत असे नाही पण प्रस्तुत डुबे कुटुंबाचा खाक्या कांही औरच आहे. या दृष्टीने असल्या व्यक्तींचा अभ्यास उप-कारक होईल, असे वाटते.

कंबर पट्टा (पृष्ठ ८१ वरून)

किसान—— अर्थ तुझा गे, नाही कळला, सांग, सखे, फोडुनी ।।

कारभारिण——नट्टा–पट्टा अेकच माझा, अेकच माझी हौस ।
वळखुनि सांगा, काय असे हो, मनात माझ्या आस ?।।

किसान—— सवाल अुलटा मलाच करते, काय म्हणू साजणी !।

कारभारिण——मनकवडे, हो, हुशार तुम्ही, म्हणून माझ्या धनी ।।

किसान—— अुलटविली तू बाजू पुरती, माझ्यावर साजणी !।

कारभारिण——विचार अपुले 'दोन' असे कधि होअिल का हो धनी !।।
मनात होते माझ्या, आपण वाढवु अपुली शेती ।

किसान—— कंवरपट्टा हाच मला का, सखये, मागत होती !।।

कारभारिण——पिकता शेती, दिसेल भूवर सुंदर पिवळा पट्टा !।

दोघेहि—— वाटे त्याली, सोन्याचा, ही भूमी कंवरपट्टा !।।

दोघेहि—— शेती आहे लेणे भूचे, जीवन मानवतेचे ।
काम करोनी घाम गाळता, सोने होइल त्याचे ।।
विश्वाचा हो आत्मा आहे, किसान जीवन दाता ।
स्वर्ग सुखाचा निर्मुन दाविल, तो भूवरि आता ।।
मेहनतीत हो भरल्या अगणित कल्याणाच्या खाणी,
छन् छन् वर्षति तीतुन, नाण्यावर हो नाणी ।।

——पडदा——

अनुक्रमणिका

संपादकीय '(पृष्ठ ४ वरून)

'(पृष्ठ ४ वरून)

सोडवावे लागतात. मराठी भाषेच्या हिताचे अनेक प्रश्न आज आहेत. साहित्याच्या निकोप वाढीच्या दृष्टीने व हीन अभिरूचीच्या वाङ्मयाच्या निर्मितीला आळा घालण्याच्या बाबतीत श्री. काकासाहेबांचे प्रभावी व्यक्तित्व व झुंजार नेतृत्व लाभदायक ठरेल अशी आम्हांला दृढ आशा आहे.

आम्ही श्री. काकासाहेबांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो व संमेलनाला सुयश चिंतितो.

'युगवाणी'चा दिवाळी अंक

नियतकालिकांनी दिवाळी निमित्त विशेषांक काढावेत अशी प्रथा आहे व तिच्यात वाईट कांहीच नाही. आपापल्या अभिरुचि प्रमाणे, साधनांप्रमाणे व सामर्थ्याप्रमाणे प्रत्येक नियतकालिक 'दिवाळी' साजरी करीत असते. आम्हीहि आमच्या प्रकृति–प्रवृत्तीनुसार, व साधना–सामर्थ्यानुसार हा अंक 'दिवाळी अंक' म्हणून आमच्या वाचकांच्या हाती देत आहोत. हा अंक अनेकांना छोटा वाटेल. थाटामाटाचा व सजलेला अंक म्हणजेच 'दिवाळी अंक' अशी ज्यांची समजूत आहे त्यांना हा अंक, 'दिवाळी अंक' असे कदाचित् वाटणार नाही. त्यांना आम्ही अेवढेच म्हणू इच्छितो की—

राजहंसाचे चालणें । भूतळिं चालावें कवणें ।
तरि आणिकिं ही कुंटेपणें । चालावें लागे ।
दिवियेचा अंगीं थोरी । तरि ते वहुतां तेजातें करी
वाति आपुलिया परि । आणीकी ना ॥

शिवाय आमच्या या अंकातील साहित्य थोडे असले तरी ते उच्च दर्जाचे व सदभिरूचिसंपन्न आहे असे आम्ही नम्रपणे पण आत्मविश्वासाने म्हणू इच्छितो. आणि रसिक व हितचिंतकां विषयी एवढेच म्हणतो की—

परि (गीता) ईश्वरू भोळाँ । ले व्यासोक्तिकुसुममाला ।
परि माझेया दूर्वादिला । ना न म्हणे ॥

—श्री. मा. कुलकर्णी

ही दिवाळी आमच्या सर्व वाचकांना, वर्गणीदारांना, सभासदांना, जाहिरातदारांना व हितचिंतकांना आनंदाची जावो ।

—संपादक

अक्कल घ्या अक्कल !

—ना. रा. शेंडे

गेल्या वर्षीची गोष्ट. मार्गशीर्ष महिना. शहरातील कांही प्रतिष्ठित कवि कथाकार, कादंबरीकार, नाटककार हुरडा चरायला एका खेडेगावी गेले होते. दिवसभर काही ना काही चघळत राहिले, भटकत राहिले आणि नाही नाही त्या विषयावर दात विचकत वकत राहिले. रात्री नवमीचा देखणा चन्द्र आभाळात तरंगत होता. त्या दिवशी कडक थंडी पडली होती. शरीर कसं गारठून जात होतं. ! एका प्रशस्त अंगणात गावकऱ्यांनी छोटी होळीच म्हणाना पेटविली. तिच्या भवती साहित्यिक गण मोठ्या डौलानं वसले. त्या विद्वानांच्या रांगेत आमचे काही खेडुत बांधवहि बसले होते. गोष्टीवरून गोष्टी निघाल्या. दर्द भऱ्या गोष्टी, आशुकांच्या, माशुकांच्या ! साहित्यिकांच्या त्या मर्यादातिरेकाच्या बोलांनी गावकरी खो खो हसत. हेच ते शहाणे, हेच ते विद्येचे पुजारी, हेच ते शद्वसृष्टीचे परमेश्वर ! गावकरी मनातल्या मनात विचार करीत आणि 'भल्ले वा हे दीड शाहाणे' असे शद्व त्यांच्या ओठावर सरकत व तेथेच विरत. मग एक साहित्यकार एका म्हाताऱ्या खेडुताला डिवचत म्हणाला,

'एखादी लोककथा सांग ना गणवा. मस्त कहाणी सांग, मस्त'

'का राजेहो, आमची बी किवक्या' करता ! खेडयाची अनपढ माणसं आम्ही ; आन् कहाणी सांगा म्हणता... गणवानं आयुष्यात उरलेले दोनच सुळके दात ओठावर घासून सुटलेला फेटा सावरीत म्हटलं.

'काही म्हण गणवा, पण आम्ही कहाणी ऐकणार' एक नाटककार वटु ठसक्यात म्हणाला तर एका वारक्या कवीनं चिचुंद्रीच्या स्वरात, 'अरे मार भरारी गणवा, छेड दिलरुबा' म्हणत आपल्या किडलेल्या दातांचं दर्शन घडविलं.

गणवानं उगीचंच खेंकरल्या सारख केलं. चिलमीत तंबाखु कोंवला बोटांनीच एक निखारा चिलमीवर ठेवला आणि कसून दोनचार दम मारून, धुराचा मोठा भपकारा सहित्यकारांच्या माथ्यावर सोडला. नंतर काहीसा खोलून तो एक लोककथा सांगू लागला...

"राजेहो, एक व्हती नंगरी. सोन्याची नंगरी. हिऱ्यामाणकांच्या कमानी. चांदीची फरशी. पाचूंची झल्लारी. काय इचारू नोका राजेहो, पऱ्यांची नंगरीं, अप्सरांची बाग. चांदतारे ललचावत. सूर्ऱ्या म्हणे, का करू ना का नाई. झुरूमुरू

अनुक्रमणिका

लागे. अप्सरांचं रूप, डोळे भरून शान पाहावं त् ज्योतच इझून जाय. वोल त् वी का ग्वोड कानातून गंगा वहात जाय. चाल त् वी का मस्तानी, पाय दगडा-वानी उभा राहय. पाह्यतच रहावचं आन् वाऱ्यासंग उडत जावाचं !

अप्सरा व्हत्या जवान. जवानीत व्हती पिरत् आन् पिरतीत व्हतं तिरथ न् तिरथात व्हतं. . . आता का सांगावं राजेहो.

अप्सरात व्हती येक अप्सरा. अप्सरांचा व्हता दरवार. दरवारात व्हती एकच वुढी. वुढी व्हती गुणी. एकदा राणी अप्सरा म्हणाली, 'वुढी माय, वुढी माय. मर्दाच्या नंगरी जाय. राजाच्या लेकाची अक्कल इकत आण'.

मर्दाची व्हती एक नंगरी. तेथी नोहती सुंदरी. . .अकलेची खात होती गिरकी. दिलाची झाली व्हती फिरकी. का सांगु, जवान जवानं मरद् त्याहीले अकलेची गरज !

अप्सरांची वुढीमाय मर्दाच्या नंगरी गेली. हातात व्हती काठी. डोक्यावर व्हती पाटी. वुढी गली–गलीत फिरे आन् ललकारी मारे,

'अकल घ्या अकल'
पाव पाव घ्या, शेर शेर घ्या
मण मण घ्या
'अकल घ्या अकल'

दहा हात शेंडी, वीस हात मिशी, तीस हात दाढी

'अकल घ्या अकल'

सोनार दादानं इचारलं, 'वुढी माय वूढी माय, अर्ध्या पासरी आकलेचं का दाम घेशीन'

'तू का देशीन रे दादा'
'एक ईट सोन्याची'
'हट माय् लेका, तुही का अवखात'

जवाहर नानानं इचारलं, 'वुढी माय वुढी माय, पासरीभर अकलेचं का दाम घेशीन'

'तू का देशीन रे नाना'
"चार माणिकमोत्यांचा जोळ"
"हट माय लेका, तुही का अवखात"

परधान बाबानं इचारलं, "वुढी माय वुढी माय शेरभर अकलेचं का घेशीन"

"तू का देशीन रे बाबा"

अनुक्रमणिका

"सोन्या चांदीचा–माणिकमोत्याचा रंगमहाल"
"हट माय लेका, तुही का अवखात"

नगरभर खवर पसरली. या कानावरनं त्या कानावर खवर जात जात ती गेली राजाच्या लेकाच्या कानावर. तो पडला लई इचारात. अशी कशी वा अक्कल हाय भारी ? दरवार भरला. बुढीला वलावल. वुढी ललकारी देत दरवारात आली–

"अकल घ्या अकल"
पाव पाव घ्या शेर शेर घ्या
मण मण घ्या
"अकल घ्या अकल"

दहा हात शेंडी, वीस हात मिशी, तीस हात दाढी
"अकल घ्या अकल"

दरवारचे वडे वडे सरदार. अचरज करू लागले. अशी कशी अक्कल ! दहा हात शेंडी, वीस हात मिशी, तीस हात दाढी, अशी कशी अक्कल ! अक्कल का शक्कल, शक्कल का अक्कल काई समजेच ना, राजेहो, काई समजेच ना !

राजाचा लेक सिंहासनावरनं ताडकन् उठला. खाडकन् वोलला,

"सांग वुढे सांग, अकलेचा दाम सांग"
"अरे जवान राजाच्या लेका, तू का देशील"
"मागशील ते देईन. पण वुढे अकल पाहून घेईन"

वुढी खो खो हासली. डोस्क्यावरची टोपली हातावर धरली. राजाच्या लेकापुढं ठेवली.

"वूढे टोपलीत का हाय"
"राजाच्या लेका, अकल हाय अकल"
"दाखव वुढे दाखव" राजाचा लेक लपकून बोलला.
"अगुदर वचन दे वचन"
"देल्लं वुढे वचन. मागशील ते देईन."
"इचार कर राजाच्या लेका. सौदा हाय लई महाग"
"वुढे मी राजाचा लेक. मले का कमती."
"राजाच्या लेका, तीन गोठ मांगनं हाय. पहिली दे अगुदर मंग दे सौदा करून"
"मांग वुढे मांग"
"राजाच्या लेका, मुंगुट टाक या पदरात."

अनुक्रमणिका

राजाच्या लेकानं इचार नाई केला. बुढीच्या पदरात झटकन् मुंगुट टाकला. बुढीमाय हासली. दरबारची मुंद्रा खचली

"दाखव वुढे दाखव, तुह्या टोपलीत का हाय"

"अरे पाह्य राजाच्या लेका, अकलेच्या बोक्या" बुढीनं टोपलीचं झाकण काहडलं. राजाच्या लेकानं टवकारून पाह्यलं. राजेहो, व्हतं काय—दहा हात शेंडी, वीस हात मिशी आन् तीस हात दाढीच्या केसाचा चमकीला गुंडाळा. गुंडाळ्यात व्हती इकुली मुरती. राणी अप्सरेची पुतळी. लखलखू लागली. राजाच्या लेकाची अक्कल हरपली!

राजाचा लेक पुतळी घ्याया वाकला. वुढीनं अडवला. "राजाच्या लेका, सिंहासन खाली कर."

"घे वुढे घे सिंहासन सोडलं."

"राजाच्या लेका आन् दरबारच्या लोका, पुतळीले माह्या समदे हात आता जोडा."

आता का सांगू राजेहो, तुमच्यासारखे मर्दावानी मर्द. येका अप्सरेच्या पुतळीले समद्यानी हात जोडले.

अप्सरेच्या वुढीनं राजाच्या लेका हाती ठेवली पुतळी आन् जाया परतली. राजाचा लेक दिवाना. पुतळी पहातच राह्यला आन् मग वुढीच्या मांगमांगं धावला. येवढा राजाचा लेक गयावया बोलला—

"वुढी माय वुढी माय, अप्सरा राणी देऊन जा"

बुढी माय हासली आन् ठसक्यानं बोलली, 'अरे राजाच्या लेका, अलेकच्या कांद्या...अरे अकल घ्या अकल' !

आता म्हणूनशान मी बी म्हणतो राजेहो...नाय वा, कसं म्हणावं तुमाले, 'अकल शिका अकल'...तुम्ही राजे, शह्यरचे अक्कलवान !

अनुक्रमणिका

संघवार्ता

—प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस
वि. सा. संघ यांजकडून

भेटी व सत्कार

महाराष्ट्र राज्याच्या समाजकल्याण आणि शिक्षण विभागाचे सचिव श्री. पी. जे. चिन्मुलगुंद यांनी दि. ७–९–६२ रोजी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. यावेळी उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी त्यांना संघमंदिर आणि श्रीशिवाजी ग्रंथालयाचे बांधकाम दाखविले. आणि वि. सा. संघाच्या आजपर्यंतच्या कार्याची माहिती सादर केली. यावेळी चहा-पानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

श्रीमंत युवराज शाहू राजे भोसले यांचा सत्कार

विदर्भ साहित्य संघातर्फे कोल्हापूरचे श्रीमंत युवराज शाहू राजे यांचा गुरुवार दि. ४–१०–६२ रोजी सायंकाळी ६ वा. सत्कार करण्यात आला. सुरुवातीला उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी युवराजांचे स्वागत करून त्यांना संघमंदिर, श्रीशिवाजी ग्रंथालयाचे बांधकाम आणि धनवटे रंगमंदिर दाखविले. नंतर गडकरी सभागृहात सत्कारादाखल श्री. ना. रा. शेंडे यांनी प्रास्तविक भाषण करून युवराजांना हार आणि गुच्छ अर्पण केला. युवराजांनी उत्तरादाखल भाषण दिल्यावर अल्पोहाराचा कार्यक्रम झाला. नंतर सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी युवराजांचे आभार मानले. आणि उपस्थितांची ओळख करून दिली. यावेळी युवराज शाहू राजे यांनी श्रीशिवाजी ग्रंथालयाला १००१ रुपयांची देणगी दिली. तदनंतर युवराजांना वि. सा. संघाच्या नाट्य समिती-तर्फे सौ. उपाबाई लिमये यांनी सौ. सई परांजपे यांनी लिहिलेल्या "शेपटीचा शाप" या नाटकाच्या तालमीचा मुहूर्त करण्याची विनंती केल्यावर युवराजांनी नटराजाच्या मूर्तीला हार अर्पण करून नारळ फोडला. नाट्य समितीतर्फे युवराजांचे श्री. शंकरराव कुळकर्णी यांनी आभार मानले व युवराजांनी नाट्य समितीला १०१ रु. ची देणगी दिली.

या समारंभाला श्रीमंत राजे प्रतापसिंहराव भोसले, श्रीमंत राजे राजाराम-सिंह भोसले, श्री. जामनेरकर श्री. भाऊसाहेब माडखोलकर, श्री. बाळासाहेब

अनुक्रमणिका

ढवळे, चिटणीस श्री. य. गो. मालोदे, श्री.. गो स. देहाडराय, प्रा. माणिकराव वैतुले, श्री. र. वि. कुळकर्णी, श्री. भालचंद्र वुट, श्री. वा. रा. पाठक आदि मंडळी उपस्थित होती.

"आधुनिक मराठी साहित्याची वाटचाल" या विषयावर परिसंवाद–

दि. १२–९–६२ रोजी सायंकाळी ६ वाजता "आधुनिक मराठी साहित्याची वाटचाल" या विषयावर संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे (कवि अनिल) यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादात श्री. मामासाहेब वरेरकर, प्रा. अनंत काणेकर, डॉ. वि. भि कोलते, प्रा. मं. वि. राजाध्यक्ष, श्री. वि. द. घाटे, प्रा. दि. के. वेडेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि डॉ. प्रभाकरराव माचवे यांनी भाग घेतला.

दि. १३–९–६२ रोजी सकाळी ८ वाजता साहित्य अकादमीच्या सभेसाठी आलेल्या सर्व सभासदांना वि. सा. संघातर्फे अल्पोपहार देण्यात आला. यावेळी डॉ. प्रभाकरराव माचवे यांनी साहित्य अकादमीच्या कार्याची माहिती निवेदन केली.

कै. न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदा दि. २१ तें २३ सप्टेंबर ६२ पर्यंत सायंकाळी ६ वा. कै. न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात झाली. या वादस्पर्धेत २१ महाविद्यालयांनी भाग घेतला.

वादस्पर्धेचा विषय–

"विज्ञानाच्या वाढत्या वर्चस्वाने मानव्याची हानि होत आहे".

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून ॲड. चंद्रशेखर धर्माधिकारी आणि श्री. खं. के. रांगोळे यांनी काम केले.

या स्पर्धेचे उद्‌घाटन विदर्भ विभागाचे उपशिक्षण संचालक श्री. चि. गो. सहस्त्रबुद्धे यांचे हस्ते झाले. दुसरे दिवशी नागपूर महानगरपालिकेचे उपमहापौर श्री. भा. आ. उधोजी यांनी अध्यक्षस्थान मंडित केले. दि. २३ रोजी विद्यापीठाचे माजी उपकुलगुरु न्या. मू. श्री. ग. ब. बडकस ह्यांच्या हस्ते बक्षीस-समारंभ झाला.

यावर्षीची रौप्य ढाल नागपूरच्या धरमपेठ महाविद्यालयाला मिळाली.

वैयक्तिक पारितोषिकें–

श्री. जी. तु. पाठक वाणीज्य महाविद्यालय वर्धा यांना १०० रुपयांचे पहिले पारितोषिक मिळाले.

श्री. तारानाथ मेश्राम, धरमपेठ महाविद्यालय यांना रु. ७५ चे दुसरे पारितोषिक मिळाले.

श्री. जी. तु. पाठक, श्री. तारानाथ मेश्राम आणि कु. माणिक पाठक (विमेन कॉलेज) यांनी वादस्पर्धेत अधिक गुण प्राप्त केल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्रें देण्यात आली.

कै. कविवर्य अण्णाजी वोवडे यांची २८ वी पुण्यतिथि

दि. १-१०-१९६२ रोजी कै. अण्णाजी वोवडे यांचा २८ वा स्मृतिदिन समारंभ गडकरी सभागृहात प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. प्रारंभी श्री. ना. रा. शेंडे यांनी प्रास्तविक भाषण केल्यावर श्री. त्रि. गो. देशमुख नागपूर यांचेकडून वि. सा. संघाला मिळालेल्या कविवर्य वोवडे यांच्या छायाचित्राचे अनावरण, लोकनायक डॉ. बापूजी अणे यांचे हस्ते करण्यात आले. नंतर श्री. ग. त्र्यं माडखोलकर, श्री. पु. भा. भावे, श्री. दे. गो. लांडगे, प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांची माहितीपूर्ण भाषणे झाली. चिटणीस श्री. य. गो. मालोदे यांनी सर्वांचे आभार मानल्यावर कार्यक्रम संपला.

श्री शारदा पूजन

वि. सा. संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितीतर्फे दि. ६–१०–६२ रोजी श्री. ना. रा. शेंडे यांनी ग्रंथरूपी शारदेची पूजा केली. नंतर प्रसाद वाटण्यात आला.

शाखा वृत्त

काटोल शाखा–

दि. १६–९–६२ ला नबीरा महाविद्यालयाच्या सभागृहात मावळते अध्यक्ष श्री. सुरेंद्रबाबू देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली वि. सा. संघ काटोल शाखेच्या सभासदांची सभा भरली होती. प्रथम चिटणीस श्री. वैकुंठराव इंगळे यांनी मागील वर्षाचा अहवाल निवेदन केल्यावर त्या अहवालाला मंजुरी देण्यात आली. सभेत १९६२–६३ या नवीन वर्षाकरिता खालील पदाधिकारी एकमताने निवडण्यात आले.

अध्यक्ष–प्राचार्य श्री. द. मा. मुनशी, उपाध्यक्ष–श्री. वि. शं. उपाख्य बाबुराव पांडे विधिज्ञ, चिटणीस–श्री. वैकुंठराव ग. इंगळे सहचिटणीस–प्रा. कु. पद्मा गणेश देशकर, कोषाध्यक्ष–श्री. गो. अ. उपाख्य आप्पासाहेब भांडारकर, परीक्षा विभाग प्रमुख–मुख्याध्यापक श्री. क. भ. हरजाल, कार्यकारिणीचे सन्माननीय सभासद–प्रा. श्री. म. कृ. देशपांडे, श्री. सुरेंद्रबाबू

देशमुख, प्राचार्य 'श्री. ना. ए. घासकडवी, श्री. अमृतराव पांडे, श्री. वसंतराव पांडे सिव्हिल जज्ज, श्री. गोकुळदास राठी, श्री. क. भ. हरजाल, मुख्याध्यापक श्री. वसंतराव कडू, प्रा. श्री. एल. जी. चिचोळकर, श्री. दातार विकास खंडाधिकारी कार्यकदृष्टचा कार्यकारिणी अधिक विस्तृत करण्याचे ठरले. ऑगस्टमध्ये झालेल्या परीक्षेकरिता परीक्षार्थ्यांचे एक महिनाभर निःशुल्क मार्गदर्शन केल्याबद्दल ा. कु. लतिका जोशी आणि श्री. वैकुंठराव इंगळे यांना एका ठरावाद्वारे हार्दिक धन्यवाद देण्यात आले. अध्यक्षीय जवाबदारी योग्यतेने पार पाडल्याबद्दल श्री. सुरेंद्रबाबू देशमुख यांचेंहि अभिनंदन येऊन आभार मानण्यात आले. विविध कार्यक्रमाच्या आयोजनावरोवरच मराठी भाषेच्या प्रचाराकरिता आणि प्रसाराकरिता परीक्षा विभागासाठी अधिकाधिक परीक्षार्थी मिळविण्याचे धोरण समंत करण्यात आले.

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती

प्रतिवृत्त

केंद्राधिकाऱ्यांना प्रार्थना

(१) आगामी परीक्षा दि. १९ व २० जानेवारी १९९३ ला होतील. त्याकरिता परीक्षार्थ्यांनी केंद्राधिकाऱ्याकडे आवेदनपत्रे सशुल्क देण्याची तारीख १० नोव्हेंबर आणि परीक्षा समिति वि. सा. संघ यांचेकडे पाठविण्याची शेवटची तारीख १५ नोव्हेंबर ६२ ही राहील.

(२) अनिवार्य कारणास्तव ऑगस्ट सत्रात परीक्षेला बसू न शकलेल्या विद्यार्थ्यांची आवेदन पत्रें अर्वे परीक्षा शुल्क भरून अन्य आवेदन पत्रासोवत दि. १ नोव्हेंबर ६२ च्या आत आणि त्यांची रीतसर यादी केंद्राधिकाऱ्यानी परीक्षा समितीच्या कार्यालयाकडे २५ ऑक्टोबर १९६२ च्या आत पाठविणे आवश्यक आहे.

(प्रा.) माणिक के बैतुले
संचालक,
परीक्षा समिती, वि. सा. संघ

दि. २०-१०-६२
नागपूर

वाचकांचा पत्रव्यवहार

(गेल्या वर्ष–दीड वर्षात 'युगवाणी' संबंधी वाचकांची जी पत्रे आमच्याकडे आली त्यातील कांही थोडे निवडक अभिप्राय येथे देत आहोत. स्थलाभावी अधिक उतारे येथे दिले नाहीत. यथाक्रम पुढे देण्याचा विचार आहे. —संपादक)

......आपण संपादित केलेला 'युगवाणी'चा ऑक्टोबर ६१ चा अंक वाचला. 'गूढार्थ दीपिके' वरचें आपले समीक्षण अभ्यासपूर्णच आहे...... 'युगवाणीतील', आणखी अेक लेख 'ज्ञानेश्वर 'शृंगारी' कवि आहेत काय ?' हा प्रा. परांजपे यांचा लेख अनेक दृष्टींनी उपयुक्त ठरेल.....

दि. २९–१०–६१ —अनंत गणेश वैद्य, पुणें.

'युगवाणीचे' अंक चांगले निघाले आहेत.....

दि. २७–१२–६१ —रा. ब. माढेकर, हैद्राबाद

....'नव्या जगाच्या वाटेवर' हें प्रवासवर्णन पुनर्मुद्रित करण्यास आपण अनुमति दिलीत याबद्दल आम्ही आपले आभारी आहोंत....


दि. ७–१२–६१ —मनोहर शहाणे,
(संपादक, 'अमृत', नासिक.)

.....जून व जुलै असे दोन्ही अंक हातीं आले, पण त्यांतून आपण "नव्या जगांत" चालू केलेली लेखमाला न दिसल्यामुळे कांही तरी कमी साहित्य मिळू लागलें आहे. असें वाटत आहे. पुढले लेखांक लवकर सुरू करून 'नव्या जगाची' जिज्ञासा तृप्त करणार नाही कां ? त्या लेखांकडे सारखें लक्ष आहे, नव्हे तेंच 'युगवाणी'चें वर्तमान कालीन आकर्षण होऊन बसलें आहे. चालू करा !

दि. ७ जुलै १९६२ —तु. ना. काटकर, चांदा.

अनुक्रमणिका

दि. १२-९-१९६२ रोजी वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात "आधुनिक मराठी साहित्याची वाटचाल" या विषयावर परिसंवाद झाला. त्यावेळी घेण्यात आलेले छायाचित्र



उजवीकडून–डॉ. वि. भि. कोलते, प्रा. मं. वि. राजाध्यक्ष, प्रा. अनंत काणेकर, श्री. आ. रा. देशपांडे (अध्यक्ष), प्रा. श्री. गो. काशीकर (सरचिटणीस), श्री. मामासाहेब वरेरकर, श्री. वि. द. घाटे, प्रा. दि. के. बेडेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि डॉ. प्रभाकर माचवे

अनुक्रमणिका